EGISTERED N. No. 4

बहिरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकाळ अंकास ........................।२
नोटिस बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........।१ ।६
दुसरे खेपेस.... .......।१
तो पट

... ... ... 2 ( with postage )
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as,
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 2 MARCH 1903 NO 9

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २ माहे मार्च सन १९०३ इ० अंक ९

### विज्ञापना

( २ रुपयांत वऱ्हाडसमाचार )

'वऱ्हाडसमाचार' पत्राची वर्गणी चालूं १९०३ साला पासून टपाल हांशिला सुद्धां २ रुपये केली आहे. राज्यारोहणाच्या सुमुहूर्तानें ही गोष्ट आह्मी मनांत योजिली आहे. आजपर्यंतच्या उदार आश्रयाबद्दल आह्मी आमच्या वर्गणीदारांचे अत्यंत ऋणी आहोंत. उत्तरोत्तर अधिक लोकाश्रय मिळेल त्या मानानें आह्मी वर्तमानपत्रांत पुष्कळच सुधारणा करण्याचा संकल्प केला आहे. ईश्वर तो संकल्प सिद्धीस नेवो !

१।१।०३ } म्यानेजर— वऱ्हाडसमाचार

### जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यासह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यासह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

---

K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील जगप्रसिद्ध ३७ प्रकारची औषधें विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

---

### नोटीस

रा० रा० चिमणभट बिन लक्ष्मणभट राहणार सुकोडे ता० आकोला पोस्ट-आकोला यांस:–

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तुमच्या खात्याचे रामगांव येथील शेत त्यांतील तुमचा हिस्सा तुह्मी मला ९०० नऊशें रुपयास खरेदी देण्याचे नक्की ठरवून त्याजबद्दल तुह्मी आमचे पासून चारचौघा संभावित लोका समक्ष १ रुपया इसार घेतला. पुढें आह्मी तुह्माला देण्यासाठीं कर्जाऊ व्याजानें रुपये काढून आणले व खरेदीखत लिहून नोंदून देण्या विषयीं ह्मटलें तेव्हां तुह्मी जास्त पैशाच्या लालचीनें आह्मांस आणखी जास्त पैसे मागूं लागला, व खरेदीखत ठरल्या प्रमाणें देण्याचें नाकारिलें. सबब ही नोटीस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत तह्मी ठरलेले ९०० रुपये घेऊन शेताचें खरेदीखत करून नोंदून द्यावे. येणे प्रमाणें मुदतींत न झाल्यास सरकारांत दाद मागावी लागेल आणि या कामासाठीं अखेर निकाला पर्यंतचा जो खर्चवेंच होईल तो व्या नोटिशीचे खर्चासुद्धां तुह्मांपासून भरून घेतला जाईल. शिवाय तुह्मास देण्यासाठीं आह्मी कर्जाऊ काढलेल्या रुपयांचें व्याज तुमच्यावर पडेल ह्मणून अगाऊ जाहीर नोटिशीनें कळविलें आहे कळावें तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १९०३ इ०

सही

बळीराम भट बिन बापू भट राहणार आकोला दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

बेशमी बाबूजी कारभारी पाटील राहणार कोलविहार तालुका आकोट यांस:–

या लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्माकडे वहितीस १०० रुपयाच्या लागवणीनें असलेले शेत कोल विहार येथील सर्व्हे नंबर ९ च्या स्वामीत्वाचे १३१२ फसलीचे रुपये मामुली प्रमाणें खालीं सही करणार यांस आणून द्यावेत आणि लेखी पावती घेऊन जावी. व ही स्वामीत्वाची रक्कम सय्यद महिबूब वलद सय्यद कासम राहणार आकोट यांस देऊं नये. जर त्याला ही रक्कम द्याल तर त्याची जबाबदारी तुमच्या माथीं राहील कळावें २३।२।१९०३ इ०

सही ( उर्दूत )

उमरावबी मर्द सय्यद नबी तर्फे मुखत्यार मनवरअली वलद लाला मिया राहणार आकोट.

---

### नोटीस

बेशमी शामु वल्लद झाडू सपकाप राहणार पहूर ता० खामगांव यांस.

या लेखानें कळविण्यांत येते कीं तुमची मुलगी नामें गंगी इचा विवाह माझा मुलगा नामें किसन याजबरोबर झाला आहे. ही सोयरिक निश्चित केली तेव्हां उभयतां वधूवरांवर परस्परांनीं कपडे चढविले, पंचादेखत ब्राह्मणानें उभयतां देवस्थास कुंकूं लाविलें व इतर लेवणावळ वगैरे गोष्टी करण्यांत आल्या. हिंदुधर्म शास्त्रा प्रमाणें हें लग्न पक्कें झालें, आतां लौकिकी रीतीचा समारंभ व्हावयाचा राहिला आहे. आतां ही सोयरीक मोडण्याची गोष्ट तुमच्या हातची नाहीं. तुमची मुलगी गंगा ही माझी सून झालेली आहे. तुह्माला हा शरीरसंबंध तोडण्याला रस्ता खुला नाहीं असें असतांना तुह्मी आमचा संबंध तोडणार आहां हें बरोबर नाहीं. तुह्मी दुसरीकडे सोयरीक धरली आहे असें ऐकतों परंतु ती गोष्ट तुह्माला आतां करितां येत नाहीं. तुमची नवी सोयरीक रद्द आहे. तुमच्या मुलीशी ठरलेल्या लग्न समारंभाची तीथि लवकर निश्चित करावी. ही नोटीस पोचल्या तारखे पासून चार दिवसांच्या आंत हें न कराल तर तुमच्या मुलीचें दुसरीकडे होणारें लग्न रद्द होईल. त्या शिवाय माझ्या खर्चाची नुकसानी तुह्माकडून घेऊं व तुमच्या या अपकारामुळें माझ्या घराण्या संबंधानें व लौकिका संबंधानें कमीपणा लोकदृष्टीनें येईल तर त्या बद्दलची जोखीम तुह्मावर राहील. कळावें ता० २९।२।०३

सही

सदू वल्लद रामजी डिगडे राहणार पिंपळगांव ( काळ्याचें ) द. खु.

---

### जाहिरनामा.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, शामू वल्लद झाडू याची मुलगी गंगी इला मी सून केली आहे. तिची सोयरीक माझा मुलगा किसन याच्याशी झाली आहे, तर या उपर कोणीही गंगीशी सोयरीक दुसऱ्यानें करूं नये. जो ही गोष्ट करील तो फसेल व त्याला जबाबदार राहील कळावें. ता० २९।२।०३ इसवी.

सही

सदू वल्लद रामजी डिगडे राहणार पिंपळगांव ( काळ्याचें ) द. खु.

---

### नोटीस

नोटीस बेशमी बनाबाई जवजे विठोबा नाईक मणोरकर राहणार दर्यापूर जिल्हा एलिचपूर. इजला.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचा बंधु रा० विठ्ठल पुरुषोत्तम मणोरकर व आह्मी अविभक्त कुटुंबापैकी असून तुह्मी विठोबा नाईक वारल्यावर माझें मत न घेतां मुखत्यारपत्र रा. फकीरचंदलाला व बाळकृष्ण कासार यांस दिलें व दुकानचे काम वाटेल तसें रितीनें करण्यास सुरवात केली, आतां तुह्मास या नोटीसीनें कळविण्यात येतें कीं तुह्मी आमचा निकाल होई पर्यंत दुकानचा वसूल घेऊं नये व देणें देऊं नये. व त्याच प्रमाणें पावती वगैरेहि देऊं नये. तसेंच धान्य, कपडा, कापूस व आणखी दुकानातील इतर जिनसा यांची विक्री अगर अफरातफर करूं नये. ज्याअर्थी तुमची व आमची इस्टेट सर्वत्र एके ठिकाणीं आहे त्या अर्थी फकीरचंद व बाळकृष्ण कासार यांस मुखत्यारपत्र देण्याचा अधिकार तुह्मांस काहींच नाहीं. सदरहु मुखत्यारपत्र आतां रद्द समजावें. तसेंच कोर्टांत जबाब देण्यास तुह्मास कोणत्याच तऱ्हेचा अधिकार नाहीं. व तुह्मी कोर्टांत कामही चालवूं नये कारण दुकानचा मालक अविभक्त कुटुंबापैकी मी आहे. आमचा दुकानासंबंधी व इस्टेटी संबंधी सर्व निकाल होई पावेतो दुकानांत मध्यंतरी कोणी वसूल वगैरे आणिला तर तो वसूल आला असें समजलें न जाऊन त्याचें कडून पुन्हा वसूल केला जाईल, आणखी तुह्मास असेंही कळविण्यांत येत आहे कीं जर दुकाना संबंधानें कोणतेही काम तुह्मी मला विचारल्या शिवाय कराल तर तुमचे काम रद्द समजलें जाऊन तुह्मी ते केल्याबद्दल पुढें कायदेशीर सक्त तजवीज करण्यांत येईल कळावें, ता० २९।२।१९०३ इसवी.

सही

यादव पुरुषोत्तम मणोरकर साहु दुकान दर्यापूर दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

रा. रा. सिवचरण चैतराम मारवाडी दुकान शेगांव हल्लीं वस्ती खेर्डे तालुके खामगांव यांस:–

खालीं सही करणार रामलाल धनीराम मारवाडी वस्ती खेर्डे तालुके खामगांव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मारू संमत १९५८ मित्ती श्रावण शुद्ध १९ मुताबिक तारीख २९।८।१९०१ इसवी. रोजीं रुपये २००० अक्षरी दोन हजार ऐवजी दोन हुंड्या दिवस ३६१ च्या मुदतीच्या लिहून दिल्या. त्याची मुदत पुरी होऊन बराच काळ झाला. मुदती नंतर तुह्मास रुपयाची मागणी केली असतां आज पावेतो रुपये दिले नाहींत सबब या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे रुपये आह्मास व्याजासुद्धां देऊन आमची पावती घ्यावी. तसे न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाऊन तुमचे जवळून कोर्ट खर्चासुद्धां रकम घेतली जाईल व या नोटिशीचा खर्चही घेतला जाईल. कळावें तारीख २९ माहे फेब्रुवारी सन १९०३ इसवी.

सही

रामलाल धनीराम दुकान खेर्डे तालुके खामगांव दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ४ शके १८२४

## लोकांची मागणी.

गेल्या २१ वे तारखेला उमरावतीला जाहिरसभा भरली होती. ही सभा वऱ्हाड-प्रांता संबंधानें चालू असलेल्या वाटाघाटीला उद्देशून भरविण्यांत आली. या प्रांताचा राज्यकारभार आहे तसाच ठेवा अशी विनंती सरकाराला करावी असें या सभेनें ठरविलें आहे. सभेचा अर्ज उमरावती जिल्ह्याच्या तर्फेनें जाणार आहे. उमरावतीच्या प्रमुख मंडळींनीं ही गोष्ट मनावर घेतला आहे. उमरावती ही वऱ्हाडची प्रधान नगरी आहे व तिच्या धोरणानें इतरत्र सूत्रें हालत असतात, आणि उमरावतीसच पुष्कळशा हालचाली होत असतात. उमरावती जिल्ह्याचे अनुयायी इतर सर्व जिल्हे आहेत आणि लोकमतही इतरत्र काहीं निराळें असेल असें आह्मांस वाटत नाहीं. उमरावतीकरांनीं अर्जाचा जो हा खटाटोप केला आहे त्याचा अंशतः जरी स्वीकार इंडिया सरकार करितील तर आह्मांस मोठा आनंद वाटेल.

अर्जाचा मुख्य आशय असा दिसतो कीं वर्तमान व्यवस्थाच उत्कृष्ट आहे आणि भावी व्यवस्थेच्या सूचना लोकांस पसंत नाहींत. वस्तुस्थिता आहे तीच बरी आणि तिच्यांमध्यें उलथापालथ होणें हितावह नाहीं असें लोकमत सरकारापुढें मांडण्यात येत आहे. लोकवार्तेंत ज्या तीन सूचना प्रचलित आहेत त्या त्याज्य आहेत असें प्रतिपादन केलेलें आहे. पहिली सूचना हा प्रांत मुंबई इलाख्याला जोडण्या संबंधाची आहे. दुसरी मध्यप्रांतात वऱ्हाड प्रांत सामील करण्याची आहे. तिसऱ्या सूचनेंत पूर्व वऱ्हाड मध्यप्रांताकडे द्यावें व पश्चिम वऱ्हाड मुंबईकडे द्यावें असा आशय आहे. या तिन्हीं सूचना आह्मास मान्य नाहींत असें सभेचें ह्मणणें आहे. सभेची मागणी अशी आहे कीं या प्रांतांचा राज्यकारभार होता होईल तितका कायमच ठेवावा आणि प्रसंग विशेषीं वर्तमान कालाला अनुरूप असे मात्र फेरफार करण्यांत यावे. ही लोकांची मागणी साधकबाधक विचारांसह सरकारापुढें मांडण्यांत आली आहे. ही मागणी मान्य ठरेल तर या प्रांताची मोठी सोय होऊन उत्तरोत्तर चांगली भरभराटी होत जाईल. या प्रांताचें स्वतंत्र स्थानिक सरकार आजपर्यंत होतें तें या पुढेंही असेंच राहूं द्यावें. लोकांचा व स्थानिक सरकाराचा संबंध विशेष निकटीचा राहतो. प्रांत लहानसा असल्यामुळें लोकस्थितीचें चित्र सरकाराला वारंवार रेखाटतां येतें. लोकांचें व सरकारी अंमलदारांचें दळणवळण अधिक सलोख्याचें राहतें. मुंबई इलाखा घ्या किंवा मध्यप्रांत घ्या, हे दोन्ही इलाखे फारच विस्तृत आहेत व समुद्रा सारखे लांबवर पसरलेले आहेत. यांच्या मध्यें या चिमुकल्या प्रांताचा अंतर्भाव होईल तर त्यामुळें सरकाराचा व प्रजेचा सामीप्य संबंध तुटेल, त्या उभयता मधील बहुत वर्षांचा प्रेमभाव कमी कमी होईल आणि लाचलांचे अधिकारी येत जात राहिल्यानें हल्लीं प्रमाणें अधिकारीवर्गाला विशेषता आपलेपणाहि वाटणार नाहीं.

वऱ्हाडच्या पुष्कळशा वहिवाटी मुंबईहून व मध्यप्रांतहून भिन्न भिन्न आहेत. इकडे मुंबईकडची रयतवारी चालू आहे तथापि इकडील इजारदारीची पद्धत या प्रांतालाच ठरूक आहे. या प्रांतीं शेतीवाडीचे कांहीं विशिष्ट हक्क आहेत. पोट हिस्सेदारामध्यें परस्परांला अग्रक्रयाचा हक्क आहे तसा मुंबईकडे नाहीं. पाटील, पटवारी, इनामदार यांच्या संस्था या प्रांतांतल्या प्रमाणें मुंबईकडे नाहींत व तशा मध्यप्रांताकडेही नाहींत. या प्रांताचें दिवाणी खातें मध्यप्रांताहून निराळ्या पद्धतीवर आहे. हें खातें मुंबई इलाख्याच्या धर्तीवर आहे. मुंबईचा कायदाच इकडे लागू आहे.

सांपत्तिक व सामाजिक सुधारणेला अनुकूल गोष्ट म्हटली ह्मणजे हा प्रांत स्वतंत्रच ठेवण्यांत आला पाहिजे. मुंबई किंवा मध्यप्रांत या इलाख्यांपेक्षां हा प्रांत अधीक सधन व सुखी आहे. या प्रांताची जी शिल्लक राहील ती येथील लोकांच्या उपयोगाकडे लागली पाहिजे. दुसऱ्या प्रांताचे भागी दार झाल्यापासून आमच्याच लोकांचें नुकसान होईल. या प्रांतवाल्यांचीं सुखसाधनें दुसऱ्या प्रांतवाल्यांस अंशतः मिळतील पण दुसऱ्यांच्या संसर्गाचा आह्माला मोठासा लाभ होण्याचा संभव नाहीं. हा प्रांत हल्लीं प्रमाणें पृथक् स्थानिक सरकाराकडे राहील तर खर्च वजा जातां बाकी राहिलेली बचत या प्रांताच्याच उपयोगाकडे लागेल. खर्चाच्या बाजूनें पाहिलें तरी असेंच निष्पन्न होतें कीं हा प्रांताचा खर्च काटकसरीचा आहे आणि आमच्याच्या मानानें पाहता मुंबईच्या पद्धतीनें इकडे कांहीं कांहीं बाबतींत दीढी दपटीने सध्याचा खर्च वाढेल. या प्रांताच्या खर्चासंबंधानें मुख्य तक्रार अशी आहे कीं इकडचे सहा जिल्हे ह्मणजे पुष्कळ लहान जिल्हे आहेत. मुंबईचा खानदेश जिल्हा पहा, किंवा मध्यप्रांताचा रायपूर जिल्हा पहा, या दोघांशीं तुलना केली तर हें खरें कीं या प्रांताचे जिल्हे फार लहान आहेत. पण खानदेश किंवा रायपूर जिल्हा फार मोठा आहे व तो छाटला पाहिजे अशी पुष्कळ वर्षांची ओरड आहे. त्या शिवाय वऱ्हाडाचा जसा मोठासा भाग लागवडींत आहे तसा खानदेशाचा नाहीं. खानदेशच्या ६४॥ लक्ष एकर जमिनी पैकीं २४॥ लक्ष लागवडींत असून ऐनकालीचें उत्पन्न ४०॥ लक्ष रुपये आहे. खानदेशाच्या पावणेदोनपटी एवढा हा प्रांत आहे. येथें वहितीकडे ६९ लक्ष एकर जमिन असून ७६ लक्ष रुपये ऐनकाळीचें उत्पन्न आहे. आकोला व उमरावती या दोन जिल्ह्यांतील लागवडी खालची जमीन खानदेशांतल्या पेक्षां मोठी आहे. असें असून खानदेशाला जितके अधिकारी व पगार लागतात या मानानें तितका आमच्या उमरावती, आकोला व बुलढाणा या तिन्हीं जिल्ह्यांला मिळून देखील नाहीं. खानदेशाशीं केलेली तुलनाच चुकीची आहे. या प्रांताचें गुजराथेशीं साम्य विशेष आहे. इकडील जिल्हे जवळ जवळ गुजराथ एवढेच आहेत; गुजराथेच्या जिल्ह्यांची रचना इकडेही दृष्टोत्पत्तीस पडेल. तेव्हां खर्चाच्या बाजूनें कुरकूर करण्याला नीटसें स्थळ दिसत नाहीं. मध्यप्रांतातील रायपुर जिल्ह्याशीं या प्रांताचें कांहींच साम्य नाहीं. तो जिल्हा पुष्कळ ओसाड आहे व तिकडे जमीनदारी पद्धती चालते. या प्रांताच्या गोष्टी रायपुराशी जुळणार नाहींत. ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्या सारखी आहे कीं वऱ्हाडचा कमिशनर जें काम करितो तें मुंबईकडे होण्याला दीडपट खर्च पडेल. तसेंच इकडची जुडिशिअल कमिशनरची जागा रद्द केली तर वऱ्हाडच्या कामामुळें हायकोर्टांत एक आणखी न्यायाधीश ठेवावा लागेल; ह्मणजे खर्च हा पूर्वी पेक्षा थोडा अधीक पडेल शिवाय लोकास मात्र हायकोर्ट फार लांबवर पडेल. वऱ्हाडच्या विद्याखात्याच्या डायरेक्टरच्या नेमणुकी संबंधानेंही तसाच अभिप्राय पडतो. एकंदरीनें हा प्रांत दुसऱ्या प्रांताला जोडल्या पासून खर्चाच्या दृष्टीनें देखील सरकाराला फायदा नाहींच व लोकांस मात्र विनाकारण त्रास होणार आहे.

वरील प्रतिपादनाचा मातार्थ एवढाच कीं विद्यमान स्थानिक सरकारच बरें आहे, लोकदृष्टीच्या व सरकाराच्या बाजूनें चालू व्यवस्थाच कायम राहावी, आणि खर्चाच्या मानानें देखील प्रस्तुतचा आमला उत्तम आहे. अशी वस्तुस्थिती आहे तेव्हां विना कारण राजिक फेरफार करण्यामध्यें कांहीं हाशील दिसत नाहीं. हा कौलपट्ट्याचा प्रांत आहे त्या अर्थी हा स्वतंत्र वेगळा राहील तितका बरा!

---

## प्लेग

हा रोग फार वाढला आहे. सर्व हिंदुस्थानभर याचा फैलाव झाला असून एकंदर मरणाची संख्या फारच मोठी आहे. तारीख १९ फेब्रुवारी पासून तारीख २६ फेब्रुवारी पर्यंतच्या सप्तकांत एकंदर प्लेगाचे मृत्यु २७३१९ झाले. त्याच्या मागील आठवड्यात हीच संख्या फक्त २९८९२ होती; आणि गुदस्तां याच आठवड्यांत १४९४६ प्लेगामुळें मृत्यु झाले होते. गेल्या सालच्या मानानें यंदा रोग दुपटीनें वाढला आहे. मुख्य वाढ मुंबई, बंगाल, पंजाब, मध्यप्रांत व वऱ्हाड या इलाख्यांच्या भागांत झाली आहे.

वऱ्हाडांत प्लेगाचा विस्तार पुष्कळच होत चालला आहे. बुलढाणा, आकोला व उमरावती हे तीन जिल्हे सध्यां तोंडाशीं आहेत. आकोल्यात सध्या दररोज ८।१० प्लेगाचे मृत्यु होतात. मध्यंतरी ही संख्या १२ पर्यंत वाढली. मंगळवाऱ्यातून प्लेग उत्तरेकडे व ईशान्येकडे पसरत चालला आहे. लोक मोठे हवालदील झाले असून गती कुंठल्यामुळें ईश्वराचा धावा करीत आहेत. ते ते लोक आपापल्या धर्माप्रमाणें ईश्वराची आराधना करितात; आणि हाच अखेरीचा उपाय कामाला येईल. नदीच्या पश्चिम कांठाला गावामध्यें कदाप स्वास्थता आहे पण एक दोन तुरळक मृत्यु प्लेगामुळें होत असतात. खामगाव, शेगांव, बाळापूर वगैरे कडील भाग सध्यां बरे आहेत. जळगांव तालुक्यांत हा रोग उद्भवला असून पिंपळगांव (काळ्याचें) येथें मोठी दाणादाण उडाली आहे. गेल्या सप्तकांत तथें गेल्या गुरुवारीं २६ लोक आजारी झाले व १७ मरण पावले. गांव चार पांच हजार लोकवस्तीचा आहे आणि या मानानें तथें फारच कहर उसळला आहे. उमरावतील दोन प्लेगाचे मृत्यु झाले. सरकारी बंदोबस्ता संबंधानें तेथें गड्या आठवड्यांत एक दिवस गडबड उडाली होती. बाजार बंद होता. लोकांनीं आपलीं दुकानें बंद ठेविलीं, पण शेवटीं रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे, मि० डिपुटी कमिशनर कर्नल ग्यारेट साहेब आणि इतर मुख्य मुख्य लोक यांनीं जाहिर सभा भरविली व लोकांची समजूत घातली. बंदोबस्त लोकांच्या सवलती प्रमाणें ठेवण्यांत येईल असें आश्वासन मिळाल्या बरोबर लोकांमध्यें पुन्हा शांतता झाली. लोकांनीं घाबरूं नये कां कीं घराच्या बाहेर काढण्या विषयीं जुलूम न करितां लोकांस आपखुषीनें गांवा बाहेर नेण्या विषयीं प्रयत्न करण्यात येईल असा ठराव झाला आहे. रेल्वे चांदूर व धामणगांव येथें आजपर्यंत अनुक्रमें २१८ व १५९ मृत्यु झाले. या संख्या तिकडील रोगवृद्धीची चांगलीच कल्पना देतील. सारांश रेल्वेच्या बाजूचा भाग प्लेगानें व्यापलेला आहे आणि त्याचा प्रसार अधिकाधिक होत आहे ही दुःखाची गोष्ट होय. फाल्गुन महिन्याला प्रारंभ झाला आहे आणि उष्णतेचें मान चांगलें वाढतें आहे तेव्हां वऱ्हाडच्या उष्ण हवेनें प्लेगाचा प्रतिकार लवकरच होईल अशा भरंवशावर सध्यां लोक विशेष स्वस्थ आहेत. ईश्वर करो नें ही इडापिडा सत्वर लयास जावो!

---

## स्थानत्याग

प्लेगाचें स्थान सोडावें आणि खुल्या मैदानांत लांबवर जाऊन कालक्रमणा करावी हाच मुख्य प्रतिबंधक उपाय आहे. हा उपाय पुनः पुनः सांगितल्या शिवाय आमच्यानें राहवत नाहीं. कुमार श्री हरभामजी साहेब लोकांविषयीं फार काळजी वाहतात. गांवोगांव ते लोकांस आग्रह पूर्वक सांगतात कीं स्थान त्यागानें प्लेगाचा प्रतिबंध चांगला होतो. तेव्हां ठिकठिकाणच्या लोकांनीं आपापल्या शक्ती प्रमाणे गांवाबाहेर रानांत राहण्याच्या सोयी करून ठेवाव्या. या गोष्टींत आळस कोणी करूं नये ह्मणून ते मोठ्या कळकळीनें लोकांस उपदेश करीत फिरत आहेत. अनुभवानें स्थानत्यागाचा उपाय उत्कृष्ट असा ठरला आहे. स्थलान्तर करण्याला संकटें पुष्कळ असतात ही गोष्ट सर्वजण ओळखून आहेत पण तीं संकटें बाजूला सारून प्राणासारखी प्यारी चीज वाचवा अशी लोकांपाशीं वारंवार मागणी आहे. ज्याचा त्याचा प्राण प्रत्येकाला प्यारा आहे आणि अवघ्या दुनिया या एकट्या जीवापुढें तुच्छ आहे तरी लोक स्थानत्यागाचा उपाय करण्याला प्रवृत्त होत नाहींत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. संसाराच्या अडचणी मोठ्या दुस्तर असतात पण त्यापेक्षा मोठी अडचण ह्मणजे आमच्या हिंदुमुसलमान लोकांचा प्रारब्धवाद होय.

मरणवेळा निश्चित आहे आणि कोठेंही गेलें तरी ती घडी कांहीं चुकणार नाहीं; तेव्हां स्थानत्यागाचा खटाटोप व्यर्थ आहे असा आमच्यामधील जनसमाजाचा दृढ व पक्का ग्रह आहे. या प्रारब्धवादाचें बंड फार आहे आणि त्यामुळें आमच्या लोकांचा मोठा ऱ्हास होत आहे. आमच्या मतें हा समजूतच चुकीची आहे. जोंपर्यंत आपण भविष्यज्ञ नाहीं व पुढची गोष्ट आपणांस कळत नाहीं तोंपर्यंत आपण आपल्या अनुभवाच्या धोरणानेंच चाललें पाहिजे. जर आयुष्याची मुदत अगोदर कळेल तर आम्ही म्हणतो कीं लोकांनीं सुखेनैव वाटेल तेथेंच काय पण प्लेगाच्या मुख्य ठिकाणीं जाऊन राहावें. पण जोंपर्यंत मृत्यूची घडी कळून येत. नाहीं व तत्संबंधी मनुष्य प्राणी अज्ञ आहे तोंपर्यंत प्रत्येकानें मी चिरायु आहे तितकाच क्षणभंगूरही आहे अशी समजूत घेतली पाहिजे. होतां होईल तोंपर्यंत मृत्यूच्या गर्तेंत उडी घालूं नये. निदान प्लेगाच्या स्थळापासून कांहींसें दूर अंतरावर राहावें, आणि मग जें होण्यमाण असेल तें दिसेल अशा निश्चयानें वागलें पाहिजे असें अनुभव पदोपदीं सांगतो. या अनुभवाला झुगारणारा प्रारब्धवाद आप णास टाकलाच पाहिजे. स्थळांतरा सारखा रामबाण उपाय कोणताच नाहीं आणि प्लेग झाल्या नंतर सर्वच उपाय मृत्यूचे रामबाणच आहेत.

# The Berar Samachar

MONDAY MARCH 2 1903

There is always an apprehension when a new set of political and administrative changes takes the place of the old routine to which the people are accustomed and which they have found to be most conducive to their welfare. Misgivings and doubtings disturb the minds of the people when they are called upon to accept a new system of administration in which foreign elements are likely to prevail over their best interests. Berar was politically one integral unit complete in its branches of administration and was in fact a small model of the British administration of the vast Indian empire. The province was in fact a small empire and enjoyed the unique position of independence and isolation which are always elementary to the growth of small trees side by side with the big trees of large expanse. The growth of a small province like the Hyderabad Assigned Districts was peculiarly its own. It was free from the Moglai influences of a Native state and it reached the full development which will ever point to the glory of the British administration.

People do not like the idea of a new Government. They are neither in favour of the Government of Bombay or the Central Provinces. The proposal of amalgamation is decidedly against the grain of the popular mind: and we are thankful to the leading people of the Amraoti district for anticipating the wishes of the people of the province and for formulating their grievances in the shape of a memorial to the Government of India. Lord Curzon is at the helm of affairs and we hope that this petition of the people will find favour with His Excellency. The Viceroy is open to conviction and the arguments that have been well worded and nicely advanced in the memorial will, we are sure, have their due weight with him. The righteousness of our cause is the ground of our success and the various grounds upon which the present system of the Berar Government is shown to be useful and convenient will speak for themselves. The expediency of continuing the present arrangements is in favour of the people. We emphatically endorse the series of arguments that are embodied in the memorial. The independent and moral tone of administration, the peculiar circumstances connected with the land—tenure, the laws and regulations that have modelled the aspirations and traditions of the people, and the dissimilar systems of the administrative machinery from that of either Bombay or the Central Provinces will all point to the continuance of a separate local government of this province. The expansion of the province is more secure under the present localized administration than under the administration that extends over a vast area of the empire. The change in the administration is thought to be necessary because the government intend to curtail the expenditure of the administration. The memorial quotes figures and statistics and thus substantiates the prayer of the people for a separate local government like the present one. We think that there exists a political reason for the continuance of the present form of administration. Though the new treaty leaves all questions of management to the sole discretion of the paramount power it is however highly necessary that the province taken on lease should be kept as a separate estate of the British Raj. A permanent and separate government that will suit the conveniences of the people and keep up the historical and traditional relations between the Government of India and His Highness the Nizam will be a monument of the highest statesmanship that solved for ever the knotty problem of Berar. Berar is not restored to H. H. the Nizam nor is it annexed to the British Kingdom. In theory the sovereignty of the Nizam is maintained and in practical life the province is completely *British* in all its aspects.

---

THERE will be a hard nut to crack for the local government of Berar. In the Tilak case, a warrant of arrest is issued against Mr. G. S. Khaparde. This warrant should not be enforced in a province which is not the *Khalsa* British province. Berar comes under this category and we hope that in view of the sovereignty of H. H. the Nizam over this province this warrant of arrest will be returned unserved. We may assure the public that the Berar Government will give a full hearing to the legality or otherwise of the procedure of enforcing a warrant of arrest issued against a witness in Berar by the Magistrate at Poona.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— उष्णकालाला प्रारंभ झाला आहे. हवा रुक्ष व निरोगी होत जाईल असा रंग दिसतो. प्लेगचें मान कमी कमी होईल अशा आशेवर सर्वजण आहेत.

मे. इलियट साहेब हे पेनशनीवर तारीख १० मार्च पासुन जातील. त्यांचें काम तूर्त मे० डेअर साहेब हे पाहणार आहेत. हें काम हायकोर्टाच्या कामा शिवाय अधीक करावें लागणार आहे.

मि० फ्रान्सीस साहेब डायरेक्टर आफ लॅंड रिकार्डस हे ग्वाल्हेरीकडे २५०० रुपये पगारावर चालूं महिन्याच्या १५ वे तारखेच्या सुमाराला जाणार आहेत.

मे० क्याप्टन डेग साहेब, फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट व वऱ्हाडचे सेक्रेटरी यांस भोपाळास पोलिटिकल एजंट नेमण्यात आलें आहे.

उमरावतीस जिल्हाबोर्डाचे दिवाण जाल्यात मे इलियट साहेब यांस तेथील मुनसिपालिटी मानपत्र आज सायंकाळीं अर्पण करणार आहेत.

गेल्या २६।२७।२८ या तारखांस आकोला मुनसिपालिटीच्या सहा सभासदाची निवडणूक झाली. या सालीं मतदार लोकांमध्यें बरीच चळवळ होती.

येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेली साहेब याची उमरावतीस बदली होऊन तेथील सिव्हिल सर्जन डाक्टर रो साहेब हे येथें येणार असल्या विषयीं वदंता आहे. काहीं तरी लवकर खरें ठरो!

वैदर्भकार लिहितात कीं, या प्रांतासाठीं आणखी एक व्हेटरनरी इनस्पेक्टर ७५ रुपयाचा देण्यांत आला व या जागेवर रा. रा. विनायक काशीनाथ वैरागकर यांची नेमणूक होईल.

रा. रा. लक्ष्मण नारायण गोखले हे रजेवरून परत येऊन पुसदच्या तहशिलदारी वर रुजूं झाले.

मि० याकूबखा वल्लद दाऊदखा सौदागर याचे घरीं प्लेगाचे रोगानें ५ माणसें मृत झालीं. हा या गृहस्थावर मोठाच प्रसंग आला!

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥।- |
| सोनें | २४।- २४।ॾ |
| चांदी | ६१ |
| जवस | १०५ |
| जवारी | ४२ ते ४५ |
| गहू | ९० ते १०० |
| बाजरी | ५१ ते ५३ |
| मीठ | ३॥।- रु. मण |
| चणे | ३।= रु. मण |
| तूप | ७॥ रु. मण |
| तेल | ९॥। रु. मण७॥ |
| रुई | ५६ ते ६० |

### नोटिशीचें उत्तर

रा. रा. चिंधाजी वल्लद काम्होजी बारी बोडखे राहणार आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीसीनें तुमचे नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं तुह्मी तारीख १०-२-०३ इसवी रोजीं वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांत तारीख १६-२-०३ यांत दिलेले नोटीशींतील मजकूर अगदीं खोटा आहे. तुह्मी करून दिलेले दस्तऐवजापैकीं गुजरून गेलेले सालबंदीचे रुपये ७६ पाउणशे करार झाल्यानंतर एक महिन्यानी तुह्मी मजला तुमचे घरापाशीं भेटले त्यावरून तें रुपये पाठवून देण्याविषयीं मी सुचविलें असतां आपण १।२ दिवसांनीं पाठवून देतों असें कबूल केलें. असें असतां आपण रुपये न देतां मजला खोटी नोटीस दिली हे तुमचे सारखे संभावितास योग्य नाहीं. यावरून मजला करार झालेले सालबंदीचे रुपयाचा कोर्टांत दावा करणें भाग पडल्यावरून दावा केला आहे, व नोटिशीचे खर्चात विनाकारण पाडले, करितां या नोटिशीचा खर्च व दाव्याची रक्कम तुह्मास खर्चासहीत देणें रास्त होईल. कळावें तारीख २६।२।०३ इसवी.

सही

जयकृष्ण नारायण मुंजे आकोट

दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा० रा० मोतीलाल मनसीलाल साहू दुकान आकोले. यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देंण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस संवत १९५६ सालांत रुपये २००० चे चार सालबंदीचे गहाणखत लिहून दिले परंतु साखीम किस्ती भरण्या पूर्वीच तुमच्या उतावळी स्वभावामुळें मी आजारी असताहि आपली शेते विकून तुह्मास सदहू गाहाणखताचे ऐनात व व्याजांत मिळून रकम रुपये २१७८ तारीख १०।१।०३ रोजीं वसूल दिले. पुढें तारीख १८।१।०३ रोजीं आमचे मुखत्यार रा० कृष्णराव मडंग यांचे बरोबर राहिलेले व्याजाची रकम दरमाहा दर शेकडा १ प्रो. साखीम तुमचेकडेस पाठविली असता ती रकम तुह्मी घेतली नाहीं व माझे गाहाणखत परत दिले नाहीं करितां नोटिसीनें कळवितो कीं तुमची व्याजाची राहिलेली रकम ४४३॥ॾ मी बोरगांव मंजू ता. आकोले येथें रा. रा. तुकाराम यादव पटवारी याचे जवळ ठेविली आहे. तुह्मी ती रकम त्यांचे पासून घेऊन माझा गाहाणाचा दस्तऐवज रा० रा० तुकारामपंत यांचे हवाली करावा. तसे करण्यास चुकल्यास तुमचे रकमेबद्दल मी कोणत्याही प्रकारें जबाबदार नाहीं. कळावे. ता० १७।२।१९०३ इसवी.

सही

बाळकृष्ण रामचंद्र तिमसे हल्लीं

राहणार बोरगांव मंजु द. खु.

## वर्तमानसार

**एका घोड्याचें चातुर्य**— एकदां दोन मुली एका घोड्यावर बसून एका ओढ्यांतून जात होत्या. जातांना ओढ्यांत घोड्याचा पाय गुरफटून तो अडखळला, त्या सरशीं त्याजवरच्या दोघी मुली घाबरून पाण्यांत पडल्या आणि गटांगळ्या खाऊन बुडूं लागल्या. इतक्यांत तें अरिष्ट जाणूनच कीं काय, तो घोडा त्यांचे मागें सारखा पोहत सुटला. त्यामुळें त्या मुलींच्या हातीं त्याची शेपटी लागली. हें त्याला समजतांच त्यानें त्यांना कांठावर आणून सोडलें, आणि आपण घरच्या माणसांना वर्दी देण्याकारितां दाराशीं जाऊन आपण कांहीं संकटांत सांपडलों आहों अशा केविलवाण्या स्वरानें खेकाळूं लागला. आणि आपल्या धन्याला पाहतांच त्यानें आपल्यामागें यावें अशा सूचनार्थ पुढें चालूं लागला. व बराचसा पुढें गेल्यावर धनी आपल्यामागें येत नाहीं असें पाहून पुन्हा परतला व पूर्ववत् खेकळूं व पळूं लागला. तेव्हां मालक त्याचा आशय जाणून त्याचे मागोमाग जाऊं लागला; तों तो घोडा दरम्यान न थांबतां थेट त्या मुलीपाशीं जाऊन उभा राहिला. व आपण येईपर्यंत त्या जिवंत राहिल्या अशा बद्दल आपणास मोठा आनंद झाला हें प्रदर्शित करण्याकारितां मोठ्या लडिवाळपणानें आपलें नाक त्यांच्या खांद्यावर घासूं लागला व आनंदानें बागडूं लागला.

**मेद झडण्याचा उपाय**— लठ्ठ माणसांनीं मेद झडण्यासाठीं 'साकरीन' जातीची साखर खावी, किंवा पातळ पेयें म्हणजे पाणी ताक, चहा इत्यादि अगदीं होतां होईल तें कमी सेवन करावीत. ही गोष्ट संवयीनें साध्य होण्यासारखी आहे. मुद्दाम अनुभव घेऊन पहावा.

**पैसे काढण्याच्या युक्त्या**— एखादें सरकार पैसा मिळविण्यासाठीं काय करील व काय नाहीं याचा नेमच नाहीं. आस्ट्रिया सरकारनें एकदां असा कायदा केला कीं, प्रत्येकानें आपलें धुराडें सरकारकडून कर देऊन साफ करविलें पाहिजे. सरकारी स्नानगृहांतच स्नान केलें पाहिजे, सरकारी दंतमंजनानेंच तोंड धुतलें पाहिजे आणि असें न करील त्यास दंड होई. तुर्कस्थानानें इंग्रजी टोपी घालणारावर कर बसविला, तर ग्रीस देशानें तंबाकू ओढणारावरच कर बसविला. स्पेन सरकारनें सर्व लोकांनीं आपल्या कपड्यांमाड्यावर सरकारांतूनच नांवें घालून घ्यावीत असें ठरविलें. तसेंच पुस्तकें सरकारांतूनच बांधवून घेतलीं पाहिजेत असा हुकूम सोडला. प्रत्येक सणावारीं रोषनाई सरकार तर्फे प्रत्येकानें करवून घ्यावी असें ठरविलें. या सर्व सरकारी जबरदस्तीच्या कामा प्रीत्यर्थ सरकारास गुपचूप पैसा द्यावा लागत असे. कर कशावर बसवावा ह्याला कांहींच उत्तर नाहीं. जिकडून पैसे तावडतोब पुष्कळ मिळतील तो कर उत्तम. घराचे खिडक्या दरवाजावर कर, मुलामुलींवर कर, कुत्र्यामांजरावर कर, गाडी घोड्यावर कर, लग्न मुंजी व इतर धर्मसोहाळ्यावर कर, जन्ममृत्यूवर कर, दगड मातीवर कर, तुरेटीवर कर; मीठ भाकरीवर कर याप्रमाणें कल्पनातीत करांवर करच कर !

## आयुष्य वर्धक रोग

रोगांनीं मनुष्याचें आयुष्य वाढतें हें अगदीं खोटें वाटेल पण खरोखरींच तसा अनुभव आहे हें समजलें म्हणजे फारच आश्चर्य होईल.

( १ ) वातरोग ( Rheumatism )— याचे रोगी तरुणपणीं कधींही मरत नाहींत, म्हातारपणींच मरतात कारण यांच्या रक्तांत दुसऱ्या रोगाचे जंतु जगत नाहींत.

( २ ) संधिवात ( Gout )— हा रोग काळजास भिनला नसल्यास रोग्यास ७०-७५ वर्षे पर्यंत मृत्यूचें भय नाहीं, कारण यामुळें रक्तांतील विषारी द्रव्य नाहींसें होतें,

( ३ ) देवी— आलेला मनुष्य चांगला उतार वयापर्यंत जगतो, कारण देवीचे जंतु दुसऱ्या जंतूस येऊं देत नाहींत.

( ४ ) श्वासनलिकादाह (Bronchitis) जों पर्यंत फुफुसास धक्का नाहीं तों पर्यंत खोकत राहणारीं माणसें पुष्कळ वर्षे जगतात, खोकल्यानें रुधिराभिसरण चांगलें होतें.

( ५ ) डिस्पेप्शिआ— याचा रोगी मिताहारी होतो व त्यामुळें शतायुषीहि होतो.

( ६ ) दंतहीनता— दांत पडलेलीं माणसें हलकें अन्न खातात व त्यामुळें जास्त जगतात.

## सगळ्यांत मोठें

**मोठा हिरा**— 'गोविंद' हिरा नांवाचा आहे. त्याचें वजन ४६० कॅरट आहे. तो मध्यमशा दोतीएवढा आहे व त्याची किंमत सुमारें ९०,००० पौंड आहे. तो हल्लीं फत्तेपूरच्या राजाच्या ताब्यांत आहे.

**मोठा माणूस**— विलस राक्षस ब्रेनी नांवाचा आहे. स्विसर्लंडमध्यें पुष्कळ राक्षसी माणसें आहेत परंतु ब्रेनीच्या तोडीचा दुसरा कोणी नाहीं. त्याची उंची ९ फूट ७ इंच असून, त्याप्रमाणेंच त्याची जाडी व वजनही आहे. याच्या (पोषाखाच्या) एका सूटला १२ पौंड खर्च लागतो. त्याला रेलवेच्या डब्यांत शिरतां येत नाहीं तो आपलें प्रदर्शन करून दरसाल १२०० पौंड मिळवितो.

**मोठी संपत्ती**— अमेरिकेंतील तेलाचा व्यापारी--- ज्याला 'तेली राजा' असें म्हणतात— मि० राकेफेलर याची होय. त्याचें सालाचें उत्पन्न २५,००,००० पौंड असून एकंदर संपत्ति ७,००,००,००० पौंडांची आहे.

**मोठी आगबोट**— 'सेल्टिक' नांवाची आहे. त्या आगबोटीवर कोळसे ठेवण्याची जागा इतकी मोठी आहे कीं, त्यांत एक पलटण सहज राहूं शकेल. ती अटलांटिक महासागरावर एका नदीवरील नावे प्रमाणें हिंडत असते.

**मोठा मासा**— लठ्ठा म्हणजे व्हेलें माशाची 'रॉरकल' म्हणून एक जात आहे, त्या जातीचा मासा होय. तो पूर्ण वाढला म्हणजे त्याची लांबी १०० फूट असते. त्याच्या कमरेचा घेर ४० फूट असून त्याचा दांत निदान दोन हात लांब असतो. तो पाण्यांतून दर तासास ४० मैल प्रमाणें पोहत जातो. तो प्रकृतीनें चांगला असला, तर त्याला रोज १०० टन वजनाचे मासे खावयास लागतात.

**मोठें पुस्तक**— म्हटलें म्हणजे Worthy Bible या नांवचें आहे. तें औरस चौरस १० फूट असून त्याची जाडी २ फूट आहे त्याचीं पानें ३०,००० आहेत.

**मोठी इमारत**— केरो शहराजवळील चिआप्सचा पिरामिड होय. हा बांधण्यास १,००,००० माणसें ३० वर्षे खपत होतीं याची उंची ४५१ फूट असून यानें १३ एकर जमीन व्यापली आहे. त्याची प्रत्येक वीट म्हणजे ३ फूट उंचीचा दगडच आहे. क०

---

**आख्यायिका**— नाना साहेब हिंगणे, दिल्ली दरबारातील पेशव्याचे वकील, यांच्या वैभवाची अशी गोष्ट सांगतात कीं, ते यमुनेस स्नानास जातांना तीन लाख रुपये किंमतीच्या रत्नखचित सुवर्णाच्या खडावा पायांत घालीत असत.

**चहाचें यंत्र**— अबरडीन येथील एका गृहस्थानें एक चमत्कारिक यंत्र काढिलें आहे. या यंत्रांत चहा व पाणी घातल्या बरोबर लागलीच गरम चहा पेलाभर तयार होतो. चहा पिणारानीं अवश्य संग्रह करावा.

**शेक हॅन्ड करूं नका**— चुंबनानें स्वागत करण्यापासून सांसर्गिक रोग पसरण्याचा जितका संभव आहे तितकाच शेक हॅन्ड करण्यापासून आहे असे म्हणतात. शेक हॅन्डच्या मानासाठीं खटाटोप न करितां दुरून आपला साधा प्रेमळ सलाम व नमस्कारच करावा हें बरें. दुष्ट संसर्गानें अवगुण व रोग फार जडतात. काम क्रोध, उद्दाम वृत्ति, अधिकारमद हीं संसर्गानें तात्काळ अंगीं उतरतात म्हणून साधु पुरुषाच्याच हातांत हात घालावा, इतरास दुरून नमनच उत्तम होय.

**अद्भुत वैद्यकी**— सुमारें ६० वर्षांपूर्वी नदिया येथें जगन्नाथ नावाचा एक बंगाली वैद्य राहत असे. तो रोगावर नेहमीं चमत्कारिक उपचार करीत असे. एका रोग्यास दम्याचा उपद्रव झाला होता. त्याला त्यानें शेळीचें तूप देऊन, नाकाला अतिशय घाण येणारा एक बोकड रोज त्याचे खोलींत तीनदां आणीत असे. दम्याचा झटका आला म्हणजे रोग्यानें या बोकडाच्या गळ्यास मिठी मारावी, व निजतांना त्याचे अंगावर डोकें ठेवून निजावें ! या उपायानें तो मनुष्य लवकरच बरा झाला ! एकाचें कपाळ अतिशय दुखत असतां रानांतून एक साप धरून आणून त्याचे विषारी दांत पाडून तो त्यानें त्याचे डोक्याभोंवतीं गुंडाळला. कांहीं वेळानें साप मेला, पण त्याचें कपाळ दुखणें मात्र राहिलें ! मूत्र कोंडून एक मनुष्य अत्यवस्थ झाला असतां वरील वैद्यानें कांहीं जिवंत बेडूक धरून आणून त्याचे शरीरांतील पिळून काढलेला रस त्याचे बेंबीस लावला व एक जिवंत बेडूक पिशवींत घालून ती त्याचे बेंबीवर ठेवली. कांहीं वेळानें लघवी होऊन त्याचें पोट मोकळें झालें ! ही हकीकत कित्येकास अतिशयोक्तीची वाटेल; पण ती इंग्लंडांतील 'लॅंसेट' नांवाच्या प्रसिद्ध वैद्यकी पत्रांत प्रसिद्ध झाली आहे ! के०

**चमत्कारिक घोडा**— लंडन येथें अमेरिकेहून एक घोडा आणिला आहे. त्याचें शेपूट १९ फूट लांब आहे व आयाळ १२ फूट लांब आहे. याच्या शरीराचा १०,००० पौंडाचा विमा अमेरिकेहून आणते वेळीं उतरला होता!

## गमतीची टोपी

अलीकडे एक नवीन प्रकारची टोपी निघाली आहे. ही घातली असतां ओळखीच्या स्त्रिया वगैरे भेटल्या तर प्रत्येक वेळीं टोपी उचलावयास नको ! जरा मान हलविल्या बरोबर टोपी वर जाते आणि ज्या प्रमाणें टोपी उचलून सलाम होतो, तसा ही टोपी आपोआप सलाम करिते! मान सरळ झाली कीं, टोपी पुनः पूर्ववत डोक्यांत बसते ! मात्र घड्याळास ज्याप्रमाणें रोज किल्ली द्यावयाची त्याप्रमाणें ह्या टोपीसहि किल्ली द्यावी लागते. आतां पुष्कळ टोपीवाले हीच टोपी घेतील.

**बादशहाचा साधेपणा**— थोड्या दिवसांपूर्वी प्रिव्ही कौन्सिलामध्यें नवीन नेमलेले कौन्सिलर बादशहापुढें आपल्या हुद्याप्रमाणें काम करण्याची शपथ घेण्यास आले असतां त्यापैकीं पहिल्या मनुष्यानें तेथील गुळगुळीत तक्त पोशीवर गुडघे टेकून बादशहापुढें शपथ घेतली. या वेळीं त्या मनुष्यास वाकण्याचा त्रास झालेला पाहून बादशहानीं कोणाशी न बोलतां गुपचूप आपल्या हातानें एक स्टूल आणून तें शपथ वाहण्याच्या जागीं आणून ठेविलें. त्यामुळें बाकीच्या कौन्सिलरांस गुडघे टेकण्याच्या वेळीं त्रास न होतां बादशहापुढें शपथा घेतां आल्या.

**चांगला उपाय**— कांदे खाल्ले म्हणजे तोंडास घाण येते व ती कांहीं केल्या लवकर जात नाहीं. पण कांदे खाणें झाल्यावर थोडेंसें गोड दूध प्यालें तर त्यामुळें तो दर्प नाहींसा होतो. अनुभव पहाण्या जोगा आहे.

**खरी न्यायप्रीयता**— पांच वर्षांपूर्वी बंगाल्या कडील एका शिरस्तेदारास कांहीं अपराध नसतां घरीं बसावें लागलें. त्यांनीं अर्जावर अर्ज करून दाद मागितली पण उपयोग झाला नाहीं. शेवटीं लार्ड कर्झन यांज कडेस अर्ज दिला व पुढें लवकरच त्यांच्या मुलाकडून त्यांच्या हालविपत्तीचें हृदयद्रावक पत्र गेलें. तें पाहून कर्झन साहेबास फारच कळवळा आला व यांनीं आपल्या पदरचें ५०० रुपये पाठवून देऊन, चौकशी अंतीं त्या शिरस्तेदारास डिपुटी कलेक्टरची बढतीची जागा दिली.

**नीच कृत्य**— बोअर युद्ध संपण्यापूर्वी जे बोअर लोक स्वदेशद्रोह करून इंग्रजांस मिळाले होते, यांना स्वदेशद्रोहाच्या नीच कृत्याबद्दल डच लोकांच्या देवालयांत प्रार्थना करण्याला येऊं देऊं नये, व त्यांच्या मुलांस बाप्तिस्मा देऊं नये अशी डच धर्माधिकाऱ्यांनीं आपली आज्ञा प्रसिद्ध केली आहे.

REGISTERED N. No. 4

आकोल्यांतील लोकांस ................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास .........................॥ ऽ२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........॥ ऽ१ ऽ६
दुसरे वेळेस.... ....॥ ऽ१
बैं

ofussil ... ... ... 2 ( with postage )
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as,
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ,. 2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 9 MARCH 1903 NO 10

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ९ माहे मार्च सन १९०३ इ० अंक १०

## मी जगाकरितां नाहीं

ह्या विषयावरील आपल्या लेखासंबंधानें माझे जे आक्षेप होते त्याबद्दलचें पत्र आपण ता. ९।२।०३ च्या अंकांत प्रसिद्ध केलें ह्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. आपल्या लेखांतील विचाराशीं प्रतिकूल असे माझे विचार असूनही आपण ते प्रसिद्ध करण्याचें एक वेळ सौजन्य दाखविलें ह्यामुळें आजच्या खेपेसही त्याच प्रकारचें सौजन्य आपणां कडून मिळेल ह्या आशेनें सदर्हू विषयावरील आपल्या ता. २३।२।०३ च्या अंकांतील लेखास प्रत्युत्तरादाखल थोडासा मजकूर लिहिण्याचें धैर्य मी करितों.

'तारुण्य, विद्या, धन आणि एकंदरीनें सुस्थिति' ह्यांच्या योगानें अहंता माझ्या ठायीं आल्याबद्दल परवांच्या लेखांत जो मजकूर आहे त्यावरून सदर्हू मजकुराचे लेखक तारुण्याची मजल दूर गेलेले असे कोणी तरी वृद्ध गृहस्थ असले पाहिजेत अशी कल्पना करण्यास सबळ कारण आहे. सबब सदर्हू गृहस्थ मला माझ्या तीर्थरूपा प्रमाणें पूज्य आहेत. आपला पहिला लेख प्रसिद्ध झाला त्या वेळेसच जर ही गोष्ट मला कळली असती तर शंकाच दाखविण्याचें धाडस मी केलें नसतें. परंतु आतां ज्या अर्थीं वाद उत्पन्न झाला आहे, त्याअर्थीं परवाच्या लेखांतील मजकुरा विषयीं माझें जें मत आहे तें मी नम्रतापूर्वक सादर करितों. ह्यावरून आपल्या लेखकाचा उपमर्द करण्याचा माझा हेतू आहे असें न मानतां, "प्राप्ते तु षोडश वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्" ह्या म्हणीस अनुसरून माझे हे अल्प विचार त्यांच्या पुढें मी मांडीत आहें त्यांचा त्यांनीं शान्तपणानें विचार करावा. ह्यापूर्वीं त्यांच्या पहिल्या लेखावर जे आक्षेप मीं घेतले होते ते बहुतेक त्यांना पसंत असल्याचें त्यांनीं हल्लींच्या लेखात कबूल केलें असल्यामुळें, ह्या खेपेसही पुन: प्रत्युत्तर देण्याचें धाडस मी करतों. ह्या माझ्या प्रत्युत्तरावर आपल्या लेखकाकडून उत्तर येईल अशी मला पक्की खात्री आहे आणि ही गोष्ट वाजवीच होईल कारण तरुण आणि वृद्ध ह्यांजमधील वादांत अखेरचा शब्द वृद्धाचाच असणें योग्य आहे. सबब आजचा लेख ह्या विषया संबंधानें मजकडून शेवटलाच आहे एवढें आश्वासन मी देतों.

माझ्या संशयित वृत्तीबद्दल आपल्या लेखकांनीं अनुकंपा दर्शवून 'संशयात्मा विनश्यति' ह्या भगवद्गीतेंतील वाक्याची आठवण देऊन मजला योग्य इशारत दिली आहे, तिजबद्दल माझें असें ह्मणणें आहे कीं सॉक्रेटिस, अरिस्टॉटल व बेकन ह्या पाश्चिमात्य तत्ववेत्त्यांच्या मतें संशय ही ज्ञानाची पहिली पायरी होय, कारण संशयाबरोबर मनुष्याच्या मनात ज्ञान वाढविण्याची इच्छा वाढूं लागते त्याच प्रमाणें वेदांतांतसुद्धां ह्या जगताच्या यथार्थते विषयीं मनुष्याच्या मनांत विकल्प उत्पन्न होऊं लागला ह्मणजे परमार्थ ज्ञानाचा पहिला धडा तो शिकला असें वेदांती लोक समजतात. आपले 'गृहस्थ' किंवा 'नागरिक' कोण आहेत हें मला माहित नाहीं अशा आशयाचें जें विधान माझ्या पहिल्या लेखांत आहे तें सयास अनुसरून नाहीं असें आपल्या लेखकांचें प्रथमतः ह्मणणें आहे. असें ह्मणण्यास आपल्या लेखकाजवळ काय प्रमाणें आहेत ह्याचें अनुमान मला करितां येत नाहीं. मीं जें पूर्वीं विधान केलें आहे त्याच प्रमाणें माझ्या मनाची स्थिति हल्लीं आहे असें असून ह्याच्या उलट स्थिति आपल्या लेखकास कां भासते हें मला समजत नाहीं.

आपले 'गृहस्थ' शिक्षकाचा धंदा करणारे असावेत असें मीं कोठेंही ध्वनित केलें नव्हतें. असें असून आपल्या लेखकास च तशी शंका कां आली कोण जाणे! कदाचित् आपल्या लेखकाचे एखाद्या शिक्षक मित्राशीं फार सान्निध्य असल्यामुळें, ते स्वतः तदाकार होऊन दुसऱ्याच्या लेखांत ही त्यांनां आपल्या प्रिय मित्राचें प्रतिबिंब दिसलें कीं काय न कळे.

संशयित वृत्तीनें मला पछाडलें असल्यामुळें संशयापासून होणाऱ्या "उद्वेगापासून मुक्त" करण्याचा आपल्या लेखकांनीं जो उपक्रम केला तो पाहून मनास थोडी हुरूप येऊन मी सदर्हू लेखाचे चारही रकानें शान्तपणानें शेवट पर्यंत वाचले. परंतु अखेरीस मनाची निराशा झाली हें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. कारण ज्या मुद्या संबंधानें माझ्या मनांत शंका उत्पन्न झाली असें मीं ह्मटलें होतें ते सर्व मुद्दे बाजूस ठेवून "साशंकाचे बहुतेक विचार आह्मां स मान्य आहेत" ह्या एकट्या वाक्यावर त्या सर्व शंकांची बोळवण करण्याचा प्रस्तुत लेखांत आपल्या लेखकानें प्रयत्न केला आहे. आपले "गृहस्थ" कोणत्या सार्वजनिक कृत्यास मदत मागण्या करितां गेले होते ह्या प्रश्नाचें उत्तर सार्वजनिक कृत्या विषयींची कल्पना साशंका प्रमाणेंच नाहेरील जगतास असते अशा घरसोडीच्या रीतीनें देण्याचा आपल्या लेखकानें प्रयत्न केला आहे. सार्वजनिक कृत्या विषयीं निरनिराळ्या लोकांच्या कल्पना निरनिराळ्या असतात असें माझ्या अनुभवास येत असल्यामुळें कोणत्या कृत्यास मदत मागण्या करितां आपले 'गृहस्थ' 'नागरिका' कडे गेले होते ह्मणून विचारणा केली होती. तिला उत्तर मिळालें असतें ह्मणजे सार्वजनिक कृत्या विषयीं आपल्या 'गृहस्थां'ची कल्पना काय आहे व ती बरोबर आहे किंवा नाहीं हें कळण्यास मार्ग मिळाला असता. परंतु ही माहिती मिळाली नसल्यामुळें आपल्या 'गृहस्था'नें 'नागरिका'ला दिलेल्या दोषाच्या समर्थनार्थ आपल्या 'गृहस्थांच्या' किंवा आपल्या लेखकाच्या विधानावलीकडे दुसरा कोणताही प्रत्यंतरी पुरावा नाहीं. असो.

मनुष्यावर येणाऱ्या संकटाचें वर्गीकरण करण्याचे आपल्या लेखकानें जे श्रम घेतले आहेत त्याबद्दल अचंबा वाटल्या वाचून रहात नाहीं. तथापि त्या संबंधाचें विवेचन प्रस्तुत लेखांत केवळ अस्थानीं होय असें मोठ्या कष्टानें मला ह्मणावें लागतें. कारण दिवाळें काढणाऱ्या सावकारास किंवा त्याच प्रमाणें आपल्या हातानें आपणांवर संकट ओढवून घेणाऱ्या दुसऱ्या इसमास मदत करणें किंवा न करणें योग्य आहे हा वादाचा मुद्दा नसून, त्याना मदत करणें हें सार्वजनिक कृत्य आहे कीं काय हा वादाचा मुद्दा होता सबब पहिल्या मुद्यावर आपल्या लेखकानें जे विचार प्रदर्शित केले आहेत, ते प्रस्तुत वादाशीं केवळ असंबद्ध होत. सबब त्याबद्दल जास्त वाद न वाढविणें हेंच श्रेयस्कर होय. असो. पत्रविस्ताराबद्दल माफी असावी ही विनंती.

आपला.

साशंक.

---

## सुद्दाम वैश्य लोकांच्या हिता संबंधीं लेख ५

### वैश्य.

आपल्या शास्त्रांत मुख्य ४ वर्ण सांगितले आहेत. ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र. ह्यां पैकीं पहिल्या तिघांना द्विज ही संज्ञा आहे. वैश्य हा शब्द जातीदर्शक आहे. मारवाडी, बनिया वगैरे शब्द जे देशावरून व धंद्या वरून पडले आहेत. ते जाती वाचक असतां कामा नयेत. वैश्य हाच शब्द पुरातन आहे वेदांत व पुराणांत वैश्यच शब्द सांपडेल मारवाडी, बनिया वगैरे शब्द कोठेंच सांपडणार नाहींत. कित्येक लोक ह्मणतात कीं, जुन्या कित्येक जाती नष्टच झाल्या आहेत. परंतु वैश्य वर्ण कधींच नष्ट झालेला नाहीं. परशुरामानें क्षत्रिय वर्णाला नष्ट करून टाकिलें होतें. परंतु वैश्य वर्णासंबंधानें असें कोठेंच ह्मटलेलें नाहीं. जर हा वर्ण नष्ट झालेला नाहीं तर तो अद्यापवत अस्तित्वांत असलाच पाहिजे व शिवाय आमच्याहून दुसरे कोणी वैश्य असण्या बद्दल दावा करीत नाहींत. आमच्यांतील रीती, व्यवहार व यज्ञोपवीताचा अधिकार हें आमचे द्विजत्व सिद्ध करीत आहेत. ह्या वरून जर आह्मी ब्राह्मण व क्षत्रिय नाहीं तर वैश्य अवश्य आहोंत. धंद्या वरून व देशावरून आह्मांला बनिया मारवाडी वगैरे ह्मणूं लागले आहेत. जरी हल्लीं इतर जातींनींही व्यापारी धंदा स्वीकारिला आहे तरी देखील व्यापारी धंदा ह्मटला ह्मणजे मूळचा आमचाच व सध्यांही बहुतेक अंशीं आह्मी तोच धंदा करीत आहोंत. आतां जरी आमच्यांत पोट जाती पुष्कळ आहेत तरी त्या योगें आमच्या जातींत कांहीं एक फरक पडूं शकत नाहीं. ह्या पोट जातींचें कारण असें कीं आह्मा येथील राहणार ते अगरवाले. व ह्याच प्रमाणें माहेश्वरी, खंडेलवाले, ओसवाल वगैरे झाले आहेत. असेच आतां अगरवाल्यांतही पुतेड पुरिये, मुरादाबादी, बहादर गढीये, दिल्लीवाले वगैरे पोटभेद झाले आहेत. ह्यावरून कांहीं नवीन जात होऊं शकत नाहीं. आमचा असली धंदा वाणिज्य आहे ह्यांत कांहीं संशय नाहीं व वाणिज्य करण्यापासून आमचें नांव वणीक पडून गेलें आहे, नंतर हळूं हळूं त्याचाही अपभ्रंश होऊन बनिया हा शब्द झाला, परंतु बनिया हा शब्द आमच्या जातीचा दर्शक नाहीं. कारण बनिया शब्दा पासून जातीची ओळख होत नाहीं. जर एखादा मनुष्य हलवायाचा अगर सराफीचा धंदा करूं लागला तर त्याला आपण अनुक्रमें हलवाई अगर सराफ ह्मणतो. व जर एखाद्या खत्र्यानें भुसाऱ्याची दुकान घातली तर त्याला ही आपण बनिया ह्मणूनच ह्मणतो. बनिया हा शब्द वणिक् पासून झालेला आहे. जसे सोन्यापासून सोनार, लोखंडा पासून लोहार वगैरे, फक्त धंद्यावरूनच बनिया हें नांव पडलें असतें तरी हरकत नव्हती. आतां फक्त भुसाऱ्यालाच बनिया असें ह्मणतात, हुंडीचिठ्ठीच्या दुकानदारास बनिया ह्मणत नाहींत. व ज्या जातींचीं नांवें धंद्यावरून पडली आहेत ती द्विज नाहींत. जसें वाढी, सोनार वगैरे. त्याना वेदाध्ययनाचा अधिकार नाहीं. ह्याच प्रमाणें मारवाडांत राहतात ह्मणून मारवाडी. ह्यावरून बनिया व मारवाडी हे शब्द आमच्या जातीचे दर्शक नव्हत. ब्राह्मण मुखापासून, क्षत्रिय बाहू पासून, व वैश्य पोटापासून झालेले आहेत. ह्मणून शरिरा करितां जें काम पोट करितें तें काम आह्मी वैश्य देशाकरितां करितों. अशी आमची जात मुख्य ४ वर्णांपैकीं एक असून तीबद्दल ह्या प्रांताच्या गेल्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत जसा उत्तर हिंदुस्थानांत आहे त्या प्रमाणें कांहींच उल्लेख असूं नये ही खरोखर फार दुःखाची गोष्ट आहे. मारवाडांत राहणारा जसा एखादा अगदीं कनिष्ट जातीचा मनुष्यहि मारवाडी समजला जातो किंवा जसा एखादा भाजीविक्या त्याप्रमाणेंच आह्मी बनिये बक्काल समजले जावेत ही खरोखर फार दुःखाची गोष्ट आहे.

हें सर्व लिहिण्यास कारण मिरट्च्या माहा सभेकडून उपदेशक लवकरच इकडे येणार आहेत व ते रेल्वे लाइनी वरील बहुतेक लहान मोठ्या गांवीं जातीलच. परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं, ह्या प्रांतीं आमच्या जातीबांधवांची कोणत्या

गांवीं किती लोकसंख्या आहे हें कळण्यास गेल्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत मार्गच नसल्या कारणानें या लेखानें आमच्या सुज्ञ जातीबांधवांस अशी विनंती केली जात आहे कीं ज्या गांवीं आपल्या जातीची कमीत कमी ५०।७५ घरें असतील अशा प्रत्येक गांवांतील कोणी तरी या पत्राच्या आफिसांत 'एक मारवाडी' या नावानें पत्र पाठवून माहिती कळविण्याचा मेहेरबानी करावी. म्हणजे उपदेशकास त्या त्या गांवीं जाण्यास सोइस्कर होईल. तरी आमचे जातीबांधव ह्या कामाची उपेक्षा करणार नाहींत अशी आशा बाळगून हा लेख संपवितो. वैश्य.

## वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ११ शके १८२४

### रब्बी धान्य

पिकाचे दोन प्रकार आहेत. खरीप व रब्बी. खरिपाच्या पिकामध्यें कापूस, जवारी, तूर इत्यादि पिकाचा समावेश होतो आणि रब्बीच्या पिक मध्यें गहूं, हरबरा, तीळ, जवस, लाख, इत्यादि धान्यें येतात. ऋतुमानानें खरीप व रब्बी अशीं दोन नावें पडलेलीं आहेत. जीं पिकें वर्षऋतू मधील पेरणीनें येतात तीं पहिलीं पिकें होत आणि त्यालाच आरबी भाषेंत खरिफाचीं पिकें म्हणतात. त्यांचा पेरा वर्षाकालाच्या अखेरीला होतो आणि जीं पिकें वसंत पंचमीच्या सुमाराला येतात त्याला रब्बीचीं पिकें म्हणतात. ह्या प्रांताची मुख्य दौलत शेतकीवर आहे पण त्याच शेतकीचा ऱ्हास होत आहे असें आम्हांस वाटतें. या प्रांतांतल्या सारखी सुपीक जमीन फार विरळा आणि येथील शेती जर खराबीला येत चालली आहे तर ही गोष्ट मोठ्याच विचाराची आहे. ही जमीन अशी आहे कीं जें पेरावें तें येथें पिकेल. आणि त्याच उत्कृष्ठ गुणामुळें या प्रांतीं खरीफ व रब्बी हीं दोन्हीं पिकें सालोसाल घेण्याची वहिवाट पडली आहे; परंतु अलिकडे असा प्रकार झाला आहे कीं, खरिपाचा पेरा फार वाढला असून रब्बीचा पेरा अगदींच थोडा होतो. वर्षानुवर्षे हा पेरा कमी कमी होत आहे ही दुःखाची गोष्ट होय. मूळचा नियम असा होता कीं, शेतकरी आपल्या जमिनीचे दोन भाग करून एका भागांत खरिफाचें पीक घेई व दुसऱ्या भागांत रब्बीचें पीक घेई, आणि फेरपाळीनें रब्बीच्या भागांत खरीफ व खरिफाच्या भागांत रब्बी अशी पिकांची सालपाळी करीत असे. पण आतां खरिपाच्याच दोन जातीच्या पिकामध्यें जेथें कापूस तेथें जवारी व जेथें जवारी तेथें कापूस अशी साधारण फेरपाळी ठेवण्यांत येते. पुष्कळशा भागातून रब्बीचा मागमूसच नाहीसा होईल अशी भिती वाटते. रब्बीचा पेरा सोडण्याला कारणें दोन प्रकारचीं झालीं. गेल्या पांच सात वर्षांतील पावसाचा अनिश्चितपणा व दोन अवर्षणें हें पहिलें कारण होय.

लोकांस पावसाचा भरंवसा वाटत नाहीं व म्हणूनच त्यानीं रब्बीचा पेरा अजिबात बंद केला. त्या शिवाय दुसरें कारण असें कीं कापसाचें पीक जलदी हातीं लागतें आणि गरिबांच्या दिवसांत पैसा जितका लवकर दृष्टीस पडेल तितका पाहिजे असतो. रब्बीचें पीक घेण्याचा रिवाजच मोडत चालला आहे आणि त्यामुळें अलिकडे गहूं, हरबरा वगैरे धान्यें बाहेर प्रांतांतून वऱ्हाडांत येतात. रब्बीच्या धान्याला किंमत चांगली येते आणि यांतील गळिताचीं धान्यें म्हणजे जवस, तीळ वगैरे यांचा बाजार फार दांडगा असे; पण कालमानानें हें चक्र अगदीं फिरलें आहे. सध्यांचा सरसकट मार्ग म्हणजे असा कीं, कापसाच्या उत्पन्नावर सरकारी सारा व इतर वार्षिक खर्च हे भागवावेत. व जवारीच्या पिकावर वर्षभराची बेगमी करावी. हा धारा सर्व प्रांतभर सारखाच दृष्टीस पडतो. कापसाचा पेरा अतिशय वाढला आहे आणि त्या मानानें रेचांच्या यंत्राचे कारखानेंही पुष्कळ निघाले आहेत. रब्बीच्या व खरिपाच्या पिकांच्या फेरपाळीनें जमिनीमध्यें चांगला कस राहत असे तो उत्तरोत्तर कमी होत आहे. जमिनीची कष्टमशागत देखील चांगलीशी होत नाहीं. खरिपाच्या पिकाला साधारण मेहनत पुरी होते पण रब्बीच्या पिकाची गोष्ट थोडी निराळी आहे.

खरीप व रब्बी यांच्या पिकांचे कांहीं आंकडे आम्ही मुद्दाम पडताळ्यासाठीं देत आहों. या प्रांताचें क्षेत्रफळ १,१३,९६ २७१ एकर आहे. त्या पैकीं ८२६२,६६२ एकर जमीन लागवड करण्या सारखी आहे व या पैकीं शेंकडा ९७.६ एकर जमीन पूर्वींच लागवडींत येऊन चुकली आहे जी जमीन लागवडी खालीं आहे त्या पैकीं शेंकडा ८७.१ एकर जमिनीवर एकंदर पेरा झाला आहे. दहा वर्षा पूर्वीं जवळ जवळ तीन हिस्से खरीप तर एक हिस्सा रब्बी होती, पण अलिकडे आठ हिस्से खरीप तर कोठें एक हिस्सा रब्बी असे. या दोन्हीं पिका संबंधानें कांहीं तपशिलाचे आंकडे येणें प्रमाणें:—

खरीफ

| | एकर |
|---|---|
| जवारी | १८,८४,८७५ |
| कापूस | २६,८३,२९९. |
| तूर | २,४०,८२० |
| रब्बी | |
| गहूं | २,८१,२६३ |
| हरबरा | १,५३,२०९ |
| तीळ | १,२८,४२० |
| जवस | १,९१,३०६ |

सरासरी मुख्य पदार्थांचें प्रमाण पाहतां रब्बीच्या दसपटीनें खरिपाचा पेरा आहे. रब्बी संबंधानें होत असलेलें दुर्लक्ष्य मोठें घातुक आहे पण या रब्बीच्या अभिवृद्धी विषयीं सरकारांनींच काळजी घेतली पाहिजे लोकांच्या हातीं म्हणण्या सारखा उपाय नाहीं. लोकांची प्रवृत्ती रब्बीचा पेरा करण्याकडे होईल अशी तजवीज सरकारांतून झाली पाहिजे. जो रब्बीचा पेरा करील त्याला साऱ्या संबंधानें जमिनीच्या मानानें कांहीं विशेष सूट देण्यांत आली पाहिजे आणि रब्बीचें पीक बुडालें तर सरकारांतून साऱ्याची माफी पीक पाहून देण्यांत आली पाहिजे. सध्यां एकंदर वायद्याचें उत्पन्न ७७ लक्ष रुपये आहे. तें उत्पन्न नवीन धारा सर्वत्र अंमलांत आला म्हणजे १९०४ सालीं सरकारी साऱ्याचें उत्पन्न ९३ लक्ष रुपये होईल. असें उत्पन्न दाटें वाढणार आहे तेव्हां रब्बीचा पेरा लोक अधिकाधीक करितील अशा सवलती देणें सरकाराला कांहीं कठीण नाहीं. ही गोष्ट निव्वळ सरकारच्या हातची आहे. लोक गरीब फार झाले आहेत. त्यांस रब्बीचा पेरा करण्या विषयीं उपदेश करण्या पासून कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं. वऱ्हाडच्या शेती संबंधानें आम्ही जो ऱ्हासाचा प्रकार वारंवार लोकदृष्टीस आणीत आहों त्या संबंधानें सरकार अवश्य चांगलासा योग्य विचार करील व सांपतच्या ऱ्हासाचीं कारणें दूर करील अशी आम्ही आशा बाळगतों.

---

### दहशत

सरकारी कायद्याला लोक किती भितात याचें उदाहरण नुकतेंच घडलें. यंदा सरकारी सारा जितका लवकर वसूल झाला तितका पूर्वीं कधींच वसूल झालेला नाहीं. १५ फेब्रुवारी ही तारीख खरिपाच्या वायद्याची होय. या तारखेच्या आंत किंबहुना दोन चार दिवस पलिकडे इतक्या मुदतींत सरकाराचा सारा लक्षावधि रुपये अगदीं तत्काळ वसूल झाला. यंदाचें वर्ष फार अबादानीचें गेलें व पिकाची मोठी समृद्धि झाली म्हणून लोकानीं भराभर सरकारी देणें चुकतें केले असा मात्र अर्थ नाहीं. यंदा पुष्कळ जणांस खरिपाच्या पिकानीं धोका दिला आहे. तथापि सरकारी पैसा मुदतशीर अगदीं पै न पै चुकता झाला ही आश्चर्याची गोष्ट होय. असा वायदा वसूल करण्याचा चमत्कार पूर्वीं कधींच दृष्टीस पडला नाहीं खरोखर चमत्कार तो कसला! प्रस्तुतची आगंतुक कारणें अशींच जबरदस्त आहेत. लोकांस माहित झालें आहे कीं, हा प्रांत मुंबई इलाख्याला जोडला जाण्याचा संभव अधीक आहे. मुंबईकडे जमिनीचा कायदा फार कडक आहे व साऱ्याची मुदत चुकली तर जमीन हिरावून घेतात. हा प्रांत मुंबईला दिलाच तर कदाचित् आपली जमीन जाण्याची गदा प्रथम येईल अशी दहशत पडली होती. मुंबईच्या संसर्गाचा उल्लेख इतका बाधक झाला! त्या शिवाय वायदा वेळेवर जो कोणी न देईल त्याच्याकडून सवाईनें वायदा वसूल करण्यांत येईल असा नियम यंदा अंमलांत येईल अशीही मोठी भिती होती. सवाईच्या नियमानें लोक अगदीं घाबरून गेले आणि त्यानीं हजार गोष्टी बाजूला ठेवून सरकारी सारा चावडीवर दाखल केला. ही गर्दी लोकांस मोठीच दुस्तर वाटली. सरकारी कायदा या पुढें कडक सक्तीनें अंमलांत आणिला जाणार नाहीं असें सरकारी आश्वासन पाहिजे. म्हणजे रयतेला वायद्याच्या तारखेचा इतका जुलूम होणार नाहीं. लोकांच्या भितीला सरकारानीं धळ देऊं नये एवढीच आमची विनंती आहे. रब्बीचा वायदा अजून पुढेंच आहे पण त्या तारखेच्या पूर्वींच सारा पुष्कळसा वसूल झाला आहे ही गोष्ट लक्ष्यांत धरण्यासारखी होय.

---

### प्लेग

बुलढाणा, आकोला व उमरावती हे तीन जिल्हे प्लेगाच्या सपाट्यांत पुरे आले आहेत. रेसिडेन्सी आरडर्स मध्यें एकामागूनएक अशी प्लेगानें ग्रस्त झालेल्या गावांची यादी प्रसिद्ध होत आहे. कोठें कमी व कोठें जास्ती हाच काय तो फरक दृष्टीस पडतो. लोक हवालदील झाले आहेत आणि कांहीं काळाच्या परिचयानें जी निराशा येते ती मृत्यूची भीतीच दूर करील असा रंग दिसतो. दुःखांत सुख इतकेंच कीं सध्यां खामगांव, शेगांव, बाळापूर वगैरे भागांत प्लेगाचें मान उतरलें आहे. ज्या त्या ठिकाणीं पुष्कळच संहार झालेला आहे तेव्हां तेथें मृत्यूचा उत्कापात फारसा होत नाहीं हें ठीकच आहे. बुलढाणें जिल्ह्यांतील चिखली, मेहकर कडील बातम्या फार शोचनीय आहेत. उमरावतीला या रोगाचें ठाणें बसणार आहे म्हणा किंवा बसलें आहे म्हणा. इलिचपूर, वणी व वाशीम या जिल्ह्यातील पुष्कळसा भाग सुखी व आनंदी आहे आणि ईश्वर कृपेनें तो तसाच राहो. सध्यां मृत्यूच्या पर्वतानें आपलें ज्वालामुख पसरलें आहे तेव्हां या आहुतींत किती भागाचा ग्रास होणार आहे हें एका परमेश्वरालाच ठाऊक! हल्लीं लोकाचे दील ठिकाणावर नाहीत व जो तो आपल्या कुटुम्बीय माणसाच्या जिवाची काळजी वहात आहे.

प्लेगाच्या मृत्युचे आंकडे देण्याचा आम्हाला कंटाळा वाटतो; आणि ते आंकडे गोळा करण्याचे श्रमही घेऊं नयत असें वाटतें. आमच्या आकोल्यास नदीच्या पूर्व भागांत दररोज १०।१२ माणसें प्लेगानें मरतात. नदीचा पश्चिमतीर सुरक्षित आहे अशी समजूत होती पण प्लेगानें मार्गा नदी ओलांडली असें दिसतें. गेल्या दोन तीन दिवसांत या भागांत कांहीं मृत्यु प्लेगामुळें झाले. के० बापू साहेब पटवर्धन वकील याचा एक जवान सहृद आप्त राजश्री नागोराव हा दोन दिवसांच्या तापानें वारला. तसेच आणखी दोन मृत्यु श्रीराजेश्वरच्या वेटाळ्यांत झाले. पुष्कळशीं खेडींपाडींही रोगानें ग्रासलीं जात आहेत. या प्लेगापुढें प्रत्यक्ष मृत्यूचें देखील कांहीं चालणार नाहीं. असा हा भयंकर रोग दत्त म्हणून उभाच आहे. ईश्वरावर हवाला हा पहिला उपाय होय. हा हवाला सोपवितांना मनाची पवित्रता राहील असें सद्वर्तन ठेवावें. ही गोष्ट चांगली वठली याची खूण हीच कीं, मरणाची भिती न वाटतां मनाची समाधान वृत्ति राहील. स्थानत्यागाचा दुसरा उपाय प्रत्येकानें होतां होईल तितका अवश्य करावा. या शिवाय गृहशुद्धता होमहवनादिकानीं करण्याची जुनी चाल फार हितकारक आहे. ऊद, डांबर गंधक, इत्यादि हवेची शुद्धि करणारीं द्रव्यें फिनाईलच्या पाण्यामध्यें माळून गृहें शुद्ध ठेवावीं. ओलसर जागा राहूं देऊं नये. चिलट, मच्छर वगैरे कमी होतील त्या रितीनें कमी करावे. या साधारण गोष्टी

पुष्कळांस माहित असतात परंतु त्या कोणी बरोबर नियमानें करीत नाहींत ह्मणून ही सूचना आह्मी दर आठवड्याला पुनः पुनः करीत आहों.

## OURSELVES

Our subscribers will, we hope allow us the usual Holi holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 16th. current.


# The Berar Samachar

MONDAY MARCH 9 1903


The Administration Report of Berar for 1901—02 is a valuable document. It gives a bird's view of the past and present history of this province. It is written by an able writer and contains a good many points of general interest and public usefulness. There is an effort to chronical the progress of the province in the different branches of administration and we read with delight the historical events connected with the province. We have come to the threshold of a new administration and the report is an interesting reading in so far as it leads us to that stage of transition which will open a new chapter in the history of the province. The archeological portion of the report deserves a special consideration as it creates a sort of new interest in whatever it adds to the information that is given in the Berar Gazetteer. This year's report is rather like an encyclopædia of this province. We welcome this feature of the report and wish, to do justice to it in our marathi columns. But we cannot help noticing in this acknowledgement of the Administration report the official view of the condition of the people. We however, differ from it on all points. The official view differs very much from that of the public. They are diametrically opposite. The Government and the people stand at the opposite ends of the pole. There is prosperity on all sides in the eye of the Government whereas poverty meets and frustrates the efforts of the people in all walks of life.

The first point in the official view of the condition of the people refers to the internal recuperative power of the people. Famines come and go and in spite of those adverse times, the people are able to stand again and to bask themselves in the sun of their old prosperity. We affirm that there was no staying power in the people and it was on this account that, at the first touch of famine, the relief—works were crowded with thousands of people. There was plenty of food—stuffs available in the market but the people had no money to pay for them. Starvation and privation drove people to the relief—camps where they went through the mere formulæ of life. The horrible returns of mortality will point to the down trodden condition of the people in the famine—times. The economic position of the people was as bad as any thing. The Government is financially sound and rich but that does not mean that the people who contribute to the riches of the state are similarly rich, and economically flourishing. The stories of the hoarded wealth of the people could not stand the test of famines and they proved untrue. It will be further remembered that lands also did not fetch as great prices as they did in times of a good harvest. People in numbers offered their lands for sale but there was not found a sufficient number of purchasers. The argument of the recuperative power falls to the ground. There is the second argument about the high appreciation of the landed property. Agricultural land was sold at fabulous prices and hence it is argued that people are well off and can pay heavy prices for a field. This is certainly a fallacy if we remember wage—famine which is the rampant evil of this province as well as of the rest of India. Agriculture is over—crowded for want of employments in other branches of industries and this is the reason why undue competition and jealous rivalries enhance the prices of land beyond proper limits. Besides the heavy rates of interest mean a bad credit of the people with the money—lenders. The poverty of the masses can be gauged from the too frequent transfers of occupancies from the hands of the families which have lost their ancestral lands in consequence of their stern poverty. Land does not yield such fair crops as will justify this heavy strain of competition and the rise in the prices thereof. We fail to see the logic of the official view of the prosperity of the people. Foreign capital in the shape of railways, telegraphs and other public works of communication has contributed to the exploitation of the province but it is a very doubtful gain in so far it is over—crowds the profession of agriculture and spoils its rightful margins of profit. The third argument about the easy and speedy recovery of the land—revenue has no substance in it and we have shown its futility in our Marathi—columns.

## वऱ्हाडवृत्त

सुटी--- होळिकापूजनाच्या उत्सवा निमित्त आमचें आफिस बंद राहील आणि यामुळें तारीख १६ मार्च १९०३ च्या वऱ्हाडसमाचाराचा अंक निघणार नाहीं.

हवामान— दोन दिवसा पासून थंडी विशेष पडूं लागली आहे. काल दिवसा ९ वाजण्याच्या सुमाराला ७२ अंशावर पारा होता. उष्णकाळाला प्रारंभ झाला होता पण पुनः ही पिछेहाट झाली. ही थंडी हवा चांगली आरोग्यकारक दिसते पण प्लेगाला जोर आला असून हिंवतापाचे आजार पुष्कळ वाढले आहेत. ईश्वर जो दिवस दाखवील तो खरा!

मे० कुमार श्री हरमामजी डेपुटी कमिशनर हे उद्यां अकोट तालुका पुरा करून पुढील मुक्काम जळगांव तालुक्यात करितील त्या मुक्कामाची यादी येणें प्रमाणें:—

| तारीख | मुक्काम |
|---|---|
| ११ मार्च | टुणकी जहागीर |
| १२।१३ | संग्रामपूर |
| १४ | मडाखेड |
| १५।१६ | गाडेगांव |
| १७ | अडूळ |
| १८ | धानोरा |
| १९ | सुनगांव |
| २० ते २३ | जळगांव |
| २४ | कवठळ |
| २५ | पातुर्डी |

मे० निजमुद्दीन साहेब बी. ए. बी. एल. डेपुटी कमिशनर हे वऱ्हाडांत परत आले असून वणी जिल्ह्याच्या मुख्य अधिकारावर रुजू झाले.

रा. रा. विष्णु रंगनाथ शेवकर, तहशिलदार, आकोला यांची बदली दारव्हा तहशिलीवर झाली आहे आणि येथें रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. तहशिलदार हे आपली रजा संपल्या नंतर आकोल्यास येऊन दाखल होतील.

उद्या पासून मे. इलियट साहेब पेनशनदार होणार होते पण त्यांच्या चाकरीची मुदत चालूं महिन्याच्या अखेरी पर्यंत वाढविण्यांत आली आहे असें प्रमोदसिंधुकर्ते कळवितात. साहेब बहादुरांची अखेरची मुलाखत घेण्याची ही उत्कृष्ठ संधी मिळली असून तिचा धनावादी मंडळी अपव्यय होऊं देणार नाहीं.

वऱ्हाडांत ३९ हायकोर्ट वकिलांस व ९३ दुय्यम प्रतीचे वकिलांस चालू सालासाठीं सनदा देण्यांत आल्या. हैदराबादेस १० हायकोर्ट वकील व ३ दुय्यम वकील आहेत.

हास्पिटल असिस्टंट तयार करण्याचा वर्ग हैदराबादेस आहे. त्या वर्गांत ५ विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. त्यांची निवड करण्यासाठीं १५ एप्रिल रोजीं उमरावतीस उमेदवाराची परिक्षा घेण्यांत येईल.

मि० इलियट साहेब कमिशनर यांस सी. आय. इ. किताब मिळाल्या बद्दल उमरावतीच्या रेल्वे स्टेशनावर त्यांस मुनिसिपल मानपत्र देण्यात आलें होतें. तींच मानपत्रें यथासांग अर्पण करण्याचा समारंभ गेल्या सोमवारीं झाला. परिपाठाला अनुसरून स्तुतिपाठ झटल्या नंतर मि. इलियट साहेबांनीं दिलखुषी कळवून सर्वांचे आभार मानले. साहेब बहादूर ३५ वर्षांच्या चाकरी नंतर लवकरच जात असल्यामुळें या समारंभात विशेषच प्रेमपूर सुटला होता.

मे० इलियट साहेब यांस येथील युरोपियन क्लबांत गेल्या गुरुवारीं बडा खाना देण्यांत आला.

### नोटीस

बेशमी पुती मर्द गंगाराम लोहार राहणार टाकरखेड तालुके मलकापूर इसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझे व माझे लग्न होऊन सुमारे १६ वर्षें झालीं. अलिकडे पांच वर्षें झालीं मी तुला नेण्यास पुष्कळ वेळां आलों असतां तूं येत नाहींस, तुझा विचार माझे मताशिवाय दुसरा घाटाव करण्याचा आहे असें मला पक्के समजलें आहे. असें करणें तुला योग्य होणार नाहीं. तर तुझे आंगावर माझे सरासरी पाऊणशें रुपयाचे डागिने आहेत त्या सहित ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आत माझे घरीं नांदण्यास यावें. मी तुला वागविण्यास तयार आहें. तुला दुसरा घरठाव करणें असल्यास माझे डागिन्याबद्दल ७५ पाऊणशे रुपये व लग्नाबद्दल लागलेला खर्च अजमासे ३०० एकूण रुपये ३७५ हे मजला देऊन माझे हातची पावती घेऊन फारकती द्यावी. असें न केल्यास मी रीतशीर कोर्टांत फिर्याद करून तुला ताब्यांत घेईन आणि माझे मताशिवाय तूं दुसरा घरठाव करशील तर मी तुझेवर फौजदारींत फिर्याद करीन. कळावें, तारीख ८।३।०३ इसवी.

सही
गंगाराम व० मारोती लोहार
राहणार चिखलगांव ता. आकोला निशाणी हातची खुद्द

### नोटीस

रा. रा. नागसी लद्धा भाटे दुकान आकोट तालुके मजकूर जिल्हा आकोले यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं माझा बाप विठोबा बल्लद भिवाजी पाटील वस्ती मौजे पिंपरी तालुके आकोट यांनीं तुम्हास रकम १०० व ३०० एकूण अकराशे रुपयांचे तारेगहाणखत लिहून दिलें. व्याजांत पीक घण्याची शर्त आहे. माझा बाप मेत असून मजला १ गणू, २ पांडू, ३ घोराजी, ४ सुरेभान चार बंधू असून मी सर्वांत धाकटा आहे. सन १८९९ सालास मोठा दुष्काळ झाला त्यावेळीं तुम्ही माझे वरील चार बंधूपासून वरील तारेगहाणातील स्थावर शेतें माझा हिस्सा सोडून खरेदी घेतली आहेत मी माझे हिशाची रकम दोनशें वीस २२० रुपये तुम्हास देण्यास आणली असतां तुम्ही घेतली नाहीं. यास्तव तुम्हास कळविण्यात येते कीं तुमची सदरहू रकम रुपये २२० बानवें बीस रा. बावन पाटील साहू दुकान वारूळ तालुके आकोट यांचे दुकानीं तुम्हास देण्यास जमा केले आहेत ते तुम्ही घेऊन माझे हिशाचा हवावर चा ताबा सोडावा. या प्रमाणें आजपासून एक महिन्याचे आत न केल्यास माझे हिशाचे जमिनीचे पिकाची जी नुकसानी होईल त्यासह ताबा घेण्याचा कोर्टमार्फत दावा करणार नाईल. हे आपणास कळावें तारीख ७।३।१९०३

(सही) पुनाजी बल्लद विठोबा पाटील
वस्ती मौजे पिंपरी तालुके
आकोट निशाणी खुद्द.

### नोटीस जाहीर

नोटीस न्यामतला वल्लद मस्तेजा मुसलमान राहणार मौजे हातरूण तालुके बाळापूर जिल्हे आकोले यास:—

खालीं सही करणार जयनबबी मर्द महमद यासीन जमादार राहणार मौजे हातरूण तालुके बाळापूर जिल्हे आकोले इजकडून कळविण्यात येते कीं तुम्हास मी सुमारें १ वर्ष होत आलें मुखत्यारपत्र सर्व कामाचें दिलें होतें. पण आता मजला तुमचे कोणतेच कामाची जरूर नाहीं. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मी तुम्हास दिलेले मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द करण्यात आलें आहे. या पुढें तुम्ही कोणतेही माझे तर्फेनें काम केल्यास मी तुमचे पासून नुकसानी बदल खर्च भरून घेईन. दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. कळावें तारीख ८।३।१९०३

(सही) जयनबबी मर्द महमद यासीन
जमादार राहणार हातरूण
निशाणी खुद्द हातची बागडी

## वर्तमानसार

दृष्टी चमत्कार— मँचेस्टर येथें एक बाई आहे, तिच्या डोळ्यानें सर्व पदार्थ पन्नासपट मोठे दिसतात.

चिलटांचा बंदोबस्त— जमिनीवर राकेल शिंपडलें असतां चिलटें तेथें येत नाहींत असें ह्मणतात. कल्पना बरोबर दिसते. अनुभव पहावा.

अमेरिकन पार्लमेंटचा ठराव— अमेरिकेच्या पार्लमेंटमध्यें हल्लीं असें एक बिल आलें आहे कीं कोणत्याही अमेरिकन मनुष्यानें २० लक्ष पौंडापेक्षां अधिक मिळकत मिळवूं नये. यावर कोणाची मिळकत असल्यास सरकारनें ती जप्त करावी. आपल्याला अशा बिलाची भितीच नाहीं.

जबरदस्तीचें लग्न— मौलमीन येथील डॉ० व्यंकटस्वामी यांच्या मुलीचें लग्न मि. मुदिहा नांवाच्या गृहस्थाशीं व्हावयाचें ठरल्यावरून लग्न समारंभास मंडळी जमली या जमलेल्या मंडळींत मि. द्रामालिंगम मुदलियार नांवाचे गृहस्थ आपल्या अविवाहित कन्येसह तेथें आले होते. तिकडील प्रांतांत सर्व लग्नविधींत वधूच्या गळ्यांत वरानें थाली बांधण्याचा विधि मुख्य होय. हा विधी चालूं असतांना लग्नसमारंभास जमलेल्या सर्व मंडळीचें लक्ष तिकडे लागून राहिलें होतें अशा गडबडींत एक गृहस्थ हलकेंच धिटाईनें पुढें होऊन त्यानें लोकांची नजर चुकवून मि० द्रामालिंगम यांच्या कन्येच्या गळ्यांत आपल्या खिशांतील थाली बाहेर काढून बांधली या मुलीवर या धीट गृहस्थाचें पुष्कळ दिवसांपासून लक्ष होतें. परंतु यांच्याशीं तिच्या लग्नाचें जुळेना. तेव्हां त्यांनीं ही युक्ति अमलांत आणली. एकदा गळ्यांत थाली बांधली गेली ह्मणजे लग्न कायम झालें अशी तिकडे चाल आहे यामुळें या थालीविरुद्ध वर्तन करण्यास कोणाचें धैर्य होईना. तेव्हां शेवटीं तें धिटाईनें लागलेलें लग्न कायम करावें लागलें. थाली बांधण्याचे वेळीं लोकांत थोडी गडबड उडाली पण कार्य उरकून गेल्यावर कोणाचाच कांहीं इलाज चालेना. अशा रीतीनें हें लग्न शास्त्रोक्त ठरलें.

प्लेगजंतू मारण्याचें यंत्र— काश्मीरचे चीफ मेडिकल ऑफिसर मि. सॉहने यांनीं १०२ डिग्री उष्णता तयार करण्याचें यंत्र काढिलें आहे व त्याच्या उष्णतेनें घरांतील प्लेगजंतू मारतां येतात असें ह्मणतात. अग्निनारायण सर्व भक्षकच आहे. त्याचे पुढें कोण जीव धरणार !

मरीमाता— मुंबईस वर्ळी येथें वैश्य वाण्याची एक बाई आली आहे. तिचें महात्म हल्लीं फार वाढलें आहे. ती काळीमाता आहे आणि ती प्लेगच रोगी बरे करिते अशी लोकांची समजूत आहे. गेल्या शिवरात्रीस २००० लोक तिचे दर्शनासाठीं जमले होते. ती ह्मणते कीं, सरकारानें चार मेंढरें व २ कोंबडे आणि एक हंडीचा भात जर कलकत्याच्या कालीस अर्पण केला तर प्लेग येणार नाहीं. ती प्लेगचे बुधो चोळते ह्मणतात. औषधोपचार झालेल्या किंवा औषध घेणाऱ्या रोग्यास मी बरें करणार नाहीं असें ती ह्मणते. असें तिचें खूळ हल्लीं मुंबईस माजलें होतें. तिजवर पोलिसांनें खटला केला आहे.

भोळा भाव— संगमेश्वर तालुक्यांतील पिरंदवण येथील रा. शिवराम दाजी मुळे नांवाचे गृहस्थाचा मुलगा आजारी पडला होता. त्यास बरें करितों पण त्याचे वरून पांचशें रुपये किंमतीचे दागिने उतरले पाहिजेत असें सांगून तीन सोद्यांनीं त्यांस भुरळ पाडली. या बिचाऱ्यानें घरांतील किडुकमिडुक गोळा करून दागिन्यांची भरती केली. ते दागिने मडक्यांत घालून या आजारी मुलावरून उतरून त्याच खोलींत तें मडकें पुरलें, आणि ते लोक निघून गेले, ते परतले नाहींत. तेव्हां त्या गृहस्थास संशय आला व मडकें उकरून पाहतो तों दागिने नाहींत! दागिने त्या धूर्तांनीं तेव्हांच हातचलाखीनें लांबविले. या बिचाऱ्याचे भोळेपणाची कींव येते.

कसबी लोक— वायव्य सरहद्दीपलीकडील पठाणांतील मिसरी लोक हे खोटे रुपये पाडून पाठवितात. हे फार कुशल आहेत. ब्रीचलोडिंग बंदुकांतील यंत्रेंही ते तयार करतात.

बाळंतिणीसाठीं— मुंबईतील प्रसिद्ध मुसलमान व्यापारी अदमजी पीरभाई यांनीं एक लाख रुपये खर्चून बाळंतपणासाठीं एक नवें इस्पितळ आपल्या पत्नीच्या स्मारकार्थ तयार करण्याचें ठरविलें आहे.

अभिनंदन— रा. परांजपे सीनियर रँगलर व बाबू सुधांशु मोहन बोस यांस केंब्रिज युनिव्हर्सिटीनें एम. ए. ची पदवी दिल्याचें पत्रिकेवरून समजतें.

सायबेरियन रेल्वे— या रेल्वे वरील गाड्यांची व्यवस्था उत्तम असून त्यांत जेवावयाचा एक मोठा डबा, तालीम करण्याचा एक डबा, स्नानगृहें, लायब्ररी वगैरेची सोय असते. शिवाय बाहेर हवेंतील उष्णता शून्य अंशाचे खालीं गेलेली असली तरी डब्यांतील हवा वाफेनें गरम ठेवतां येते.

आगींत जाहिरात— एका सार्वसंग्रहिक दुकानाला एक वेळां आग लागली. याची बातमी सगळीकडे पोहोंचून जिकडून तिकडून इंजनें येऊन आग विझविण्याची खटपट जारीनें सुरू झाली. अर्थातून सर्व ठिकाणचे लोकही तेथें जमा झाले. पुढच्या बाजूनें तर आग विझून मागच्या बाजूवर पाण्याचा भडिमार सुरू झाला. इतक्यात त्या दुकानचा म्यानेजर धांवत धांवत त्या पुढच्या बाजूनें वळ्यांत शिरला. आणि त्या तितक्या संकटांतून धडाड करीत माडीवर गेला. अशा तऱ्हेनें जाऊन आपला जीव धोक्यांत घालण्याचा याचा हेतु तरी काय? असा कोणचा मोलवान् माल काढण्यासाठीं हा आपल्या जीवावर उदार झाला आहे, याचें लोकांस आश्चर्य वाटून लोक तिकडे पाहूं लागले तों तो धाडसी गृहस्थ आगींतून धडपड करीत खिडकीपाशीं आला आणि त्यानें मोठमोठ्या अक्षरांची अगदीं ताजी लिहिलेली अशी जाहिरात पसरून धरली! तीवर पुढील मजकूर होता:— “ आह्मी आजपर्यंत सर्व प्रकारचा माल अगदीं स्वस्त विकला. परंतु ही आग विझल्यावर वांचलेला माल किती स्वस्त विकूं याची प्रचीती लोकांनीं पहावी. उद्यां किंवा परवां दुकानीं या ” शाबास. याला ह्मणतात धाडस व युक्ती.

कागदाची कला— कागद करण्याची कला प्रथम चीनमध्यें निघाली. चिनी लोक कळकांच्या सालींचे कागद करीत होते. ही कला त्या देशामध्यें इ० सनापूर्वी १२३ वर्षें निघाली ह्मणजे आज मितीस २००० वर्षें झालीं !

खरें होवो— लार्ड कर्झन साहेबांची मुदत येत्या डिसेंबरमध्यें संपते. ही मुदत राजेसाहेबांकडून आणखी दोन वर्षें वाढविण्यांत आली आहे. अशीही अफवा आहे असें होईल तर फार उत्तम होईल.

नवी युक्ती— जमिनीच्या खोल पोटांतील पाणी आर्टिशियन विहिरी प्रमाणें जपानी ‘ कियारसु ’ नांवाच्या पद्धतीनें थोड्या खर्चांत वर काढितां येतें. यासंबंधानें कलकत्याच्या तुरुंगांत प्रयोग करून पाहतां त्यांत यश आलें आहे.

भयंकर दुष्काळ— काबूल प्रांतांतील दुष्काळ इतका जाणवूं लागला आहे कीं, अबदुल रहिमानांनीं सांठवून ठेवलेलें धान्य काढून तें गरिबांस देण्याचा अमिरानें हुकूम केला आहे. तसेंच थंडी अतिशय पडल्यामुळें गरिबांस कोळसे स्वस्त दरानें विकण्यास त्यांनीं आरंभ केला आहे. असाच राजा पाहिजे. नाहीं तर सर्व राजेच आहेत.

\+ + +

वकील:—अरे, अशीं मूर्खपणाचीं उत्तरं काय देतोस ?

साक्षीदार:—जसे प्रश्न तशीं उत्तरें देऊं नको तर काय करूं ?

× × ×

पक्ष्याचें शहाणपण— एका टिटवीनें आपलें घरटें एका खाणीच्या कडेच्या टेंपाडावर बांधलें. याच टेंपाडावर खाणीवाले लोक वारंवार सुरुंग लावून तें फोडीत होते. प्रथम प्रथम सुरुंग सुटल्या बरोबर दगडाच्या कपच्या उडत यांनीं तिला फार त्रास होई. तथापि तिनें आपलें घरटें तेथून काढलें नाहीं, नंतर तिला असें समजून आलं कीं सुरुंग उडण्याच्या पूर्वीं एक घंटा वाजते आणि ती वाजली कीं, सर्व लोक दूर होतात. तेव्हां ती घंटा वाजतांच आपल्या घरट्यांतून निघून कामकरी लोक जमलेले असतील तेथें त्यांच्या पायापाशीं जाऊन बसे. सुरुंग उडून जाऊन लोक कामावर गेले कीं, आपणही आपल्या घरट्यात जाऊन बसायची. कामकऱ्यांनीं हें पाहून खाणीच्या मालकास सांगितलें आणि पुढें जे कोणी खाण पहाण्याला येत, त्यांसही ती गोष्ट सांगितली जाई. त्या पक्ष्याच्या शहाणपणाची ही मौज पहाण्याची इच्छा खाणी पहाण्यास येणाऱ्या लोकांना होत असे. परंतु दर घटकेस कोणी सुरुंग लावीत नाहीं. तेव्हां या टिटवीची मौज पहाण्यासाठीं उगीचच घंटा वाजविली जात असे. घंटा वाजली कीं, ती पटकन घरट्यांतून निघून नेहमीं कामकरी उभे रहात त्या जागीं जाई. असें पांच दहा वेळां झालें, परंतु आपण अगदीं फसतो, घंटा वाजली तरी सुरुंग कांहीं वाजत नाहीं, असें तिनें पाहिलें. तेव्हां तिनें ही युक्ती काढली. घंटा वाजली, कीं ती आधीं डोकें बाहेर काढून कामकरी लोक दूर पळाले कीं काय हें पाही. आणि ते पळाले नसले तर खुशाल जागच्या जागींच बसे ! क०

कलंक लावला— उत्तर हिंदुस्थानांतील एका मोठ्या जिल्ह्याच्या ठिकाणच्या सरकारी वकिलानें आपली मुलगी टाकून पलायन केलें; पुढें त्याची बायको आजारी पडली; तिलाही टाकून वरील सरकारी वकील पळून गेले ! ही गोष्ट जजसाहेबास कळली तेव्हां ‘ या मनुष्यानें मानव जातीस कलंक लावला आहे; त्यास गोळी घालून ठार केलें पाहिजे ’ असे ते ह्मणाले, असें समजतें !

सद्दाम आणिला— कलकत्यांतील कारखाने व गिरण्या यांचे धुरानें शहराचें सौंदर्य नाहींसें होतें. या बाबतींत धूर नाहींसा करण्यास काय करावें हें पाहण्यासाठीं सरकारानें विलायतेहून एक शास्त्रज्ञ आणविला आहे !

## विक्रीचा जाहिरनामा

दि० मु० नं० १९५/१९०२

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हिल जड्ज आकोले. यांचे कोर्टांत.

वादी.

श्रीराम शालीग्राम दुकान शेगांव भागीदार १ बालकिसनदास शिवलाल २ फत्तेलाल शालीग्राम ३ नारायणदास सुंदरलाल अ. पा. क. फत्तेलाल शालीग्राम. ४ मथुरादास राऊतमल, वादी नंबर १।२।३।४ तर्फे वहिवाटदार फत्तेलाल शालीग्राम तर्फे मुखत्यार नारायण त्रिंबक दुकान शेगांव.

प्रतिवादी.

चुनीलाल शिवचंद्रराय दुकान आकोट मालक १ जयदेव वल्द श्रीनिवास राहणार आकोट, आणि २ चरनीवलाल व. माहादेव अज्ञान राहणार शेगांव, जगन्नाथ सुरजमल दुकान तेल्हारे मालक ३ श्रीनारायण जितमल अज्ञान राहणार तेल्हारा व ४ संती मर्द श्रीनिवास राहणार आकोट, ५ अंबी मर्द माहादेव राहणार शेगांव, ६ फकी मर्द जितमल राहणार तेल्हारे.

कसबे शेगांव ता. खामगांव येथील वरील वादी प्रतिवादीचे भागीदारीतील जीनचा जाहीर लीलाव ता. ७।४।०३ इसवी रोजीं दिवसा १२ वाजतां शेगांव येथें मि० विष्णु कृष्ण कर्वे रिसिव्हर यांचे मार्फत केला जाईल सबब सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं ज्याची सदहू फ्याक्टरी ( जीन ) विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस दिवसा १२ वाजतां शेगांव मुक्कामीं हजर राहावें कळावे, ४।३।०३ इ.

V. N. Dandekar

सिव्हिल जड्ज आकोला.

र० नं० ११ क्लास $\frac{२१}{२}$

विद्यमान सिव्हिल कोर्ट वाशीम.

जाहीरनामा सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीं, नरसया हा तारीख ६।१२।०२ रोजीं छावणी इंगोली येथें मैत झाला त्यानीं इंगोली मिलटरी कॅन्टानमेन्टचें काम इंजिनियर खात्यांचे मारफतीनें केले त्याजबद्दलचा पैसा ऐक्झिक्युटिव्ह इंजिनीयर आफीस आकोलेकडून घेणें आहे करितां सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें सरटीफिकीट मिळण्या करिता लक्ष्मीनारायण नरसया राहणार इंगोली यानें अर्ज केला आहे. त्याची चौकशीची तारीख २१।३।०३ रोजीं नेमली आहे. करितां जाहिर करण्यात येते कीं जो कोणी अर्जदारा शिवाय लगतचा वारीस असेल त्यानीं सदर्हू तारखेस आमचे कोर्टांत वाशीम येथें १० वाजतां हजर राहावें पुढें तक्रार ऐकला जाणार नाहीं. कळावे तारीख २८।२।१९०३ इसवी.

S. H. King
सिव्हिल जज्य वाशिम

---

## नोटीस

नोटीस रघुजी लक्ष्मण घनोटी अडगांव ज्याहागीर यास :—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुम्हास जागा राहण्यास नव्हती म्हणून अडगाव ज्यहागीर येथील जागा मी हरासांत घेतले ती तुम्हास राहण्यास दिली. त्या जागेवर माझे समतीं शिवाय तुम्ही धाब्याची इमारत बसविली. आतां माझी इच्छा आहे कीं इमारत काढून जागा खाली करून द्यावी नाहींतर दरमहा १ रुपया प्रमाणें तुमचे पासून भाडे घेतले जाईल कळावें ता० २९।१।०३ इ.

सही
सदु वा। दावळ पाटील द० खु०

---

## नोटीस

शेशमी व्यंकटी वालूबा रंगारी साहू राहणार नादुरा खुर्द तलुका मलकापूर यांस

खाली सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यात येते कीं मौजे जलम येथील सर्व्हे नंबर २२६ व ३४७ या मधील माझा हिश्शाचें खरेदी खत तुम्ही ९।४।९३ रोजीं रुपये ३६७॥ च्या भरण्यात लिहून घेतलें आहे. या खरेदीखताचा भरणा शतांच्या किंमतीच्या मानानें फार थोडा आहे. या थोड्या रकमेंत तुम्हास खरेदी देण्याचें कारण तुम्ही आमच्याशी चार पंचा समक्ष केलेला तोंडी करार होय. तोंडी करार असा ठरला होता कीं मी तुमची रक्कम सव्याज चुकती आठ वर्षांच्या मुदतीत करावी व तुम्ही शेतें मला परत खरेदी द्यावी. या रितीनें रक्कम फेडण्यासाठीं तुम्ही मला तीच शेतें ३ वर्षे वहितीला दिलीं. पुढें दुष्काळामुळें मी शेतें परत केली. त्या नंतर तुम्हीच शेती वाहिती आहे तर तुमच्या वहितीच्या वर्षाचा हिशोब करून बाकी जि तीन वर्षे पेचविलेल्या रकमेचा व्याजासुद्धां हिशोब करा म्हणजे मी काही बाकी देणें निघेल ती देण्याला मी तयार आहे तुमचा हिशोब तुम्ही मला ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसाच्या आत पाठवा द्यावा म्हणजे तुमची बाकी मनी आरडीनें रवाना करीन. ही बाकी मिळाल्या नंतर तुम्ही खरेदी नंतर पंचा समक्ष कबूल केलेल्या तोंडी करारा प्रमाणें आमचीं शेतें परत खरेदी देऊन टाका. असें करण्यास चुकाल तर दिवाणींत फिर्याद करावी लागेल. तुमच्या बोलण्यांत घरसोडीच्या व गैरविश्वासाच्या गोष्टी आल्या आणि तुम्ही दोन वेळे माझे म्हणण्याला रुकार दिला नाहीं म्हणून ही जाहिर नोटीस दिली आहे. साहुकारीला व प्रामाणिकपणाला शोभेल असा मार्ग अतां तरी स्वीकारा म्हणजे माझ्यावर मोठे उपकार होतील कळावें. तारीख ३ मार्च १९०३ इ.

सही
मारुती वल्लद कडताजी आसम्बे
राहणार जलम निशाणी खुद्द.

---

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खळीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर फार अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नदोष व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय पांडुरोग, मळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बळरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जड अन्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळीच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ८०८६ आणे पडेल. अनुपान खर्ची सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु०
११९ गो० ३ रु० १६९ गो० ४ रु०
२७१ गो० ६ रु० ५९० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व मालाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलिकडे २।३ वर्षे आजरले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून यांनीं आमच्याच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

K. N. ESMAYAL & Co

यांची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध ३७ प्रकारचीं औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा म्हणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजालुगा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

---

विक्रीसतयार.

सोदाहरणीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- अवृत्ती दुसरी, पानें अदमासें ९०० निवडल्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड — (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारलेल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणा.

क्रिमिनल प्रोसिजर कोड — नवा आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे

जुने नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेले घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धा ८८४. कामास लागणारे सर्व अक्ट आहेत, पानें अदमासें ९००) किंमत टपाल खर्चासुद्धा २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

---

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार. मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यासह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीशंकराचार्यांचें शारीरभाष्य. मराठी भाषांतर व विवेचन यासह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५॥ ६ पहिल्या २०० ग्राहकांस वालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे २ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मा. स. बक्षिस.

का० बा० लेले वाई

---

१० आणेंत किं० रु० १९ चें फुकट.

(१००० चे वर हर आठवड्यास पाठविले जातात.)

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. आणखीवर रु० २॥ पाठवून ४ तिकीटांसह हक्काचें सरटीफिकीट मिळवा. (किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले सर्वच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणाराकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तीकिटांसह ४ सर्टिफिकिटें व फक्त चांदीचें पॉकेट वॉच किंवा मिलिंग खाबण्याचे ८ दिवसांचें वाजणारें मोठें क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १९ रु० चें फुकट!!!

डी. बी नाईक आणि कंपनी.
ठाकूरद्वार रोड मुंबई.

---

## खरेदी करा !

### रासकोपची घेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यास नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून अंगांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुमानास आलें आहे. याकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कंट्राक्टर, ओव्हरसियर, फॉरेस्ट कन्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांना हें वाच घेणें विषयीं आम्ही

**स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपेआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करित आलीं आहेत, करित आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जाबदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस........................४०

१९ ,, हंटिंग.................................९०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०

१९ ,, हंटिंग, नकशीचे ...........२९०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्राग १८

१९ ,, सेकंद कांट्यासह............२०

१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ...................२१

१९ ,, हाफ हंटिंगचें.................२०

१९ ,, हंटिंगचें .........................२०

१४ ,, रिस्ट वॉच .......................२०

**इनामल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस............२०

१९ ,, हंटिंग..........................२०

१४ ,, रिस्टवॉच.......................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०

१४ ,, हंटिंग.............................३५

१८ व १९ ,, आपनफेस ...........३०

१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२

१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................३५

१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५

१९ ,, हंटिंग ....................... ४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हेनागर आणि कंपनी.**

ओरिजनल निनोयन रास्कोप पेटंट वॉचसचे
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head-quarters— agpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CR RES

Claims paid for over ne Crore and Ten Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress Life Assurance is a means by which this danger is got over Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay there are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month and less, has left the family without the intended provision.

Influential and energetic gents wanted For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

## Kadi हें काय आहे ?

डाक्टर डी. एम दस्तुर यांनी तयार केलेलीं दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतराचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांच व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसाचा खोकला, दशात व घसा अवाज होणें, वारंवार सर्दी व पडसें होणें, व ताप येणें, सरदी, ब्रान्कायटीस इन्फ्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत मात्र १॥ रुपया आहे. परंत हें रोग्यास एक हजार रुपयाच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता—मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

---

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपय ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल, व त्यांच्या हयातीत, तसेच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र १००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।०२ } J. Kiniburgh, एजंट

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दांताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण माघाच आहे.

काम अक्सीर का दांत मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




दखना चाहिय क्या मुल्क कहा काती है।
ढूंढते फिरते हरेक जिस्म कदरदां हैं हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आवळणें, हक लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, बाकडें तिकडे होणें, नहनी लपरपा पडणें कठीण वस्तू दातांनीं फाकता न येणें, दात मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या वापून रहणार नाहीत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल शर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

---

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळतें, शिवाय प्रत्येक वर्षी उपयुक्त माहितीचीं सर्वेकृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि मनी ऑर्डरनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास.
खणदाळ पो० गडहिंग्लज.
इ० कोल्हापूर.

---

रानटी शिक्षा—एकानें खून केला म्हणून सरकारानें खुनी मनुष्याचा खून करण्यानें, हीं पहिलें कृत्य मरून येत नाहीं; एकंदरींत ही शिक्षा रानटीपणाची आहे म्हणून ती बंद करण्याबद्दल कळकळीस चळवळ चालली आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी गोविंदराव बळवंत फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण गोविंदराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

वर्गणीबद्दल

आकोल्यातील लोकांस................१ रु.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास.........................॥२

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........॥१ ॥१

दुसरे खेपेस.... ......॥१

RATES OF SUBSCRIPTION

Town ... ... ... ... 1 Rs.

Mofussil ... ... ... 2 ( with postage

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......8 as

Repetition Per line ., 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 23 MARCH 1903 NO II

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २३ माहे मार्च सन १९०३ इ० अंक ११

### वऱ्हाड देशमुख सभा

यंदा या देशमुख सभेची वार्षिक बैठक हिसांग ता० आकोला येथें चैत्र शुद्ध १ इंग्रजी ता० ३० मार्च सन १९०३ इ० रोज सोमवारीं होणार आहे तरी देशमुख मंडळींनीं इतर देशमुख बंधुसह सभेसाठीं अवश्य येण्याचें करावें. आगगाडीनें येणाऱ्या लोकांसाठीं ता० २९ रोजीं रात्रौ ११ पासून ता० ३० रोजीं दिवसाचे ३ वाजे पावेतों स्टेशनावर गाड्या ठेवण्यांत येतील. गाड्या बद्दल भाडें द्यावें लागणार नाहीं. बोरगांवमंजू रेलवेस्टेशन पासून हिसांग ९ कोस आहे.

हिसांग ता० २२ मार्च सन १९०३ } नारायणराव बाबूरावजी देशमूख स्थानिक सेक्रेटरी

---

कि. दिवाणी दवा नंबर ३ क्लास २१ / १९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वंये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हील जड्ज्य आकोला. यांचे कोर्टांत.

अर्जदार— मुरलीधर आख्यराम मालक शंकरलाल आख्यराम मारवाडी वस्ती पातुर्डे तालुके जळगांव.

सर्वास या नोटिसीने कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मैयत आख्यराम मुरलीधर याचे गणपती वल्लद सखाराम यांजकडेस येणे असलेले रुपये ४४६ व बहादूर वल्लद बपूजी याचेकडेस येणें असलेले रुपये १४९८९ व रतनगा सोनगा याजकडेस येणें असलेले रुपये ४६८८८ एकूण रुपये १०९९८१३ कर्ज वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावे ह्मणून तारीख ७ माहे मार्च सन १९०३ इसवी रोजी अर्ज केला आहे व त्या अर्जाची चौकशीची तारीख ४ माहे एप्रिल सन १९०३ इसवी रोजीं मुक्रर केली आहे तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचे कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी ही नोटीस देण्यांत आली आहे, आज तारीख १८।३।१९०३ इसवी.

V. N. Dandekar.

सिव्हिल ज्यड्ज्य आकोला.

### नोटीस

रा० रा० 'गुलाबराय हरदयाल' दुकान आकोला मालक गुरुप्रताप गोविंदराय राहणार आकोला यास:—

या लेखानें कळविण्यात येते कीं तुह्मी मजला चार महिन्याच्या रात्रपाळीच्या इंजिनिअरच्या कामासाठीं उक्ते २५० रुपये ठरवून तारीख १६ जानेवारी पासून तारीख १६ मे पर्यंत चाकरीला ठेविलें. त्या करारा प्रमाणें मी वाशिमाच्या जिनात मार्च १ ली पर्यंत काम केलें. तेथून तुह्मी मला आकोल्यास बोलावून घेतलें; व त्या प्रमाणें मला येथें येऊन ८ दिवस झालें तरी आपण करारा प्रमाणें माझ्या राहण्याची वगैरे सोय अजून केली नाहीं. तर ही सर्व सोय दोन दिवसांच्या आंत करून द्यावी, नाहीं तर त्या निमित्त दरमहा १२ रुपये प्रमाणें निराळा खर्च द्यावा लागेल. तुमच्या पाशीं इंजिनिअरचें काम हल्लीं नाहीं तर त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. मी तारीख १६ मे रोजीं आपला चुकता पगार घेईन. आणि तोंपर्यंत तुह्मी ठरावा प्रमाणें दरमहाचे दरमहा अडव्हान्स दिला पाहिजे. या प्रमाणें तुह्मी करार पुरा न कराल तर सर्व जबाबदारी तुह्मावर राहील. त्या खेरीज तुह्मी काल रोजीं ह्मटलें कीं हल्लींचा पडलेला काळ पुढें भरून घेईन तर मी त्या गोष्टीला कबूल नाहीं व पुष्कळ उलट्या गोष्टी बोलला. तुह्मी हें लक्ष्यांत ठेवावें कीं तुमच्या बोलावणेमुळे माझी दुसरी कडची जागा गेली आणि आतां मला तारीख १६ मे पर्यंत दुसरीकडे कोठें जागा मिळण्याचा संभव नाहीं. तेव्हां या नोटिशीचा खर्च, इतर नुकसानी वगैरे बद्दलचा तुह्मावर बोजा राहील. कळावें. तारीख ११ मार्च १९०३ इसवी.

सही

नारायण सखाराम नेवासेकर

इंजिनिअर

हल्लीं वस्ती आकोला.

---

### नोटीस

बेशमी अंबाबाई जवजे नारायणराव राहणार पथरोट, ता. इलिचपूर पोस्ट— पथरोट यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, मौजे अंदुर ता० बाळापूर येथील शेत सर्व्हे नंबर ६ चे तुमच्या मालकीच आहे. त्यांतील निमे शेत तुह्मापासून मी पट्ट्यानें दोन तीन वर्षें करीत आहे. हा निमा हिस्सा विकण्याची गोष्ट तुह्मी मज जवळ, सुमारे एक महिना होत आला, काढली होती व तेव्हां तें शेत मीच विकत घेतो असें आपणांस झटें, तमची बायकोची जात असल्यामुळें तुह्मी आपला मुलगा बराबर देऊन मला आपल्या इच्छाप्रमाणें ह्मणजे रा० प्रल्हादपंत भटजी राहणार मौजे मंडारे येथें पाठविलें. रा० प्रल्हादपंत हे जी किंमत ठरवितील त्यास तुह्मी राजी असल्याबद्दल कळविले होतें त्या प्रमाणें रा० प्रल्हादपंत यांनीं ६०० रु. ठराविलें व त्यास मी कबूल झालों. व लागलीच सवदा पक्का ठरवून आपणास देण्यास इसारा दाखल १० रु० ही दिले. पण अद्याप खरेदीखत करून दिलें नाहीं. शिवाय मला असेंहि समजतें कीं तुह्मी तें सालीम शेत दुसऱ्या कोणास विकलें आहे. जास्त पैशाच्या लालचीस लागून तुह्मी केलेला व्यवहार आतां रद्द करण्यास पाहतां आहां. असो. आपली इच्छा असल्यास तें सर्वही शेत विकत घेण्यास मी तयार आहे. व हा माझा अग्र क्रयेचा हक्कही आहे. पण तसें आपल्या मनांत नसल्यास सध्यां ठरलेल्या अर्ध्या हिश्शाचेंच खरेदीखत करून द्यावें. तुह्मांस देणाचे राहिलेले ५९० रुपये मी रा० शंकरलाल लखूलाल मारवाडी रहाणार अंदुरे यांचेपाशीं अनामत ठेविले आहे. खरेदीखत झाल्या बरोबर ते तुह्मांस मिळतील. त्या कामाकरितां तुह्मांस नोटीस पोंचल्य पासून ८ दिवसांची मुदत दिली आहे. येणें प्रमाणें न झाल्यास सरकारांत दाद मागावी लागेल व या प्रीत्यर्थ जो खर्च लागेल तो सर्व या नोटिशीचे खर्चा सुद्धां भरून घेतला जाईल. ह्मणून अगाऊ जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. ता. १७ माहे मार्च सन १९०३ इ०

सही

राघव नागोराव कुळकर्णी राहणार

अंदुरा दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

बेशमी शंभु वल्लद भोनाजी माळी मानकर राहणार पातुर्डा खुर्द तालुका जळगांव यांस:—

खाली सही करणार यांजकडुन कळविण्यांत येते कीं तुमची नोटीस पोंचली. पहिल्या सालबंदी पैकीं ३० रुपये व दुसऱ्या सालबंदीनें ६० रुपये व त्या वरील व्याज १० रुपये मिळून १०० रुपये रजुचे तुह्मा कडून अजुन येणें आहेत. ही रक्कम स्वतंत्र घर्णेची आहे. बाकीच्या १० सालबंद्याचा उक्ता निकाल २०० रुपयावर केला व दोन्ही दस्त एवजही परत दिले. तुह्मावर जी मेहेरबानी केली तिचा उपकार स्मरून तुह्मी ही खोटी नोटीस दिली आहे. १०० रुपये व्याजासुद्धां आठ दिवसात द्यावे लागतील. नाहींतर दिवाणींत दावा करून कोर्ट खर्चा सुद्धां वसूल करून घेऊं. कळावें. तारीख १९-३-०३ इ०

सही ( मारवाडींत )

शंकरलाल अख्यराम साहू

दुकान पातुर्डा.

### नोटीस

बेशमी रामचंद्र रंगटा साहू दुकान आकोला यास:—

नोटीस देणार किसनासिंग वल्लद भेरामसिंग दुकान आकोला नोटीस देतों कीं, तारीख २४ रोजीं रजिष्टरपत्रद्वारें खालीं लिहिल्या प्रमाणें आह्मी तुह्मास नोटीस दिली परंतु ते रजिष्टरपत्र तुह्मी घेतले नाहीं, परत केलें. सबब हल्लीं वर्तमानपत्रद्वारें तीच नोटीस मी तुह्मास देत आहे. पूर्वीं रजिष्टरपत्रद्वारें तुह्मास नोटीस दिली ती येणे प्रमाणें होती.

नोटीस बेशमी रामचंद्र रंगटा साहू दुकान आकोला यासी किसनसिंग भेरामसिंग साहू दुकान आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी हिरालाल चुनीलाल साहू मालक हिरालाल चंद्रभान दुकान हल्लीं इंगोठी रुई बोजे सव्याचे २२९ नगाचे सवदे ४ मिती माघ शुद्ध १९ चे संमत १९५९ चे करारचे केले होते त्यात तुह्मास प्रत्येक सवद्याबद्दल बयना दर बोजास रुपये १० प्रमाणें रुपये २२५० रोख नगदी सदरील हिरालाल चुनीलाल यांनीं दिले. त्या व्यवहाराबद्दल आपण कबला नंबर १,२,४,९ असे कबाले ४ मो वरील हिरालाल चुनीलाल यास लिहून दिले. सदर्हू सवद्याबद्दल नफा व बयान्याबद्दल जे रुपये २२५० सदर्हू सवद्यांत सदरील दिलेला हिरालाल चुनीलाल यास आपणाकडून जी रक्कम मागण्याचा हक्क आहे तो हक्क तो नफा आणि ते रुपये २२५० आपणाकडून वसूल करण्याचा हक्क सदरील हिरालाल चुनीलाल यानें आह्मास तारीख १६-२-१९०३ चे लिहून दिलेल्या खरिदीखताचे आधारे प्राप्त झाला आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत वरील व्यवहारांत सदरील हिरालाल चुनीलाल यास होणारे नफ्याचा हिशेब देऊन होईल ती रक्कम व बयान्याची रक्कम रुपये २२५० व नुकसानीचे व्याजाची रक्कम आह्मास द्यावी. आपण असे न केल्यास आपणावर योग्य कोर्टांत दावा करून ती आह्मी खर्चासुद्धां भरून घेऊं. या नोटिशीचा खर्च आपणावर बसेल.

वरील रजिष्टरपत्रद्वारें नोटीस दिल्यावर ती जेव्हां तुह्मी घेतली नाहीं असें मला कळलें त्यावेळीं त्या नोटिसींतील मजकूर १ हरगोविंद विठ्ठलदास २ नयनशी गोविंदजी ३ चंद्रभान पाटील या गृहस्थांचे समक्ष तुह्मास कॉटनमार्केटमध्यें मी सांगितला परंतु ही गोष्ट कदाचित् नाकाराल ह्मणून हल्लीं वर्तमानपत्रद्वारें ही नोटीस देत आहे कळावें. तारीख २१।३।०३ ईसवी.

सही.

किसनासिंग भेरामसिंग राहणार

आकोला दस्तुर खुद्द

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १० शके १८२४

## अमृत बिंदू

हिंदुस्थान देश अपरिमित करभारानें थकून गेला आहे, आणि आतां याच्याच्यानें लादलेलें हें कराचें असह्य ओझें ओढवत नाहीं ह्मणून दुःखाचा उसासा तो एक सारखा टाकीत आहे. पडले कष्ट शरीर सोशी या ह्मणी प्रमाणें हिंदुस्थान देश हे कराचे कष्ट सोशीत आहे व यावज्जीव ते तो तसेंच सोशीत राहील. शरिरास व्याधींनीं पीडिलें ह्मणजे त्यास प्राणवायु निघून जाई पर्यंत ती पीडा सहन करणें भाग्य आहे; तद्वत् हिंदुस्थानातहि हे कष्ट कितीहि जाचत असले तरी निरुपाय ह्मणून रडत रडत ते तसेच काढले पाहिजेत. हिंदुस्थानची ही दीनदशा व दुःखीकष्टी अवस्था सर्व प्रजाजन दरवर्षी राष्ट्रीय सभेच्या द्वारें सरकारपुढे मांडत आहे. आणि मोठ्या आतुर दृष्टीनें व केवीलवाणीनें ह्यांतून आह्मांस वांचवा ह्मणून विनवीत आहे. दुःखी प्राण्याला एखादा जरी सुखाचा गोड शब्द दिला तरी तो अल्पकाळ तरी त्याच्या दुःखाचें त्यास विस्मरण पाडतो. व त्याला थोडासा आराम वाटतो. पण त्यास जडलेली व्याधी त्याच्या शरीर काठीचे मोडून तुकडे करणारी असल्यामुळें तो प्राणी त्या गोड शब्दांचा व या दुःखाच्या विरंबुळ्याचा एक सारखा ध्यास घेतो. आणि हें अमृत कण वाचवायास आलें ह्मणून त्यास परमावधीचा उल्हास व आनंद वाटतो.

सरकारनें ह्या वर्षापासून मिठावरील व प्राप्ती वरील कर कमी केले आहेत हें ऐकून सर्वांस संतोष होईल. मिठावरील कर इतके दिवस दरमणीं २॥ रुपये होता तो आतां २ रुपये केला आहे. तसेंच ज्याचें वार्षिक उत्पन्न ५०० होतें त्यास प्राप्ती वरील कर द्यावा लागत असे तो आता १००० रुपया पर्यंतच्या प्राप्तीवाल्यास द्यावा लागणार नाहीं. सरकारनें लोकांवर ही जी मेहेरनजर केली आहे या बद्दल सर्वजण सरकारचे अत्यंत ऋणी आहेतच, पण सरकारास या शिवाय आणखीहि दुसरे कर कमी करता आले असते. सरकारापाशीं पुष्कळच शिल्लक जमा आहे. आणि ह्मणून ह्या वर्षी नाहीं तरी पुढील वर्षी तरी दुसरे कर कमी होतील अशी आह्मांस मोठी आशा आहे. व ती पुरी करणार सरकार समर्थ आहे.

राज्यारोहणाचे समयीं आह्मा वरील एखादाहि कर कमी झाला नाहीं ह्मणून लोकांचा जो मनाचा विरस झाला होता तो आतां या गोष्टींनीं बराच भरून आला. तरी पण ही गोष्ट त्याचवेळीं झाली असती तर ती विशेष गोड दिसली असती. असो. कालांतरानें तरी सरकारनें लोकांच्या पोळलेल्या अंतकरणाला हा दोनच कां होईना सुखाच्या गोष्टी दिल्या हें कांहीं कमी झालें नाहीं. पण आंत खोलपर्यंत जाऊन काळजास भिनणाऱ्या जखमेवर असे उपचार एक सारखे न केले तर ती जखम बरी होणार नाहीं व ते उपाय करण्यास दिरंगाई कामाची नाहीं हें सरकारनें कधींहि विसरूं नये, हीच वारंवार यांच्या पायापाशीं सर्वांची विनंती आहे.

## चिवटपणा

चिवटपणाचा सद्गुण जितका पुरुषांमध्यें दृष्टीस पडतो त्याच्या पेक्षा स्त्रियांमध्यें तो अधिक आढळतो. भवभूतीनें श्रीरामचंद्राला वज्रा पेक्षां कठीण व कुसुमापेक्षां मृदु अशीं दोन विशेषणें लावून त्याची लोकत्तर मनोवृत्ती आपल्या काव्यांत वर्णिली आहे. ही गोष्ट श्रीरामचंद्रा संबंधानें खरी आहे पण पुरुषवर्ग व स्त्रीवर्ग हे दोन्ही समुच्चयानें लक्ष्यांत घेतले तर असें आढळून येईल कीं स्त्रीवर्ग सुखाला अंग देण्यामध्यें जसा अधिक कुशल आहे तसें कठिण प्रसंगीं संकटें सोसण्याचें काठिण्यहि यांच्या अंगीं पुरुषापेक्षा अधिकच आहे. स्त्री वर्गांतील हा विशेष नेहमीं ध्यानांत धरण्या सारखा आहे. आणि या विशिष्ट सद्गुणालाच आह्मी अगदीं प्राकृत नांव ह्मणजे चिवटपणा हें दिलेलें आहे. सुखोपभाग घेण्यांतहि एक विलक्षण कौशल्य असतें. आणि तें स्त्रियांच्या नैसर्गिक व्यवहारांतच चांगलें दृष्टीस पडतें. पण यांच्या या कुसरीबद्दल विशेष न सांगतां हीच गोष्ट विशेषतः नजरेस आणून द्यावयाची आहे कीं, सौख्याच्या कालांत स्त्रियांची निपज अधिक होते आणि या मानानें पुरुषांची निपज कमी होते. त्यांच्या या उत्पत्तीच्या गोष्टीशीं त्याच्या अंगच्या चिवटपणाचा विशेष संबंध आहे. ऐषआरामाच्या व चैनीच्या कालांत त्यांची निपज विशेष असल्यामुळें स्वाभाविक अनुमान असें निघेल कीं, दुःखाच्या प्रसंगास सामना करण्याचें व टिकाव धरण्याचें सामर्थ्य यांचें अंगीं कमी असलें पाहिजे. ही गोष्ट आपल्या सर्वांच्या दररोजच्या चांगल्या अनुभवांतील आहे कीं पुष्कळशी मंडळी जी गर्भश्रीमान् असतात, व ज्यांना सुखसाधनें पुष्कळ अनुकूळ असतात ते संकटाचे वेळीं कच्चे पडतात. आणि त्यांची ती दैना व पंगूपणा पाहून त्रयस्थासही यांच्यावरील प्रसंगाबद्दल मोठी कींव येते. भावार्थ एवढाच कीं सुखांत रुळलेल्या शरीर प्रकृतीला दुःखाचे कठीण प्रसंगीं टिकाव धरवत नाहीं. पण हीच गोष्ट स्त्रीवर्गाच्या निपज संबंधानें उलट दिसून येते. त्यांची निपज सौख्यकालांत जशी अधीक तसेंच त्यांच्या अंगीं दुःख सहन करण्याचें काठिण्य व चिवटपणा अधिक असतो. वस्तुतः सुखकालीन निपज व दुःखकालीं लागणारा चिवटपणा या दोहोंमध्यें मोठा विरोध दिसतो. पण स्त्रीवर्गामध्यें या दोन्हीही विरोधी गुणांचें एकीकरण फार उत्कृष्ट तऱ्हेनें दिसून पडतें; थोडे दिवसापूर्वी लोकगणतीच्या कांहीं आकड्या संबंधानें बोलत असतांना मि. बेन्स हे ह्मणाले कीं,– इंडियांतच काय पण साऱ्या जगभर असा सर्व साधारण सिद्धांत निघतो कीं सुखाच्या आनंदाच्या काळामध्यें स्त्रियांची निपज पुरुषापेक्षां अधिक आहे. प्रापंचिक सुखाची ज्या कुटुंबामध्यें समृद्धी असते या कुटुंबामधील पुरुष वर्गाच्या व स्त्री वर्गाच्या निपजेचे आकडे घेतले तर सासरींचें प्रमाण स्त्रीवर्गाला विशेष अनुकूल असें निघतें. आणि आमच्या वाचनांत असेंहि आलें आहे कीं, स्त्री हा मनुष्यत्वाचा उत्कृष्ट पुतळा होय; ह्मणजे माणसाचे गुण स्त्री जातीमध्यें पूर्णत्वानें विकास पावलेले असतात. ग्लाडस्टन साहेब ह्मणत असत कीं, मनुष्य देहाचा ऋजुपणा स्त्रीमध्यें पूर्णपणें आलेला आहे. मनुष्य देहाचा इतर प्राणी वर्गापेक्षां मुख्य विशेष ह्मटला ह्मणजे त्याच्या शरिराचा ताठपणा होय. व तो स्त्रीमध्यें विशेष पूर्णत्वाला पोहोंचला आहे. जर स्त्रीरचनेमध्यें मनुष्यत्वाचें पूर्ण स्वरूप उमटून दिसतें तर हीहि गोष्ट संभवनीय असावी कीं संभवकालच्या सुखसमृद्धीनें मनुष्यत्वाच्या उत्तम खुणा स्त्रीरूपातच अधिक स्पष्टतेनें उमटल्या पाहिजेत आणि हीच गोष्ट वरील बेन्स साहेबांच्या विधानांतहि दिसून येते.

गेल्या दुष्काळांत स्त्रीवर्गाच्या चिवटपणाचें प्रदर्शन फार उत्कृष्ट झालें. दुष्काळाचा उपासमार सोसण्याला पुरुषापेक्षा स्त्री अधिक समर्थ आहे असें स्पष्टपणें दिसून आलें. दुष्काळाच्या संकटाबरोबर सामना करण्यांत स्त्रीवर्गानें विलक्षण कंटकपणा दाखविला. दुष्काळाचे प्रसंगीं असें दृष्टीस पडलें कीं, जेथें साधारणपणें सारख्या वयाचे ७२ पुरुष मरावेत तेथें ५५ स्त्रिया मरत असत. व्यवहारांतहि आपल्याला पदोपदीं आढळून येतें कीं, जिगजिगीचें, कटकटीचें व कंटाळवाणें काम दीर्घ कालपर्यंत जशा स्त्रिया करूं शकतात तसें काम पुरुषांच्या हातून चांगलेंसें वठत नाहीं. स्त्रियांचें मार्दव व त्यांचें काठिण्य ह्या दोन्ही गुणांच्या संमेलनानें पुष्कळसे अंतःकरणाचे सद्गुण आपोआप उत्पन्न होतात. या सद्गुणामध्यें मुख्य मुख्य गुण ह्मटले ह्मणजे निस्सीम प्रेम, एक निष्ठा, सहनशीलपणा इत्यादि गुण होत. संसार यात्रेला हे गुण स्त्रियांनाच काय पण पुरुषांनाहि सारखेच पाहिजे आहेत. पुरुषास स्त्री होणें हें आवडणार नाहीं खरें, पण त्यांच्या अंगचा चिवटपणा किती वेध्यासारखा आहे.

## प्लेग

प्लेग आकोल्यास स्थिरावल्या सारखा दिसतो. उत्तरोत्तर त्याचे पाऊल पुढेंच आहे. दररोज १२।१५।२० यांच्या दरम्यान मृत्युची संख्या आहे. आकोले जिल्ह्यातील इतर ठिकाणचा प्लेग नाहींसा होत चालला आहे पण त्याचें येथील ठाणें येत्या पंधरवड्यांत हालेल असें दिसत नाहीं. प्लेगामुळें आपचे येथील कच्छी बाजार, मारवाडी बाजार व धान्याचा बाजार अगदीं खाली होऊन गेले आहेत. पुष्कळसे लोक हा गांव सोडून आपल्या दूरच्या देशांतरच्या गांवीं परत गेले आहेत. येथील मुख्यस्थ रहिवाशी मंडळीहि होता होईल तों पर्यंत स्थानत्याग करितात आणि जंगलच्या मोकळ्या हवेंत राहण्याच्या तजविजी कित्येकांनीं केल्या आहेत व कोणी कोणी आपल्या शक्तीप्रमाणें करीत आहेत. जर प्लेगापुढें स्थलांतराशिवाय दुसरा उपाय चालत नाहीं तर लोकांच्या या शहाणपणाच्या तरतुदीबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों. सध्यां आकोल्याला जसें प्लेगाचें मान आहे तसें वऱ्हाडांत अन्यत्र कोठेंच नाहीं. बुलढाण्या जिल्ह्यांत देऊळगांव पिंपळगांव, नांदुरा इत्यादि गांवीं प्लेगाची गडबड चालू आहे पण तिथें मान उत्तरोत्तर उतरत आहे हें दुःखांत सुख होय. उमरावतीसही प्लेग कमी कमी होत चालला आहे. प्लेग कमी होणें किंवा जास्ती होणें हें माणसांचे हातीं नाहीं पण त्या संबंधानें आह्मांस एक विशेष सूचना करावयाची आहे. प्लेगाचे वेळीं स्थलांतर केलेंच पाहिजे हें आतां निर्विवाद ठरलें आहे आणि सध्या उष्णकाळाचे दिवस आहेत तों पर्यंत हा उपाय अमलांत आणण्याची कोणास विशेष भानगड वाटणार नाहीं. पण हा प्लेग पावसाळ्यांतहि यंदा कायम राहील असा रंग दिसतो आणि त्या वेळीं जर कोणी बाहेर जाऊन राहावें असें ह्मणेल तर त्याला तऱ्हाच्या तेव्हां कोणतीहि सोय करून घेतां येणार नाहीं. तेव्हां प्रत्येकानें आपल्याला आपल्या संसारा पुरतें दारदार मोकळ्या हवेंत मिळेल अशी व्यवस्था आतां पासून करून ठेवावी. स्थलांतराचा उपाय लोकांनीं करून पहावा अशा विषयीं कुमार श्रीहरमामजी साहेब लोकांस उपदेश करीत आले. इतकेंच नाहींतर त्यांनीं लोकांना जंगलांत जाऊन राहण्याच्या सवलती देतां येतील तितक्या पुष्कळशा दिल्या आहेत. आतां या जिल्ह्याचीं सूत्रें मे. रुस्तुमजी साहेब हे आपल्या हातीं घेतील तेव्हां तेही कुमार साहेबा प्रमाणेंच आपल्या लोकांचा परामर्ष चांगला घेतील हें आह्मी मागील अनुभवा वरून येथें सांगतों.

## खंडणी

हिंदुस्थानांतील नेटिव संस्थानाकडून इंडिया सरकाराला दरसाल ८७१३००० रुपये खंडणीच्या रूपानें मिळतात. ह्या खंडणीच्या रकमा ठरीवच असतात. ही खंडणी दोन तीन प्रकारांनीं वसूल करण्यांत येते. एक निव्वळ खंडणी ह्मणून घेतात. या खंडणीचा अर्थ असा आहे कीं ब्रिटिश सरकारच्या सार्वभौमत्वाचा नजराणाच होय. दुसरा खंडणीचा प्रकार ह्मणजे कांहीं ठरीव लष्करी मदत देण्यासाठीं ह्मणून जो खर्च नेटिव संस्थानाकडून घेतात तो. तिसरा करभार ह्मणजे एखाद्या संस्थानांत जेव्हां नवीन राजा गादीवर बसतो तेव्हां त्याचा वारसा कबूल करण्यासाठीं जो नजराणा घेतात तो होय.

एकंदर ८७ लक्ष उत्पन्नापैकीं मद्रास इलाख्यांतील म्हैसूर संस्थानाकडूनच एक ठोक रक्कम ३५ लाख रुपये मिळते. त्रावणकोरचे संस्थानांतून ७८३००० मिळतात व कोचीन कडून २ लक्ष मिळतात बाकीच्या मद्रास इलाख्यांतील लहानसान संस्थानांकडून २॥ लक्ष रुपये मिळतात. एकूण मद्रास इलाख्यांतूनच ४५०८००० रु. होतात. मद्रास इलाख्या इतकी खंडणी देणारीं संस्थानें दुसऱ्या कोणच्याही इलाख्यांत नाहींत. या रकमेच्या खालोखाल रक्कम उदेपूर, जोधपूर, जयपूर, कोटा, बुंदी,

open jungle and on the ground of असून दिवता उष्मा विशेष होतो. उष्णकाल सिव्हिल व्यइट्य

रकलास व निजाम हैद्राबाद या संस्थानांकडून खंडणीच्या रूपानें ११९६००० रुपये दरसाल पोचतात. ही ठरीव खंडणी झाली. या शिवाय लष्करी खर्चा निमित्त ह्मणून भोपाळ, म ळवा, जोधपूर कोटा मिळून सरासरी ६ लक्षांची रक्कम घेतात. हीं संस्थानें कोणच्याहि इलाख्याच्या स्थानिक सरकाराकडे नसून त्यांचा संबंध थेट हिंदुस्थान सरकारशीं आहे. या पैकीं निजामाकडून १०८००० जी खंडणी घेतात तिला 'मराठा चौथ' असें ह्मणतात आणि हें ऐतिहासिक नांव मुद्दाम जुन्या हक्कांच्या संस्मरणार्थ चालूं ठेविलें आहे. मुंबई इलाख्यातील मुख्य संस्थानें ह्मणजे काठेवाड, कच्छ, व बडोदा ह्या तीन भागच्या संस्थानांकडून सरासरी १०॥ लक्ष रुपये खंडणी मिळते. मध्यप्रांतांतील नांदगांव, खैरगड व इतर संस्थानें मिळून ३१२००० मिळतात. ब्रह्मदेशांतील शान संस्थानाकडून ३६०,००० खंडणी घेतात. पंजाबांतील मंडी, कपूरथला व इतर संस्थानें मिळून २९०,००० मिळतात. येणें प्रमाणें नेटिव संस्थानांकडून पाऊण कोटी १२॥ लक्ष रुपये ब्रिटिश सरकाराला करभाराच्या रूपानें मिळत असतात. वर ज्या संस्थानांच्या नांवाचा निर्देश केला नाहीं अशीं संस्थानें पुष्कळ आहेत पण त्यांचा करभार ५० हजारापेक्षा अधिक नसल्या कारणानें त्यांची नावें देण्याचें प्रयोजन दिसलें नाहीं.

---

## दुःखद वार्ता

अत्यंत दुःखाची गोष्ट आज लिहिण्याचा प्रसंग आला आहे. डब्ल्यू एस. केन साहेब एम. पी. हे काळजाच्या विकृतीनें एकाएकी तारीख १७ रोजीं लंडन येथें मरण पावले ही वार्ता ऐकून सर्व हिंदुस्थानांतील लोकांस दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. केन साहेबांचें नांव माहित नाहीं असा मनुष्य क्वचितच सांपडेल. केन साहेब हिंदुस्थानांत आले होते. त्यास पुष्कळांनीं पाहिलें असेल व त्यांचें कलकत्याच्या कांग्रेसचे वेळीं एक दोन वेळां झालेलें भाषणहि ऐकिलें असेल. आज हिंदुस्थानास आपला ह्मणावणारे, त्याच्या दुःखानें हळहळणारे व सुखानें आनंदणारे असे हाताच्या बोटावर मोजतां येतील इतके जे दोन चार महात्म आहेत त्यांतील हे एक होते. हिंदुस्थानचा पक्ष यांनी उचलला होता व त्याचा कैवार घेऊन त्याच्या हितासाठीं ते पार्लमेंटांत भांडत असत. हिंदुस्थानचें हिताची गोष्ट ते आपल्या प्राणापलीकडे मनांत वागवीत असत. हिंदुस्थानासाठीं त्यांनीं अहर्निश आपला देह कारणीं लाविला. हिंदुस्थानच्या कोट्यवधी लोकांची खरी स्थिती काय आहे त्यास काय पाहिजे व काय नको हें इंग्लिश लोकांस दाखवून देण्याचें काम करीत करीतच त्यांचा अंत झाला. असा थोर पुरुष हिंदुस्थानास पुन्हा मिळणार नाहीं. हिंदुस्थानास अशा सज्जनांचीच फार जरूर आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानचा कनवाळू पुरस्कर्ता गमावला हें त्याचें मोठें दुर्भाग्य होय. केन साहेबाच्या साहकारी मंडळींनीं केन साहेबाच्या मनांतील ती एकच गोष्ट पूर्णतेस आणण्याचा प्रयत्न करून त्यांच्या आत्म्यास सुखवावें व लोकांच्या ह्या दुःखास थोडासा विसर पाडावा. ईश्वर त्याच्या आत्म्यास सुखी राखो !

---

The Berar Samachar

MONDAY MARCH

23 1903

KUMAR Shri Harbhamji will hand over to—day the charge of this district to Mr. Rustomji Faridoonji. He wanted a change and got Buldana at a time when its cool and salubrious climate is a special blessing. The people of this district will however bid him good—bye with a heavy heart. He is popularly known as a Raja Deputy Sahib. He is affable in manners and accessible to the poor as well as to the rich. He is every inch a king and his deep and sympathetic interest in the people has won him the highest estimation of the people. He is very earnest and anxious about the welfare of the people and his stay amongst us for nearly two years has made us familiar with his choice subjects. One of these subjects is his proposal to establish an industrial Association at Akola. He faces the bread problem in a straight forward manner. He hits the right nail when he insists on the revival of the indigeneous industries and the improvement of the agricultural classes. His ideas have made a home in the minds of the people and we hope that Mr. Rustomji also will further the aims and objects of this association by his direct support and add to its progress in a solid and substantial manner.

Kumar Shri Harbhamji is an eminent officer of a bold, vigorous and independent tone. He observes no distinction of color and creed. And his great administrative success is due to his most upright statesmanship. With him there is no hide and seek game. He has got a keen insight into the secrets of human nature and his varied experiences in Indian and European climates make him a successful administrator.

We offer our heart—felt thanks to Kumar Shri Harbhamji upon the success of his administration of this district. The people are most thankful to him for his sympathetic and humane Plague—administration. He is always a friend of the people and afforded them all possible conveniences in order that they may take to all pre—cautionary measures in the easiest manner possible. He did his level best to induce the people to leave the infected areas and always took care that no undue pressure is exercised against any one individual. With his solid advice about plague—measures, he left each man to be a judge for himself and to take the best course he can. Evacuation is his watch—word and we presume that Mr. Rustomji will find a light work in this connection.

—:0:—

BY—the—bye, we refer to the bad taste with which some of our European residents of the Civil Station have tried to prevent the building of huts within a mile's round of the circuitous drive of that ward. The dread of plague is most discomforting to all and we welcome all precautionary measures of preventing the spread of plague. But each measure should have its own limitations. It is absured to propose that there should be no hut erected within a mile's distance though that hut be in the open jungle and on the ground of a private—field. We have it on the authority of the Civil Surgeon that a hut erected on the opposite side of a plague—hospital or a segregation camp will have no danger of contamination whatever if only a public road passes between the two. Those who propose that there should be no hut allowed to be built within a mile of the circuitous drive of the Station will take care to see that the Civil Surgeon has no objections whatever if a plague—hospital be even within 50 yards' distance from the Nawab—Pura on the western side of Akola where the population is dense and closely occupy houses after houses. The spirit of allowing no huts within a miles' drive of the station side of Akola went so far as to to issue orders to get some of the standing huts pulled down. We are glad however that the Commissioner saw the injustice of such an order and thought it inadvisable to fight out civil suits of which he received notices from the owners of the huts. He cancelled that portion of the order that referred to the pulling down of huts erected with the permission but has issued a further prohibitory order so that no permission will hence—forward be granted. We request the Commissioner to be still more liberal and generous and to allow the panic—stricken people to build their huts at sufficient long distances of 300 yards instead of a mile. Further we wish him to order the removal of the standing plague—hospitals and segregation huts from the place where they stand almost in the very midst of the population.

—:0:—

KUMAR Shri Harbhamji had the other day some reason to pray for help at the hands of his admirers. He had an occasion to say "Save me from my friends." The people of this district did not like his transfer to Buldana. They sent telegrams to the Viceroy and to the Resident that the transfer should be cancelled in the interests of the people. The Governor General was annoyed at the flow of these telegraphic messages and requested the Resident to dissuade the people from taking such a step in the matter. This incident speaks volumes to noblest sentiments the people cherish towards the Kumar Sahib, but further than that it is after all an ill—advised effort on the part of the people. The conditions of the public service require a change in the *personnel* of the district officers and we shall have to abide by them. Further the people forget that such an effort does indirectly a disservice to the good name of an officer who comes today to preside over this district. Mr. Rustomji is an able officer and he has won the golden opinions for his exemplary services at the last famine and his eminent services in the famine and police commissions also. Each man has his own special qualifications and as one grows in age he gains in new experiences. We hope that Mr. Rustomji will be doubly welcome to us in so far as he will turn to advantage the opportunity of succeeding to a most popular predecessor.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— गेल्या दहा बारा दिवसांत थंडीनें मान अधीक वाढलें होतें पण पुन्हा या गुलाबी थंडीला उतरती कळा लागली असून दिवसा उष्मा विशेष होतो. उष्णकाळ असा कडक होत जाईल तर प्लेगाची भीति त्या मानानें कमी कमी होईल.

मे० इलियट साहेब यांची स्वारी दोन चार दिवस येथें आली असून आज परत जाणार आहे असें कळतें.

मे० रुस्तुमजी फर्डूनजी हे ह्या जिल्ह्याचा चार्ज आज घेतील आणि कुमार श्री हरभामजी साहेब हे लौकरच बुलढाण्यास जाऊन रुजू होतील.

रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. हे आज येथील तहशिलदारीवर रुजू होतील आणि रा० रा० विष्णु रंगनाथ शेंबेकर हे दारव्ह्याच्या तहशिलीवर रुजू होण्यासाठीं लौकरच तिकडे रवाना होतील.

रा० रा० माधव गणेश क्लार्क ऑफ कोर्ट निहायत दिपुटी कमिशनर आकोला यांची बदली बुलढाण्यास झाली असून येथील त्यांच्या जागीं रा० रा० शिवराव रामकृष्ण यास बुलढाण्याहून येथें मुद्दाम बदलण्यांत आलें आहे.

---

## नोटीस

नोटीस गुजाबा आनंदराव रा. बाल्हई पोष्ट कारंजा ता. मुर्तिजापूर यांस खालीं सही करणारा कडून अशी कीं, बाल्हई येथील ४ शेती बद्दल व चांदई येथील १ शेताबद्दल स्वामित्वाची रकम दोन सालची ६४७ आमचे तुमचेवर झाली. ही रकम नोटीस पावतांच ४ दिवसांत देऊन पावती घ्यावी. न दिल्यास व्याजासह सर्व रकमेचा दावा तुह्मावर करून खर्चासह हुकूमनामा करून घेतला जाईल. रकम सर्व दिल्या शिवाय चांदईचे शेत वहूं नये. वहीत केल्यास सरकारी कायद्या प्रमाणें तुमचेवर काम चालेल कळावें ता. २१।३।१९०३ इ

सही

बापुजी व दिनकर नारायण व दामोदर

नारायण द. दिनकर नारायण

दस्तुर खुद्द.

---

कि. दिवाणी दवा नंबर २ क्लास २१.

१९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वय नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हील जड्ज्य आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार—रतनसिंग वल्लद विठ्ठलसिंग व गुलाबसिंग वल्लद विठ्ठलसिंग वस्ती अडगांव तालुके आकोट.

सर्वांस या नोटिसानें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मैयत बिंदी मर्द तुकाराम इचे मोनाजी वल्लद नथूजी यांचे कडेस येणें असलेले रुपये ४६४८६ यांचे कर्ज वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून ता. ९ माहे मार्च सन १९०३ इ० रोजीं अर्ज केला आहे व त्या अर्जाची चौकशीची तारीख ४ माहे एप्रील सन १९०३ इसवी रोजीं मुक्रर केली आहे तर सदहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार यानला कां सरटीफिकीट देऊं नये यांचे कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी ही नोटीस देण्यांत आली आहे, आज तारीख १८।३।१९०३ इसवी.

V. N. Dandekar.

सिव्हिल ज्यड्ज्य आकोला.

हास्यकारक गफत— दिल्ली दरबाराच्या मारंभा निमित्त ६०० घडे आणून ठेवण्या- तहशिलदारास हुकूम करावा, असें लेक्टर साहेबांनीं आपल्या शिरस्तेदारास ागितलें. त्याप्रमाणें यानें हुकूम लिहून याचे खालीं 'हे घडे कुंभाराच्या येथें मळतील' असें लिहिलें. हा हुकूम तहशि- दाराचे हातीं गेला. पण ह्या हुकुमांत घड्यां'ना इंग्रजींत 'गऱ्हास' (garbas) सें लिहिलें होतें; त्यांतील र च्या ठिकाणीं प्रहल्यामुळें 'गऱ्हास'चें 'गद्धास' ाले! दरबारसमारंभासाठीं ६०० गाढवांचा सोला कशास पाहिजे, हें तहशिलदारास मजेना; परंतु साहेबांचा हुकूम तर मानला ाहिजे; म्हणून पट्टेवाले पाठवून सर्व कुंभा- र्यां घरें धुंडळून कसेंतरी ३०० गढे ाणून कलेक्टरांचे बंगल्यांचे कांपौंडांत मे केले! त्या वेळीं कलेक्टर साहेब घरीं व्हते. ते परत येऊन हें सैन्य पाहतांच ाश्चर्यचकित झाले! इतक्यांत एका चप- ाशानें पुढें येऊन अदबीनें म्हटलें 'हजूर' सर्व गढे ३०० आहेत. बाकीचे २०० वकरच येतील!' तहशिलदारास बोलावून ाणल्या नंतर हें गूढ उकललें व साहेब, अधिकारी, नोकर व चपराशी यांचा एकच शा पिकला.

उपयुक्तशोध— कुजलेला पाचोळा आणि वत यापासून चिवट व ऊबदार कापड यार करूं लागले आहेत. तसेंच लांकडाचा सा व तुकडे यापासून छानदार रेशीम नवितां येतें. जे जिन्नस क्षुद्र व टाकाऊ दिसतात त्यापासून किती तरी उपयुक्त जिन- ा तयार होतात पहा! जगांत निरुपयोगी सें कांहींच नाहीं!

नाल्यांतील भोजनगृह— पारीस शहरांतील हाणाऱ्या नाल्यांत एक खाणावळ आहे. ही ार्णीत आहे तरी आंत अगदीं स्वच्छ आहे. थें भंगी, झाडू हे जेवतात.

झाडांतील भोजनगृह— अमेरिकेंत एकानें का २२ यार्ड परिघाच्या वृक्षाच्या पोकळींत ोजनगृह तयार केलें आहे व दुसऱ्या झा- ाच्या पोकळींत बसण्या उठण्याची व्यवस्था ेलेली आहे.

अडतीस महिने निजला होता!— आ ट्रियांत एका गृहस्थानें १८९७ सालीं क स्त्री पसंत करून तिजशीं लग्न लावण्याचा ेचार केला. परंतु त्याच्या आईबापांस तें ग्न पसंत पडलें नाहीं. याचे व त्यांचे के दिवशीं या लग्नासंबंधानेंच कडाक्याचें ांडण झालें व रागाच्या आवेशांत दोघांना- ी गोळी घालून त्यानें ठार मारलें. त्यानें ापला गुन्हा लपविण्याचा किंवा पळून ाण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. तेव्हां र्यातच त्याला ताबडतोब पकडण्यात ाले. परंतु त्याजवरील खटला सुरू होण्या ्यापूर्वीच १८९७ च्या नोवेंबर महिन्यांत ो झोंपी गेला, तो तहाच १९०१ च्या ानेवारीच्या मध्यापर्यंत म्हणजे ३८ महिने निजला होता. मध्यें बिलकूल जागा झाला ाहीं. जागा झाल्यावर त्याला खून केल्याचें बिलकुल स्मरण नव्हतें, इतकेंच नाहीं तर ापण एक रात्रभरच निजलों होतों अशी याची दृढ समजूत होती, ती कांहीं केल्या

केळीच्या सोपांचे दोर— हे दोर उत्तम रितीनें तयार होत असून त्याचा खपही युरोपांत चांगल्या तऱ्हेनें होतो प्रत्येक केळीचे दोर पावणेशेन रत्तल पर्यंत निघतात व त्याची किंमत युरोपांत सुमारें ३० पौंड येते. शिवाय हे दोर तयार करण्यास खर्चही कमी लागतो.

बक्षिसी—प्रसिद्ध थिआसोफिस्ट आनिबि- झांटबाई यांस गायकवाड सरकारांनीं एक हजार रुपये बक्षीस दिले आहेत. त्याच प्रमाणें प्रसिद्ध क्रिकेटीयर रणजितसिंहजी यांस ३००० रुपये दिले आहेत.

उंदराचा पांजरपोळ.— अमृतसर येथें उंदीर धरणारास उंदरामागें पैसा बक्षिस देण्याचें ठरविलें आहे. तिकडे लोक उंदीर मारीत नाहींत. हे उंदीर म्युनिसिपालिटी जिवंत बाळगणार आणि प्लेग बंद झाल्यावर ते सोडून देणार आहे.

हृदयद्रावक प्रसंग— नागपूर येथें इतवारीमध्यें एक झोपडींत दोन मजूर आ- पल्या बायका व एक मेहुणी यासह राहत असत. या शहरांत प्लेगचा बराच कहर उसळल्यामुळें अकस्मात् सदर दोन्ही मजूर त्याच्या तडाक्यांत सांपडून आजारी पडले त्यावेळीं त्यांच्या घरांतील बायकांनीं बिल- कुल घाबरल्या शिवाय त्यांची चांगली शुश्रूषा केली; पण शेवटीं ते मृत्युंगत झाले, तेव्हां त्या स्त्रियांनीं गांवांतील इतर नातेवाईक व इष्टमित्र मंडळीकडे जाऊन त्यांस आपल्या मयत झालेल्या नवऱ्यांच्या प्रेतांची व्यवस्था करण्याबद्दल विनंती केली. पण अशा कठीण प्रसंगीं कोण कोणास साह्य करणार? सर्वांनीं उडवाउडवीचे जबाब देऊन त्यांस वाटेस लाविलें. इतका भयंकर प्रसंग ओढवला असतांही त्या स्त्रिया घाबरून गेल्या नाहींत त्यांनीं लागलेंच प्रेतविधीचें सामान आणून आपल्या नवऱ्यांचीं शवें आपल्या डोक्यावर घेऊन स्मशानांत नेलीं. व तेथें त्यांची रीतिप्रमाणें व्यवस्था लाविली. ह्या स्त्रियांचें हें धैर्य पुष्कळांस लाजविल यांत शंका नाहीं. पण अशा प्रसंगीं मदत देण्यास माघार घेणें मनुष्यास शोभत नाहीं.

युक्तीवर युक्ती— जर्मनींतील डाक्टर गोल्ड स्मिड नांवाच्या शास्त्रज्ञानें थर्मिट नांवाची एक भुकटी तयार केली होती. ही पेटविली म्हणजे ती मुळें ३ हजार अंश उष्णता उत्पन्न होते व या भुकटीनें ताबडतोब लोखंडी मजबूत तिजोऱ्याहि स्वस्थपणानें उत्तम फोडतां येत असत. पण अलिकडे 'अँटि थर्मिट' म्हणून पदार्थ निघाला आहे. हा पदार्थ तिजोऱ्या तयार करितांना पत्र्यामध्यें घातला असतां त्या तिजोऱ्या थर्मिट भुकटीनें फुटत नाहींत आतां चोरा पासून रक्षण करण्या करितां ह्या नवीन तऱ्हेच्याच तिजोऱ्या घेतल्या पाहिजेत. शास्त्रीय शोध अनंत आहेत!

बदकाच्या अंड्यांची परीक्षा— 'क्यू' येथील येथ शाळेंत बदकाचीं अंडीं भट्टींत घालून तीं चांगलीं वाईट ठरवितात, बदकाच तप सण्यास आलें कीं तें एका लोखंडी पेटींत उताणें, कुशीवर, व पालथें असे पांचपांच दिवस ठेवून त्या दिवसांत किती मागें पुढें तें जातें हें टिपून ठरवतात. नंतर पुन्हा बर्फांत पांच प्रमाणें त्या बदकाळांवीं २९ दिवस परीक्षा होऊन तें पास नापास ठरविलें जातें.

सगळ्यांत लहान माणूस— हंगारी प्रां तांतील मेट्रस्की या नावाचा इसम आहे. त्याची उंची ३ फुटाहून कमी आहे. मोठ्या- शा बहुलीचे कपडे त्याच्या अंगास येतात. आपलें प्रदर्शन करून तो दरसाल २००० पौंड मिळवितो. गाणें, वाजविणें वगैरे गोष्टींत हा प्रवीण आहे आणि प्रकृतीनेंहि निरोगी आहे.

सगळ्यांत लहान इमारत— केंब्रिजजवळ फेनमध्यें एका बांबूच्याच्या झोंपडी आहे. ही झोंपडी सगळी लांकडी आहे. तिची लांबी रुंदी चार चार फूट आहे. तो या झोंपडींत सुखानें रहातो. त्या झोंपडीबद्दल त्याला वर्षाचें एक शिलिंग भाडें द्यावें लागतें.

वाऱ्याची गाडी— वाळूच्या निर्जल मैदानावरून जाण्यास मोटर गाड्या उत्तम प्रकारच्या उपयोगास येतात असें अनुभवानें सिद्ध झाल्यावर अशा निर्जल वाळवंटावरून शिडांच्या गलबतासारख्या चाकाच्या गाड्या बनवून वाऱ्याचे जोरानें चालवून पाहाण्याचे प्रयोग आतां शोधक लोकांनीं चालविले आहेत.

विधवांस ताकीद— नाभा संस्थानच्या राजेसाहेबांनीं असें फर्माविलें आहे कीं, विधवाविवाह हिंदुधर्मास अनुसरून आहे. जर एखाद्या विधवेचें आचरण संशययुक्त आहे असें आढळून येईल तर तिला संस्थानचे हद्दीबाहेर घालविलें जाईल.

इथर टेलिग्राफ— ईथर नामक आकाश द्रव्यांतून ताराशिवाय बातमी पाठविण्याची युक्ति मि. लॉज व डॉ. म्युरहेड यांनीं काढली आहे. या इथरग्राफांतून मार्कोनी पेक्षांही अधिक सुलभ व बरोबर बातमी पाठवितां येते.

## मुद्दाम दिलेल्या सवलती

दुष्काळ वगैरे मुळें इंदूर संस्थानांतील शेतकऱ्यांची फार दैना होऊन लागवड करणारांचा अभाव होऊन बरीच जमीन ओशीक पडूं लागली आहे आणि कित्येक गांव ओसाड पडले आहेत. इंदूर संस्थानांतील ही स्थिती सुधारण्याकरतां तिकडे जाऊन रहाणाऱ्या लोकांस पुढें दिल्या प्रमाणें सव- लती देण्यांत येतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. परदेशांतून किंवा परप्रांतांतून इंदूर संस्थानांत येऊन रहाणाऱ्या मुस्तवस्तू शेतकऱ्यास पुढील सवलती दिल्या जातील. तेव्हां 'मुस्तवस्तु' या शब्दाची व्याख्या प्रथम सांगण्यांत आली आहे. जो मनुष्य आपले नांगर व त्यास लागणारीं गुरें घेऊन येऊन संस्थानची मदत घेतल्या शिवाय शेतकाम करूं शकेल त्यास मुस्तवस्तु म्हणा- वयाचें. अगदीं ओसाड गांवांत जाऊन रहाणाऱ्या त्यास पुढील हक्क दिले जातील (१) परदेशांतून निदान दहा तरी मुस्तवस्तु लोक आणून जो मनुष्य अगदीं ओसाड गांवांत वस्ती करील त्यास त्या गांवची पाटी- लकी देण्यांत येईल. (२) जर एखादा शेतकरी परप्रांतांतून येऊन इंदुरमध्यें पूर्वी यंदा ओशीक पडलेली जमीन लागवड करील तर त्यास मागच्या शेतकऱ्याच्या मानानें रुपयास १२ आणे प्रमाणें पहिली दहा वर्षे धारा द्यावा लागेल. म्हणजे पहिली दहा वर्षे त्यास रुपयास ४ आणे प्रमाणें धाऱ्याची सूट मिळेल. (३) जर अगदीं ओसाड जमीन लागवड करण्यांत येईल तर पहिली पांच वर्षे मुळींच धारा पडणार नाहीं ६ व्या वर्षापासून १० व्या वर्षापर्यंत त्या जमिनीची सर्व्हे होऊन इतर जमिनींपेक्षां ४ आणे कमी धारा आकारला जाईल. त्याच प्रमाणें स्वतः विहिरी अगर तळीं म्हणून अगर तगाईच्या पैशानें ती म्हणून जो मनुष्य नवीन जमीन लागवड करील त्यासही निरनिराळ्या सवलती देण्यांत येतील असें सांगण्यांत आलें आहे लोकवस्ती असलेल्या गांवीं ओशाक आलेली जमीन दुसऱ्या प्रांतांतील लोकांनीं लागवड केल्यास त्यांस रुपयास १ आणे प्रमाणें पहिलीं पांच वर्षे सूट देण्यांत येईल, अगदीं ओशिक जमीन लागवड केल्यास पहिलीं तीन वर्षे मुळींच धारा घेण्यांत येणार नाहीं. घर बांधण्यास शक्य तेथें लाकूड फुकट देण्यांत येईल. व इतर ठिकाणीं तगाई देण्यांत येईल. त्याच संस्थानांतील लोक त्या सवलती मिळाव्या म्हणून लबाडी करतील तर त्यांस त्या दिल्या जाणार नाहींत. अशा प्रकारचे नियम प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. अंद०

## जाहिरनोटीस

चिरंजीव रा. रा. गदाधर श्रीधर जहा- गिरदार, अडगांव जहागीर ता० आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्माकडे माझ्या हिश्याचें जहागिरीचें उत्पन्न अजून चलूं साल म्हणजे १३१२ फसली अखेर चुकतें झालें नाहीं. दरसाल थोडथोडी रक्कम तुह्माकडे येणें राहात गेली तीही बरीच फुगली आहे. मी यंदा समक्ष येऊन सर्व रकमेची मागणी केली तर ती तुह्मी आज उद्या देतो देतो म्हणतां. मला पैशाची निकड आहे तर ही नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत सर्व रकम चुकती करून पावती घ्यावी. तसें न केल्यास दिवा- णींत दावा करून या नोटिशीच्या व इतर खर्चा सुद्धां सर्व रक्कम सव्याज भरून घेतली जाईल. तसेंच मी माझ्या तर्फे रा० रा० गणेशीलाल मुत्सद्दीलाल गौड ब्राह्मण राह- णार अडगांव जहागीर यांस कुलमुखत्यार- पत्र पूर्वींच दिलें आहे तर मला तुह्मा कडून घेणें असलेली रक्कम चुकती त्यांच्या जवळ द्यावी म्हणजे मला कायदेशीर रितीनें पोंचली असें समजावें. मी मध्यंतरीं पंजाबांत परत देशीं गेले किंवा येथेंच राहिले तरी सर्व हिशोब माझे मुखत्यारास समजून देऊन त्यांची चुकती पावती घ्यावी. कळावें. तारीख १७।३।०३ ई.

सही

आनादेवी जवजे नंदलाल जहागीर- दार राहणार अडगांव जहागीर.

निशाणी ()

REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस................१ ८.
बाहेरगांवी टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास..........................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आत ८० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस.... .....८१

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid advance,
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 30 MARCH 1903 NO 12

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ३० माहे मार्च सन १९०३ इ० अंक १२

## पत्रव्यवहार

मि० बलदेव गणूलाल प्रेसिडेंट स्कूल कमिटी रामतीर्थ हे कळवितात कीं, आमची रामतीर्थ येथील शाळा सन १८७४ सालीं स्थापन होऊन ती १८९४ सालांपर्यंत एक मास्तरी पुरतीच सरासरी चालली पुढें मिस्तर रामचंद्र केशव हेडमास्तर हे येथें बदलून आल्यापासून त्यांच्या मेहनतीनें व मनमिळाऊ पणानें ती वाढत वाढत आज बरीच भरभराटीस येऊन पोहोंचली आहे. येत्या एप्रिलपासून सहावी इयत्ता मराठी व बोर्डिंग सुरू होणार आहे बोर्डिंगांत मुलांची सर्व तऱ्हेची सोय होऊन गरीब रितीरिवाजा प्रमाणें खाण्याचा खर्च सरासरी २॥ रुपया पर्यंत येईल. तरी होतकरू व ज्यांना शिकण्याची जरूरी आहे अशा मुलांनीं अवश्य येण्याचें करावें. गांवातील स्कूलकमिटी व संभावित गृहस्थ यांचे पूर्ण आश्रयानें व रावसाहेब खुशालरावजी देशमुख अंदुरेकर यांचे पूर्ण मदतीनें वरील व्यवस्था झालेली आहे. हें त्यांना भूषणस्पद आहे. तसेंच मि. रामचंद्र केशव हेडमास्तर यांच्या श्रमाचें चीज म्हणजे त्यांची बढती लवकरच व्हावी ही ईश्वरास प्रार्थना आहे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती चैत्र शुद्ध १ शके १८२५

## लोकांचा ईश्वरी हक्क.

परवां एक गृहस्थ आम्हांला असें म्हणूं लागला कीं "काल अमक्या अमक्या ठिकाणीं कांहीं प्रतिष्ठित मंडळी बसली होती त्या मंडळींत आपल्या संबंधाच्या कांहीं निंदात्मक गोष्टी चालल्या होत्या" जो गृहस्थ आमच्याशीं बोलला त्याला असें वाटलें होतें कीं हें विधान ऐकून आम्हाला कदाचित् राग येईल. परंतु आमची मनोवृत्ति यत्किंचित् न बिघडल्यामुळें त्या गृहस्थास थोडेसें आश्चर्य वाटलें असावें असें दिसलें त्याच्या विधानास आम्ही इतकेंच उत्तर दिलें कीं "दुसऱ्याच्या निंदा करीत बसणें किंवा उखाळ्या पाखाळ्या काढून त्यांतच घंटेच्या घंटे करमणूक करीत बसणें हा एक मनुष्य जातीस परमेश्वरानें दिलेला हक्क आहे" जगांतील सर्व समाजांत निंदा करीत बसण्याची जी लोकांची बलिष्ट प्रवृत्ति दिसते

सिद्ध होतें. हें अनुमान काढण्यास मोठें सूक्ष्म निरीक्षण पाहिजे आहे असें नाहीं. आपलाच समाज घ्या. यांत जेथें जेथें पुरुष किंवा स्त्रिया यांचे जमाव एकत्र झालेले दृष्टीस पडतात तेथें फार क्वचित् प्रसंग खेरीज करून कोणा तरी व्यक्तीच्या संबंधानें निंदात्मक टीका चाललेली आहे असें आपणास ऐकूं येईल. प्रत्येक समाजांतील धर्मग्रंथ, धर्मगुरु आणि इतर साधुसंत निंदे पासून लोकांची प्रवृत्ति दूर ओढण्या करितां फार प्राचीन काळा पासून उपदेशरूपानें खटपट करीत आले आहेत. तथापि या खटपटीस तादृश यश आलें आहे असें कधींही म्हणता येणार नाहीं. चमत्कार हा कीं लोकांच्या टीकेस कोणीही चुकतो असें मात्र नाहीं. शेगांवचे गणपति बुवा घ्या, देऊळगांवराजाचे रंगनाथ बुवा घ्या, समाजांतील मोठा सज्जन घ्या, किंवा दुर्जन घ्या; मोठा अधिकारी घ्या किंवा लहानसा शिपुरडा घ्या, एकूण एक सर्वजण कोणत्याना कोणत्या तरी रूपानें लोकांच्या टीकेच्या तडाख्या खालीं येत असतात. जे टीका करीत असतात त्यांच्या टीका अन्यत्र चाललेल्या असतात. व या प्रमाणें सर्व काळ हा क्रम सुरू असतो. याचें वर्म पाहूं गेलें असता असें दिसतें कीं सर्व मनुष्यांच्या मानसिक प्रकृति किंवा रचना भिन्न असल्यामुळें प्रत्येक मनुष्य सहजच भिन्न प्रकारें विचार करितो. तसेंच प्रत्येक मनुष्याची आवडनावड ही देखील भिन्न असते तिसरी गोष्ट अशी कीं जसें ड्रॉइंग मध्यें एकच पदार्थाचें चित्र काढण्यास तो पदार्थ मध्यें मांडून त्याच्या सभोंवतीं विद्यार्थी बसलेले असतात आणि प्रत्येक विद्यार्थी आपापल्या प्रेक्षणस्थानबिंदू पासून तो पदार्थ पाहून त्याचें चित्र काढतो, त्या प्रमाणें प्रत्येक मनुष्य आपापल्या प्रेक्षण स्थान बिंदू पासून दुसऱ्या प्रत्येक मनुष्याला पाहून त्याच्या कृत्यांविषयीं विचार करित असतो. ड्रॉइंगमध्यें पदार्थ पाहण्याचे जितके भिन्न भिन्न कोण असतात तितक्याच भिन्न भिन्न आकृति होतात. परंतु एका मनुष्यव्यक्तीकडे ज्या दुसऱ्या हजारों व्यक्ति पाहतात त्यांची तितकीं वेगळीं मतें होण्याला प्रेक्षणीचा स्थानबिंदू हें एक कारण असून शिवाय अभिरुचि आणि मानसिक प्रकृति यांचा मात्र मिलाफ होऊन अनंत भिन्न तऱ्हा होतात. कांहीं वेळा आपणास असें आढळतें कीं एका व्यक्ती संबंधानें दुसऱ्या दहा वीस व्यक्तींचें एकच मत असतें परंतु हें एक मत सरासरी गोळा बेरजेचें असतें. वास्तविक पाहूं गेलें तर सर्वांचीं मतें भिन्नच असतात. अशी सृष्टीची स्वाभाविक रचना असल्यामुळें एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीवर टीका करावी यांत कांहींच नवल नाहीं. आणखी एक गोष्ट लक्षांत

आहे ती हा कीं प्रत्येक मनुष्य आपणास शहाणा समजतो आणि त्या शहाणपणा बद्दल आपल्या ठिकाणीं समाधान मानतो अशी परमेश्वरानें योजनाच केलेली दिसते. याचा प्रत्यय कोणास पाहायाचा असल्यास अगदीं नीच, निकृष्ट, अज्ञान असा दिसणारा जो कोणी मनुष्य असेल त्याच्या जवळ एखाद्या विद्वानानें अगदीं भोळ्या बेहगळ मनुष्याचें सोंग घेऊन जाऊन बसावें, आणि राजकीय सामाजिक, किंवा दुसऱ्या कोणत्याही विषयावर त्या मनुष्यांचे काय विचार आहेत ते मोकळेपणानें बोलून दाखविण्याची त्यास सवड द्यावी. त्यावेळीं मोकळेपणानें बोलण्याची त्या मनुष्याची लहर देखील लागलेली असावी, म्हणजे त्या विद्वानास असें आढळून येईल कीं जरी हा मनुष्य अज्ञान दिसतो तरी सर्व विषयावर याला विचार करितां येतो आणि त्याचे कांहीं तरी बनलेले विचार आहेत अशा वेळीं सहजगत्या त्या ठिकाणीं दुसरे कोणी मनुष्य असतील तर तेही मध्यें तोंड घालून पहिल्या मनुष्यास खोडून काढतील आणि आपलीं मतें कांहीं वेगळींच सांगतील. हे सर्व अडाणी लोक बोलत असतां मोठमोठ्या विद्वानास आणि मुत्सद्यांस-ही मूर्ख ठरवितील. यावरून इतकेंच ध्यायाचें कीं "मी शहाणा, मी हुशार, माझी बुद्धि खोल" हा विचार प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं वागतो; आणि या मुळेंच प्रत्येक मनुष्यास एक प्रकारचें समाधान असतें, अडाणी मनुष्याशीं वेडेपणाचें सोंग घेऊन बोलणारा वर जो विद्वान सांगितला तो जर त्या अडाणी मनुष्यास म्हणेल कीं, "काय हो तुम्ही मोठे चतुर दिसतां, तुमचे विचार मोठे खोल आणि धोरणी आहेत; तुम्हाला जर लिहितां वाचतां येतं तर तुम्ही दिवाणगिरीहि काम केलें असतें" ही तारीफ त्या मनुष्यास बरोबर पटून तो कपाळास हात लावून म्हणेल कीं "तुम्ही म्हणतां तें सगळें खरं; पण नशिबानें साथ केला ना." त्याची भाषा अर्थात थोडा ग्राम्य तऱ्हेची येईल. या विवेचनावरून स्पष्ट लक्षांत येईल कीं प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यास बरें वाईट म्हणून त्याची निंदा किंवा स्तुति करावी अशी सृष्टिकर्त्याचीच योजना आहे व म्हणून दुसऱ्याची निंदा करणें हा एक मनुष्यास ईश्वरदत्त हक्क आहे असें आम्ही वर म्हटलें आहे.

तथापि विचारी मनुष्यास असें वाटेल कीं या हक्काचा वाटेल तसा उपयोग विद्वान् आणि अविद्वान् यांनीं सारख्याच रीतीनें करावा हें रास्त नाहीं. मनुष्य स्वभावाची वर जी उपपत्ती सांगितली आहे ती

उपपत्ती कारितां अविद्वानांहून भिन्न रीतीनें वागावें हेंच योग्य होईल.

प्रत्येक मनुष्य आपापल्या बुद्धीप्रमाणें क्रिया करितो म्हणजे वागतो. प्रत्येकाची परिस्थिति आपल्या किंवा अन्य लोकांच्या परिस्थितीहून वेगळी असते तेव्हां त्याचें वर्तन, भिन्न परिस्थितींत असणारे, व भिन्न विचाराचे जे आपण, त्या आपणास जरी आवडेल नाहीं, तरी आपण त्याला नांवें ठेवणें किंवा त्याची निंदा करणें हें आपणास योग्य नाहीं. कारण एखाद्या व्यक्तीला नांवें ठेवण्यास त्या व्यक्तीच्या परिस्थितीची जितकी आपणास माहिती पाहिजे तितकी जर नाहीं तर त्या व्यक्तीच्या वागण्यासंबंधानें जो आपण आपला अभिप्राय किंवा ठराव देतो तो चुकीचा असणें फार संभवनीय आहे. असा चुकीचा ठराव आपण दिला असतां, अन्य लोक तो मान्य करून त्या व्यक्तीची निंदा करूं लागतील व तेणें करून त्या व्यक्तीच्या दुःखास किंवा हानीस आपण कारणीभूत होऊं. व तेणेंकरून सर्वज्ञ परमेश्वरापुढें आपण अपराधी ठरूं. विद्वान् आणि मोठे असे जे म्हणविले जातात त्यांनीं या गोष्टी विषयीं फारच खबरदारी घेतली पाहिजे. सामान्य लोकांची अशी चाल आहे कीं त्यांना कोणतीही गोष्ट आयती मिळेपर्यंत ती पाहिजे असते. स्वतः खटपट करून मिळविण्यास फार थोडे तयार असतात. जसे चार दोन स्वयंपाकी स्वयंपाक तयार करितात आणि हजारों लोक ते तयार केलेलें अन्न आयतें खातात, त्याप्रमाणें सर्व गोष्टींत सामान्य लोकांची स्थिति असते. अमुक एक मनुष्य अमक्या प्रकारचा आहे असें एखाद्या मोठ्या मनुष्याच्या तोंडून निघालें, म्हणजे सामान्य लोक ते शब्द उचलतात आणि मग ती हांक जितकी लांबवर पोहोचेल, तितकी पोहोंचविण्याच्या खटपटीस लागतात; आणि दुसऱ्या टीकेस सर्वथैव अयोग्य अशा एखाद्या मनुष्याची टीका समाजांत विनाकारण सुरू राहते.

मोठ्या मनुष्यांनीं दुसरी एक खबरदारी घेतली पाहिजे ती ही कीं, त्यांच्या संग्रहास असणारे, किंवा त्यांच्याशीं समागम ठेवणारे किंवा त्यांच्या कृपेची अपेक्षा करणारे असे जे अनेक हलकट किंवा सामान्य दर्जाचे लोक असतात ते त्यांस एखाद्या गृहस्था संबंधानें ज्या बऱ्या वाईट गोष्टी येऊन सांगतात, त्यांचा स्वीकार त्यांनीं फार काळजीनें केला पाहिजे. एखाद्या मनुष्याचें बरें वाईट वर्तन प्रत्यक्ष पाहून त्याच्या टीका करण्याचा जो मनुष्याचा स्वभाव आहे तो क्षम्य आहे. पण समाजांत कित्येक दुर्जन असतात, त्यांचा [illegible] असतो कीं ज्या गोष्टीशी कांहीं [illegible] नाहीं अशा

दुर्जनत्वामुळें, एक गोष्ट एका प्रकारें पाहून अनुमानानें तिला भलतेंच स्वरूप देऊन, ते तशी सांगत फिरतात. उदाहरण, इतर जिनसां प्रमाणें ज्या दुकानांत मद्यही विक्रीस ठेविलेलें असतें तेथून जर कोणी औषधाची कुपी आणली तर त्यानें मद्याची कुपी आणली असें ते लोकांस सांगत फिरतात; आणि आपल्या भाषणाची सत्यता वाटण्याकरितां 'मी स्वत: पाहिली' हा वर शेरा मारतात. दुसरें उदाहरण एखादा मनुष्य आपल्या स्वत:च्या बहिणीशीं किंवा अन्य आप्त स्त्रीशीं रस्त्यात किंवा बाहेर कोठें भाषण करीत असला तर, त्या ठिकाणीं कुत्सित कल्पनेचा आरोप करून त्या मनुष्याची बदनामी करितात. हीं दोन उदाहरणें उपलक्षणार्थ दिलीं आहेत. या वरून वाचकांनीं सर्व गोष्टींची कल्पना करावी. आणखी एक उदाहरण देणें जरूर आहे. कारण तो प्रकार वरील दोन उदाहरणांहून भिन्न आहे. असें समजा कीं, महामारीच्या दिवसांत डाक्तराच्या सांगण्यावरून एखाद्यानें औषधा करितां मद्य आणलेलें असलें तर अशा वेळीं हे निंदाप्रिय दुर्जन, अमुक एक गृहस्थ निरंतरचा मद्यपी आहे असा लोकांत त्याचा दुर्लौकिक करण्यास तत्पर असतात. तात्पर्य, मोठ्या मनुष्यांनीं जी कोणती बातमी त्यांस मिळेल ती सत्य म्हणून कधीं घेऊं नये. प्रत्येकाचें मुख्य कर्तव्य हें आहे कीं, त्यानें कोणतीही गोष्ट स्वतः पाहून, तिजविषयीं विचार करून, ती संबंधानें जरूर वाटल्यास आपला अभिप्राय बोलून दाखवावा. तो देणें ही धोक्याचें आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. आतां सर्व गोष्टी प्रत्येकानें पाहणें अशक्य आहे. या करितां इतरांच्या सांगण्याला मान देणें आवश्यक आहे. आणि सर्व व्यवहार असाच चालला आहे. तथापि जेव्हां दुसऱ्या संबंधानें आपलें बरें वाईट मत ठाम ठरविण्याचें असेल तेव्हां शहाण्या मनुष्यानें चांगला विचार केला पाहिजे. ज्या वेळीं एखाद्या व्यक्तीविषयीं अनेक लोकांचें मत एकच पडतें त्यावेळीं तेंच मत ग्राह्य करून चालण्यास कांहीं हरकत नाहीं पण ज्यावेळीं एखाद्या संबंधानें फारच थोड्या व्यक्तींचें मत वाईट पडतें व एकंदर जनसमूहाचें मत चांगलें असतें, अशा वेळीं वाईट मत आप[illegible] जास [illegible] प्रमाणें फार गुप्त रीतीनें 'चांगल्या' मनुष्याकडून मिळालें आहे इतक्याच करितां तें ग्राह्य आहे असें मनाला बिलकुल वाटूं देऊं नये. जो मनुष्य आपणास 'चांगला' वाटतो, तो कदाचित् विवक्षित व्यक्तीच्या संबंधानें शत्रुभावानें वागत असेल किंवा वर सांगितल्या प्रमाणें त्याचें प्रत्यक्ष पाहणें किंवा अनुमान हीं चुकलीं असतील असेंच समजलें पाहिजे. अशा रीतीनें मिळालेलें मत प्रसृत न करण्याविषयीं तर मोठे म्हणविणाऱ्या मनुष्यानें फारच काळजी घेतली पाहिजे. मोठेपणाचें लक्षण हेंच कीं "दुसऱ्या संबंधानें मोठ्या मनुष्याचे विचार फार उदारपणाचे असले पाहिजेत"

हा [illegible] मोठेपणाचा भेद इंग्रजी रियासती म[illegible] [illegible]गोपत चालला आहे असें दिसतें. [illegible] मोठा पगार किंवा पाहत आहेत. मनाचा मोठेपणा हाच जो खरा मोठेपणा तो आपल्या ठिकाणीं आहे किंवा नाहीं हें मोठें म्हणविणारांनीं आत्मपरीक्षणानें पाहिलें पाहिजे. मनतोक्त बोलण्याचा ईश्वरदत्त हक्क लहान मोठ्यांनीं सारख्याच रीतीनें बजावणें सर्वथैव अशक्य होय. हा हक्क जितका नीचांचा आहे तितका महतांचा नाहीं. असे महापुरुष इंग्रजींत देखील इकडे तिकडे झळकताहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांची संख्या वाढावी म्हणून स्मरणादाखल वरील चार शब्द लिहिले आहेत.

## औद्योगिक मंडळी

येथील 'औद्योगिक मंडळी' ची संस्था म्हणजे कुमार श्री हरमामजी यांची खरी आठवण होय. ही मंडळी एक वर्षाच्या कालांतलीच आहे पण या मंडळीच्या भावी कार्यमालेंत आमचें सर्व आशाधन संचित आहे, आणि म्हणूनच आम्ही या संस्थेची मोठी मातबरी समजतों. गेल्या मंगळवारीं कुमार श्री हरमामजी हे आकोल्याहून रवाना झाले तेव्हां त्यांच्या जाण्यापूर्वीं या संस्थेकडून त्यांस सकाळीं पानसुपारी देण्यात आली. या पानसुपारीच्या समयीं कुमार साहेबांनीं आपलें हृद्गत व आपला कळवळा हीं मोठ्या प्रेमळपणानें व्यक्त केलीं. ते म्हणाले कीं, ही संस्था हा अल्पसा आरंभ खरा पण मला या संस्थेकडून आपण आमंत्रण दिलें व आपला निरोप घेण्याची संधी दिली या बद्दल मी आपला ऋणी आहे, माझ्या बदली संबंधानें मला वाईट वाटत नाहीं, सरकारी चाकरी मध्यें असें भ्रमण करावेंच लागतें, मला बदली पाहिजेच होती आणि त्यांतल्या त्यांत बुलढाणा जिल्हा मिळाला ही विशेष आनंदाची गोष्ट होय; पण मला यापेक्षांही आनंद वाटतो कीं मि० रुस्तुमजी साहेबा सारखे मुख्य अधिकारी या संस्थेला आपला पूर्ण आश्रय देतील. ते फार मेहनती, धोरणी व धुरंधर आहेत तेव्हां त्यांच्या साह्यानें ही संस्था चांगली भरभराटीला येईल. त्यांच्या स्वाधीन मी ही आपली आवडती संस्था करितों, माझ्या आयुष्यांतील मुख्य गोष्ट ही संस्था होय. या औद्योगिक मंडळी संबंधानें माझे सर्व विचार एकवटले आहेत आणि तिच्या अभिवृद्धीकडे माझें सर्व लक्ष्य सदा राहील. आपला देश फार गरिबीला पोंचला आहे आणि आपण प्रस्तुत आरंभलेल्या संस्थेच्या द्वारानेंच कांहीं तरी सिद्धी होण्याचा संभव आहे. उद्योग वृद्धि झाल्याशिवाय दुसरी गतीच नाहीं. आणि तीच गोष्ट आपणाला सध्य करून घ्यावयाची आहे. देशी कलाकुसरी व देशी जुने धंदे यांचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं आपणास याच मार्गानें गेलें पाहिजे. शेवटीं कुमार साहेबांनीं या संस्थेची हकीकत वारंवार कळविण्याची विनंती केली व सर्वांचा निरोप प्रेमपूर्वक घेतला. या सभेत मे. रुस्तुमजी साहेब समक्षच हजर होते आणि त्यांनीं आपल्या चोकस प्रश्नद्वारा दृश्यानें व अनुकूल विचारदर्शनानें आपली पूर्ण संमती दाखविली व पूर्णपणें आश्रय [illegible]

या पानसुपारीच्या प्रसंगीं रावसाहेब देवराव विनायक यांनीं जी हकीकत कळविली तिच्यावरून अशी खात्री वाटते कीं, ही संस्था लोकाश्रयास चांगली उतरली असून कार्यवशात् या संस्थेच्या आश्रयानें पुष्कळसे नवीन उद्योगधंदे चालूं राहतील. सध्यां धावत्या धोट्याचे माग चालू केले आहेत आणि त्या मागावर काढलेलें निरनिराळया प्रकारचें कापड, लुगडीं, मुकटे इत्यादि प्रदर्शनासाठीं टेबलावरच मांडले होते, तसेंच येथील फ्याक्टरींतील इंजिनिअर रा. रा. गोविंदराव कोल्हटकर यांनीं काढलेलें सरकीचें तेलही नमुन्या दाखल पाहण्यासाठीं मांडलें होतें. तूर्त थोडेच जिन्नस मांडीले होते खरे पण कांहीं कालानें या औद्योगिक मंडळीचा चांगला उत्कर्ष होईल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

## अनाथालय.

आमचे कार्यबंधु 'प्रमोदसिंधु' कर्ते आम्हांवर विशेष रागावले आहेत असें दिसतें. 'प्रमोदसिंधु' काराचा सध्यां 'अनाथालय' हा मुख्य विषय आहे. या बाबदींत त्यांचें चित्त अगदीं तल्लीन आहे आणि त्यांच्या भावी 'अनाथालया' विषयीं ते जीव कीं प्राण करितात हें पाहून मोठा आनंद वाटतो. वऱ्हाड प्रांतासाठीं 'अनाथालय' उमरावतीत स्थापावें, तेथें अनाथ म्हणजे पोरक्या मुली व मुलें एकत्र करावी आणि त्यांचें संगोपन करून व त्यांस शिक्षण देऊन त्यांस दुनियेदारीला लावावें असा या संस्थेचा उद्देश आहे. मुकें, आंधळे, पांगळे व थोटे अशा दुर्बळांस या आलयांत आश्रय देण्यांत येईल किंवा नाहीं या संबंधानें आमच्या बंधूच्या लेखांत कोठेंच नीटसा उल्लेख दिसत नाहीं. प्रमोदसिंधु कर्त्यांनीं 'अनाथालया' चा विषय हातीं घेतल्या दिवसा पासून आमचा अभिप्राय ऐकण्याची त्याची इच्छा विशेष दिसली आणि तो आम्हीं त्यांच्या मर्जी प्रमाणें लवकर प्रदर्शित केला नाहीं म्हणून त्यांची मुद्रा अलिकडे फार रागीट दिसते. त्यांच्या कोपाला आम्ही पात्र झालों याबद्दल आम्हाला मोठी दिलगिरी वाटते, पण दुःखांत सुख इतकेंच कीं आमच्या 'प्रमोदसिंधु' काराच्या मनोरथाचा मनोरा आत्ते लेखीं वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर उमरावतीस उभारला जात आहे. या अनाथालयाच्या संस्थेचा पहिला चिरा उमरावतीची सार्वजनिक मंडळी बसविणार आहेत, तेव्हां या संस्थेच्या भावी यशश्री संबंधानें आमच्या मनांत किंतुच राहिला नाहीं. उमरावतीच्या सार्वजनिक मंडळीमध्यें रावश्री खापर्डे, मुधोळकर व जोशी इत्यादि गृहस्थ पुढारी असतात आणि त्यांच्या आश्रयाखालीं ही संस्था निघणार आहे, तेव्हां ही संस्था चांगली आहे अशा विषयीं निराळे साक्षीदार नकोच आहेत.

आमच्या 'प्रमोदसिंधु' कारांचा प्रयत्न मोदकारक आहे हें ठीकच आहे. आमचें मत 'अनाथालया' च्या युक्तायुक्ते संबंधानें निराळें नाहीं. पण या गोष्टीच्या शक्यते [illegible] मोठीच शंका आहे. चालू कार्य हातीं आहे. तेव्हां प्रयत्न निर्फळ झाला तरी तो एका प्रकारचा शिक्षक होतो असें आम्हांस वाटतें, आणि म्हणूनच आम्ही 'प्रमोदसिंधु' कर्त्यांस आपल्या मौनवृत्तीनेंच सहानुभूति दर्शविली. पण त्यांच्या विचारांचा विकास होऊन त्या विचाराची उभारणी 'अनाथालया' च्या रूपानें होत आहे. हें ऐकून आमच्या बंधूचें अभिनंदन केल्यावाचून आमच्यानें राहवत नाहीं.

पंडिता रमाबाईच्या शारदा सदनाची हकीकत वाचून अनाथालयाचे विचार प्रमोदसिंधुकर्त्यांस सुचले आणि त्यांच्या आठही लेखांत जो एका प्रकारचा उद्वेग आहे तोच पुण्यकार्याविषयीं तत्परता दर्शवीत आहे अशी आमची समजुत आहे. आमच्या सामाजिक स्थितीला पोरक्या मुलामुलींचें अनाथालय नको आहे. इतर राष्ट्रांच्या मानानें हिंदु समाजांत पोरक्या मुलामुलींचा वर्ग फार लहान आहे; किंबहुना असा वर्ग काढण्याचा प्रयत्न निर्फळच होईल. आपला समाज कितीही दरिद्री असो व कितीही कर्तव्यशून्य असो तो निदान आपली अपत्यरूपी आनंदग्रंथी फार चांगली जतन करितो असें आम्हांस वाटतें. अगोदर अनाथालयाची जरुरी नाहीं, आणि निदान उमरावती शहरीं एक आलय स्थापून कितीसा फायदा होणार आहे हें वर वर पाहणाऱ्यांसही दिसून येईल. आपल्या लोकाची मोठी अडचण निराळीच आहे. गरिबी हात धुऊन मागें लागली आहे. या गरिबी मुळेंच मुलाबाळांचें संगोपन चांगलेंसें होत नाहीं. लोकांची दैना दूर होईल, शिक्षणाच्या सोयी वाढतील, उद्योगधंदे जुने नवे होतील, व लोकांस रोजगार मुबलक मिळेल अशा तजविजी व्हावयाला पाहिजेत. पोरकीं मुलें गोळा करून त्यांस 'अनाथालया' च्या स्वाधीन करण्यापेक्षां त्यांस त्यांच्या आप्तस्वकीयापाशींच राहूं द्यावें हा नीट मार्ग होय. ख्रिस्ती मिशनरी मुलामुलींचे कळप गोळा करितात पण त्यांत त्यांचा धर्मप्रसाराचा हेतु असतो. गरिबीच्या लाचारीमुळें हीं मुलें त्यांस मिळतात तर तें कारण दूर करण्याच्या उद्योगाला आपण लागलें पाहिजे. निदान 'अनाथालया' चें प्रस्थ नको हें आम्ही निश्चयपूर्वक कळवितों. आमचा अभिप्राय प्रतिकूल आहे म्हणून आपचे बंधु राग न करिता लोभच चालू ठेवितील अशी आम्ही उमेद बाळगतो. उमरावतीची सार्वजनिक मंडळी आमच्या चांगली परिचयाची आहे, व त्यांच्या आश्रयाखालीं 'अनाथालय' खरोखर अनाथ होईल; तथापि सन्मार्गांत लागलेल्या लोकांचा फार हितावह असतात या न्यायानें आम्ही 'प्रमोदसिंधु' कारांच्या 'अनाथालया' चें मंडनच करितों.

## प्लेग

प्लेगाचें मान सध्यां स्थिर दिसतें. आकोल्यास मृत्यूचें मान वाढत नसून दररोजची मृत्युसंख्या आठ दहा वर येऊन एक दोन दिवसांत बसेल असा रंग दिसतो. उमरावतीस दररोज पांच सहा प्लेगाचे रोगी मरतात. कांहीं खेड्यापाड्यांतूनही प्लेगाचा उपद्रव तरळक तरळक आढळतो. उत्तरोत्तर उन्हा

people of India. There is a peculiar mously depreciated their small savings

ठा कडक होऊं लागला आहे. उष्णतेच्या मनानें प्लेगाची वाढ खुंटेल इतकेंच नाहीं तर प्लेगाचें कृमि मरण पावतील व हा रोग अगदीं लुप्तप्राय लवकरच होईल असा रंग दिसतो. प्लेगाची भरती संपून ओहटी लागण्या पूर्वींची सध्यां समा झाली आहे. हा उष्णकाल आमची काळजी दूर करीत आहे. ईश्वर कृपेनें ही प्राणसंशयाची वेळा लवकरी निघून जावो !

## काकबली

माणसाच्या अगोदर उंदीर जसे प्लेगाला बळी पडतात आणि भावी अरिष्ट ध्वनित करितात तसा एक उपयोग कावळ्या पासून शिकण्या सारखा आहे. असा अनुभव सांगतात कीं, जेथें प्लेग होतो तेथें कावळा फिरकत नाहीं. पशुपक्ष्यांनाहि कांहीं उपजत बुद्धि असतें. याची प्रचिती गेल्या वर्षीं सेन्ट अँड्रीज पर्वता जवळ चांगली आली. तो ज्वालामुखी अग्नीचा वर्षाव करूं लागण्या पूर्वींच त्या पर्वताच्या आसमंतांतील वन्य पशु व पक्षी हे दूरवर निघून गेले होते. सर्प देखील वारुळें सोडून गेले होते असें म्हणतात. तसाच प्रकार कावळ्या संबंधानें आहे असें म्हणतात. ही गोष्ट खरी असेल तर त्याचा फायदा घेण्याला निदान हिंदु लोकांस फारसे श्रम नकोत. त्यांच्या पुरातन धर्मांत काकबळीचा संप्रदाय आहे भोजनाला बसण्यापूर्वींची ही अखेरची गोष्ट होय. आतां ही गोष्ट खरी कीं, काकबळीच्या धारा आमच्या आचार विचारांत बुजल्या सारख्या झाल्या आहेत तथापि त्यांची साफसूफ व दुरुस्ती प्लेगाच्या निमित्तानें करण्याला कांहीं हरकत नाहीं. काकबली पुनः प्रचलित करण्याला ही संधी चांगली आहे.

## The Berar Samachar

MONDAY MARCH 30 1903

It is a satisfaction to note that the Government of India are able to declare a partial remission of the salt—tax. This state of things is due to sound and improved position of the Indian finances. The Budget of the Empire for 1903—04 is one of surplus. The coming year promises to continue the prosperity of the three preceeding years. With the total revenue of 114 crores and a half there is the estimate of meeting the growing expenditure of about 113 crores of rupees. It will thus be seen that the next year will be one of a surplus of a crore and a half. This happy prospect leaves no anxiety for the year to come and with the accumulated balance of the three preceeding years the Government of India are prepared to remit a large amount on account of the income—tax and the Salt—tax. This happy declaration will be received with delight all over India and we think that the year of the Delhi Durbar will ever remain a memerable year for such a relief in matters of taxation shown to the poorer classes of the Indian population. It speaks well for the occasion that it should be marked in red letters for the special boon it confers upon the poorer people of India. There is a peculiar interest with which the Coronation will be remembered by the people at large and this year's financial statement consecrates it for the special concessions it extends to the people in the matter of two most important taxes. The budget of the Empire affords an occasion for a candid expression of the different opinions on the difficult problem of India. We have read with delight the various speeches that are full of eloquence, suggestive reflections and a number of proposals to meet the several requirements of the nation. However we are constrained to say that we do not agree with the stereotyped views of the growing prosperity of the Indian population. The story of the economic progress does not stand the test of our experience. Lord Curzon took this opportunity of vindicating the several programmes with which he concerned himself in the past four years of his vice-royalty. We must confess that Lord Curzon is welcome to us for his philosophy of action. His Excellency is a living example of stupendous energies. His speech is full of references as to how he chalks out the further progress of his measures of reforming the administration of the country on a more substantial and civilized basis of Government. But we do not see our way to support the cheerful optimism which runs throughout his eloquent speech. We do not mean to foster a complaining mood of mind but the difficulty is to reconcile the prosperity in the Budget with the matter—of-fact poverty of the people. It might be true that the condition of the people was better in one year than that of another but that argument should not carry us away from the extreme poverty that we experience in our daily routine of life. The Hon'ble Sir E. Law thus propounds His theory of the economic progress.

"As a general indication of the increasing wealth of the tax-payers, I think that a very fairly correct estimate of the position is to be obtained by noting the increase in revenue returns under heads, the returns from which are manifestly dependent on their spending power. Such heads are Salt, Excise, Customs, Post Office and in a better degree Stamps, and I give the following figures showing progress in revenue under these heads during the last three years. The inevitable deduction from the figures tabulated must be that *the material prosperity of the people as a whole is making good progress.*"

We find a stiff and unambigious reply in the speech of Hon'ble Mr. G. K. Gokhale. The portion runs as follows:—

The annual death rate, independently of famine and plague, has been steadily rising for the last twenty years showing that a steadily increasing proportion of the population is being underfed; the increase of population during the last decade has been much less than normal; there has been a diminution of the net cropped area in the older Provinces and more or less general shrinkage of the area under superior crops; the indebtedness of the agricultural population has been alarmingly on the increase all over the country. Their losses in crops and cattle during the last five years have been estimated at 300 crops of rupees; the currency legislation of Government has enormously depreciated their small savings in silver; the wages of labourers have not risen, during the last twenty years and more in proportion to the rise in the prices of necessaries. I venture to think that unless these disquieting symptoms are properly diagnosed, not even the high authority of my Hon'ble friend will suffice to convey any assurance to the public mind that "the material prosperity of the people as a whole is making good progress," and that no apprehensions need be entertained for the future, if only the revenue under certain heads continues to advance as it has done during the past three years."

But Lord Curzon does not seem to be satisfied because he proceeds to observe:—

Year after year we have put forward at this table statements of figures and facts tending irresistibly to show that there is a great reserve economic vitality in India, which not even plague and famine and the expenditure entailed thereby have availed to subdue. We have shewn steadily improving revenues, large and increasing surpluses, advances in all the tests that indicate material prosperity.

And then begins to philosophise on the same in the ironical strain of criticizing the doctrine of the opposite school which he styles as the school of pessimism.

I do not wish it for a moment to be thought that, because we have been able to remit the best part of 1½ million sterling per annum in taxation, therefore there is no poverty in India. Far from it. There is enough and far more than enough. There is a great deal more than any one of us can contemplate with equanimity or satisfaction. The size and growth of the population, the character of their livelihood and to some extent their own tradition and inclinations render this inevitable. But I do not believe that the people are getting poorer. On the contrary I hold that they are making slow but sure advances and that in normal conditions this progress is certain to continue. But in my view this can only be achieved, if all those who are concerned with the problem, whether as administrators or critics, do so in the spirit not of pessimism but of cheerfulness. As little by little we get forward, I would crown every mile-stone on the path with roses instead of wetting it with tears."

## वऱ्हाडवृत्त

मे. ए. इलियट साहेब आफि० कमिशनर हे येत्या १ लें तारखे पासून पेनशन घेणार असल्यामुळें त्यांच्या कायमच्या जुडिशिअल कमिशनरच्या जागेची बढती मे. हेअर साहेब यांस देऊन कायमचे जुडिशिअल कमिशनर नेमण्यांत आलें.

या बढतीमुळें मि. गाडविन आस्टीन डिपुटी कमिशनर यांस १ ले वर्गाची बढती मिळून मोलवी महमद निजामुद्दीन हसनखान डिपुटी कमिशनर यांस २ रे वर्गाची बढती देण्यांत आली.

आणि तूर्तातूर्तच्या नेमणुका करितांना मे. हेअर साहेब यांस कमिशनर नेमून मे. ड्याटन साहेबांस जुडिशिअल कमिशनरी दिली व लेफ्टेनंट-कर्नेल ग्यारेट साहेब यांस सिव्हिल व सेशन जज्ज नेमण्यांत आले.

मे. कुमार श्री हरभामजी रावाजी हे गेल्या मंगळवारीं दिवसाच्या गाडीनें काठेवाडाकडे रवाना झाले. लवकरच तिकडून परत येऊन बुलढाण्याच्या जिल्ह्याच्या वरिष्ठ हुद्यावर रुजू होतील.

गेल्या गुरुवारीं रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. हे येथील तहशिलदारीवर रुजू झाले.

इस्टरच्या सुट्टींत उमरावतीस मराठ्यांच्या हायस्कूल माजी विद्यार्थ्यांचा समाज यंदा प्लेगामुळें भरवूं नये असा ठराव करण्यांत आला.

रा. रा. माधवराव रामचंद्र हुजूर नाझर आकोला हे १ ले तारखे पासून पेनशन घेणार असल्या कारणामुळें रा. रा. देवीराम कोंडाजी यांस उमरावतीहून बदलून आकोल्याच नाझरच्या जागीं नेमण्यात आलें. राजश्री माधवराव हे अत्यंत प्रामाणिक, शांत, व हुशार असे आफिसर आहेत. त्यांच्या निस्पृह व दक्षतेच्या कामगिरीला लोक फार राजी असत, ईश्वर करो आणि त्यांस पेनशनीचा उपभोग दीर्घकाल मिळो !

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं आमच्या येथील धान्याचे व्यापारी रा० रा० बिहारीलाल रामाराम यांस नागपुराकडे प्लेगानें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ आपल्या व्यवहारांत चोख असून पांढरपेशा मंडळींत यांची विशेष चहा असे.

## नोटीस.

नोटीस बेशमी हरी वल्द नागोजी पाटील राहणार कद्मापूर पोष्ट—बाळापूर तालुके खामगांव. यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी माझे मालकींचे शेत मौजे कद्मापूर येथील सर्वे, नंबर ३४ एकर १८-३८ आकार रुपये, १९ याचे खाते नानू वल्द मल्हारी यांचे नावे असून त्यांतील निमे हिस्सा मी तुम्हास दुष्काळाचे वेळीं माझे प्रपंचाचे, अडचणीमुळें ८० रुपयास गहाण दिले आहे. त्यांत करारा प्रमाणें अदाई न झाल्यास लहान गहान अशी शर्त आहे. त्या शर्ती प्रमाणें मी कराराचे आतच दोन तीन वेळ आपलें रुपये घेऊन आलो असतां आपण घेतले नाहीं आज उद्या करितां इतके दिवस लांबणीवर टाकिले अ तांही मी रुपये आणिले असतां आपण ते न घेऊन शेत माझे ताब्यांत दे म्हणतां मी ते शेत आपले रुपयाचे फेडी करितां पत्न्यानें रा० नारायण पाटील व सरदारखा मुसलमान यांस गत वर्षा पासून दिले आहे तेव्हां आतां या नोटीसीनें असें कळवितों कीं, नोटीस पावल्या पासून चार दिवसांत आपले रुपये घ्यावे. नाहीं पेक्षां माझे होत असलेलें नुकसानीं बद्दल मजला कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल व त्याजबद्दल जो खर्च होईल तो तुम्हास सोसावा लागेल. कळावे तारीख २७ माहे मार्च सन १९०३ इसवी.

सही

मारुती वल्द रामा माहार
राहणार कद्मापूर निशानी
खुद्द.

## वर्तमानसार

**चमत्कारिक स्मारक**—जेपुरच्या महाराजास गादीवर बसविण्या करितां लार्ड कर्झन स्वतः गेले होते हें सर्वांस माहीत आहेच त्यावेळीं ज्या राणी साहेब राज्यकारभार पहात होत्या त्यांनीं आपल्या मुलाच्या राज्यारोहणाच्या स्मारकार्थ लार्ड कर्झन यांचा एक फोटो ( अर्धा, एका अंगानें काढलेला ) चंदनांत कोरलेला तयार करवला आहे. तो ९ इंच लांब व ३ इंच रुंद आहे. एखाद्या गोष्टीचें स्मारक करण्याची ही नवीनच एक रीत दिसते. हें स्मारक ह्मणण्यापेक्षां याला निराळेंच कांहीं तरी नांव द्यावें लागेल!

**सुधारणेच्या विरुद्ध मत**— अमेरिकेचे प्रेसिडेंट ह्मणतात कीं, आपल्या मुलांचें कल्याण व्हावें अशी ज्याला इच्छा असेल, त्यानें स्वतःच्या कल्याणापासून प्रारंभ करावा. मुलें सुशील व्हावींत अशी इच्छा असल्यास आपण अगोदर सुशीलतेनें राहिलें पाहिजे. मुलींना स्वयंपाकपाणी वगैरे कांहीं एक करता येऊं नये आणि पुस्तकें मात्र भाराभर वाचताहेत हें त्यास आवडत नाहीं. आया सास्वा घरांतलीं कामें करताहेत, व मुली सुना लोकरीचें वीणकाम करीत बसल्या आहेत, हें त्यास मुळींच खपत नाहीं. त्याच प्रमाणें मुलांस शिक्षण द्यावयाचें तें दिखाऊ व डौली असण्यापेक्षां उपयुक्त असेंच असावें. अशाबद्दल त्याचा कटाक्ष फार जबर आहे. जीं आईबापें आपल्या मुलामुलींस नकली व दिखाऊ आणि नुसतें डौली शिक्षण देतील, तीं त्यांचे हितशत्रु होत, मूर्खच होत ह्मटलें, तरी चालेल.

**इनाम मिळेल**—जो कोणी भंडारा जिल्ह्यातील सलेकसा व दरेकसा या खेड्यास उपद्रव देणाऱ्या वाघास मारील त्याला ५०० रुपये इनाम मिळेल. पूर्वी याच वाघानें डोंगरगड कडे ८ महिन्यांत २०० मनुष्यें मारलीं ह्मणतात.

**सोपी युक्ती**— कोणतेंही नरम लांकूड साखरेच्या पाण्यांत घालून उकळविलें असतां तें चिवट आणि टणक होतें, असा अनुभव आल्यावरून, लिव्हरपूल येथील मि. पावेल नांवाच्या व्यापाऱ्यानें पेटंट मिळवून कारखाना सुरू केला आहे.

**उपयुक्त शोध**— एम्. एम्. कार्नोला नांवाच्या डाक्तरानें, मेलेल्या प्राण्याचें हाड काढून तें जिवंत प्राण्याच्या मांसांत घातलें असतां, त्यावर शिरा व स्नायू उत्पन्न होतात असें, कुत्र्यावर प्रयोग करून पाहून अनुभवानें ठरविलें आहे.

**उद्योग**— मेक्सिकोमध्यें २७८८४ फूट उंचीचा एक ज्वालामुखी असून, त्याचें तोंड १००० हजार फूट खोलीचें व ३ मैल घेराचें आहे! या ज्वालामुखींतून गंधक काढण्याचे हेतूनें, स्टँडर्ड ऑईल नांवाच्या अमेरिकन् कंपनीनें १० लक्ष पौंडांस तो खरेदी घेतला आहे.

**महारोग्यांचें स्वराज्य**— फिलिपाईन बेटांत एक महारोग्यांचें शहर आहे. तेथील सर्वच रहिवाशी महारोगी असून, त्यांची संख्या १० हजारांवर आहे. ह्या शहराला अमेरिकन सरकारानें होमरूल दिलें असून, तेथील सर्व राजव्यवस्था महारोगीच फार प्रशंसनीय रीतीनें चालवितात.

**नवऱ्याचें नांव काय ?**— प्लेग झालेल्या भागांतून एक बाई आगगाडींत बसून एका गांवीं उतरली. स्टेशनावर रीती प्रमाणे उतारूंचीं नांवें टिपण्याची सुरुवात झाली.

शिपाई— ए, बाई, तुझें नांव काय ?

बाई— सरस्वती.

शिपाई— नवऱ्याचें नांव ?

बाई— स्तब्ध बसली.

शिपाई जोरानें दरडावून— जलदी बोल.

बाई— आह्मी बायका नवऱ्याचीं नांवें सांगत नसतो.

शिपाई— सांगितलीं पाहिजेत. नाहीं तर बसा तिकडे कारंटीनांत.

बाई, रागानें लाल झाली— अरे मेल्या शिपुड्या, इतका उन्मत होऊं नकोस. मला इतके दिवस पर्यंत कोणी नवऱ्याचें नांव विचारलें नाहीं! तूंच आज भेटलास. तुला लाज कशी वाटत नाहीं! बायकाची दहा जणा समक्ष तुह्मी अशी अब्रू घेतां, नाव वाटेवर पडलें असे वाटतें! जा. नाहीं नांव सांगत. काय करतोस तें कर.

ह्या बायकोचे अंगीं जें पाणी दिसतें तितकें मी मी ह्मणविणाऱ्या पुरुषांच्या अंगीं सुद्धां नसेल.

**पूर्व रूप**—पूर्वी हिंदुस्थान देश हा परदेशांतील दरवडेखोरांची उतार पेठ, परदेशांतील वाटमाऱ्यांची धर्मशाळा, परदेशांतील लुटारूंचें सदावर्त आणि परदेशांतील चोचे लोकांचें अन्नछत्र, अशी स्थिती पुष्कळ दिवसांपासून चालत आलेली होती.

**म्युनिसिपालिटीवर फिर्याद**— रस्ता बरोबर नसल्यामुळें आपल्या गाडीस अपघात झाला अशा मुद्यावर कलकत्याच्या एका नेटीव डक्टरानें तेथील म्युनिसिपल कमेटीवर दिवाणींत दावा लावला होता. त्या कामीं तेथील स्मालकाज कोर्टानें वादीस नुकसानी बद्दल ५०० रुपये प्रतिवादीनें द्यावे असा निकाल केला. त्यांत २०० रुपये कामाच्या नुकसानीबद्दल, १०० रुपये गाडीघोड्याच्या मोडतोडीबद्दल आणि २०० रुपये झालेल्या इजेबद्दल अशी वाटणी करण्यांत आली आहे.

### वकिली उत्तर

एक वकील फार हुषार होता. त्यास ऐन वेळेवर काय उत्तर द्यावें याची कधींच नड पडली नाहीं. एकदां त्याच्या ऑफिसांत पक्षकार आले व ते ह्मणाले, 'छे बुवा, येथें फारच गरमी होते, आपलें ऑफीस तर अगदीं थंडगार असायला पाहिजे.' लागलीच ते उत्तर करितात कीं, अहो तुह्मी चुकतां. आमचें ऑफीस गरमच राहणार. कारण येथेंच आमची भाजीभाकरी तयार होते. ऑफीस थंडगार होऊन आमचें कसें चालेल.

**कृमि सांपडले**—निद्रारोग उत्पन्न करणारे कृमि आतां सांपडले आहेत.

**मास्तरांची परीक्षा**— मुंबई इलाख्यांतील शाळा अधिकारी, मास्तर लोकांना एकत्र जमवून त्यांचा इंग्रजी शद्बांच्या उच्चाराची एक दिवस परीक्षा घेणार आहेत असें समजतें.

**प्रेताशी लग्न**—कोची येथें एक लग्न ठरलें. ऐन लग्नाचे दिवशीं मुलीनें जीव दिला. तरी पण या मुलीशींच या नवऱ्याचें लग्न झालें पाहिजे असा त्या मुलीच्या आईबापाचा आग्रह पडल्यावरून त्या प्रताशीं लग्नविधी करण्यांत आला.

**विलक्षण मासा**—कोची येथें एक विलक्षण मासा सांपडला आहे. या माशाचें अर्धें शरीर माशासारखें व अर्धें माणसासारखें आहे तेथील लोकांनीं सदर मासा जळमाणस समजून त्याचे दोन तीन दिवस प्रदर्शन केले होतें.

**अग्निभक्षक वासरूं**— मौजे हरबाळ ता० अंदोला जि० गुलबर्गा या गांवीं एक दोन वर्षें वयाचें वासरूं आहे तें प्रत्याच्या पाल्या विस्तव खातें!!

**शास्त्रीय मत**—डाव्या हातापेक्षां उजव्या हातावर उष्णतेचा परिणाम विशेष होतो असें शास्त्रज्ञांचें मत आहे. ह्मणूनच वैद्य लोक उजव्या हाताची नाडी पाहतात.

**काबुली कायदा**— कोणीही मनुष्यानें चार पेक्षां अधिक बायका करूं नयेत असा कायदा अफगाणिस्थानच्या अमिरानीं प्रसिद्ध केला असून आपल्या स्वतांच्या आठ राण्या पैकीं चार राण्यांचा फारकत केली आहे.

शिवाय बायकांनीं भडक रंगाचे आणि झिरझिरित बुरखे घेऊं नयेत व नियमित वेळांच मशिदींत जावें असेंही ठरविलें आहे.

**कुत्र्यानें बचावलें**— बेळगांवास एक गृहस्थ किल्ल्याकडे फिरावयास गेले असता वाटत एक नाग त्यांचेवर फोंफावत येत होता. परंतु त्यांचेबरोबर त्यांचा कुत्रा होता त्यानें त्याचे तात्काळ तुकडे तुकडे करून टाकले.

---

### नोटीस

नोटीस बनाम अमीरबेग वल्द युसफबेग २ अमीरखा वल्द अबासखा, ३ महमदबेग वल्द शेरबेग, ४ शेखइब्राहिम वल्द महमद हकीम सर्व राहणार कसबे आकोट जिल्हे आकोला यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं सन १९०२ इसवी एक साला करितां आमचे ताब्यातील शेताचे नंबरें १४ याचे स्वामीत्वाचे रुपये ९५१ यास तुह्मास कमी रकमेवर दिली गेली असून तुह्मी करारा प्रमाणें वक्तशीर रक्कम आदा केली नाहीं. शिवाय महाराची भीक पायलीची जवारी ही आजपावेतों दिली नाहीं. प्रथम जमीन करते वेळेस परद्यांतील बायकांवर दावा आणि गैरदावा याची धास्ती घालून कमी रकमेवर तुह्मी केले होते आणि (१४) शेताशिवाय ( ३ ) जास्ती नंबरही वहून त्याचा माल गिळून बसले. सबब ती जमीन पुढें तुह्मांस वहितीस आह्मी देत नाहीं.

२ तुमचे कौल कबुलायती शिवाय जास्ती नंबर ( ३ ) हक्क नसतां याचें उत्पन्न तुह्मी अन्यायानें घेतलें आहे त्याचे स्वामीत्वाचे रुपये ३०० आणि महाराची जवारी नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसांत आमचे घरीं आणून द्यावें. न दिल्यास दिवाणी कोटांत दावा केला जाईल.

३ तुमचें कौल कबुलायती पैकीं नंबर (१४) सन १९०३ इसवी सालाबद्दल एक वर्षा करितां मि० सरफराजअल्ली वल्द असदअल्ली सर देशमुख व हसनमहमद इनामदार राहणार आकोट ह उभयता स्वामित्वाचे रुपये २००० शिवाय शेतसारा व महाराची भीक पायली ची जवारी या प्रमाणें देण्यास कबूल असून तारीख १९ मार्च सन १९०३ इसवी रोजीं त्यांनीं कबुलायत लिहून दिली आहे. सबब या उभयतास तीच नंबरें ( १४ ) वहितीस दिली गेली आहेत. अगर तुह्मी हरकत केल्यास तुमचे पासून रुपये २००० शिवाय शेतसारा व महाराची पायली घेतली जाईल.

४ अज्ञान याचे नफे व नुकसानीचा ज्यांत संभव आहे त्या बाबतीकडे पाहण्याचा ज्यास कायद्यानें अधिकार आहे या इसमा शिवाय आणि परद्यांतील बायकांचे योग्य वारसांचे रुजुवाती शिवाय तुह्मी इतर कोणापासूनही कोणताही लेख करूं नये.

कदाचित मागें पुढें केलें असल्यास ते या नोटिसीवरून रद्द समजावें. आणि गैर कायदे केलेले कामाचे भरवशावर जमिनी संबंधी वादावादी केल्यास नुकसानी शिवाय दुसरे प्रकारचे कोणतेही फळ हातीं लागणार नाहीं. कळावें तारीख २३-३-०३ इसवी

सही

सय्यद हसनोद्दीन अज्ञान पालन करणार आई फातमा बी जवजे सय्यद नुरोद्दीन काजी व ताजुन्निसा बेगम मर्दे सय्यद बहुद्दीन काजी आकोट तर्फे मेहेताबला कुलमुखत्यार.

---

### नोटीस

बनाम जैराम वल्द चैंदाजी जात माळी राहणार आकोट जिल्हा आकोला यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे शाहपूर व मौजे खानापूर तालुके आकोट जिल्हा आकोला येथील आमचे ताब्यातील मालकीचे इनामी शेताचे नंबर ( ४ ) स्वामित्वाबद्दल दरसाल रुपये ५०० शिवाय जवारी महाराची या प्रमाणें तुमचेकडेस वहितीस असून सन १९०१ इसवी बद्दल व सन १९०२ इसवी सालाबद्दल रुपये ५०० एकूण रुपये १००० एक हजार शिवाय महाराची जवारी या प्रमाणें दोन पिकाबद्दल येणें असून तुह्मी दिले नाहीं सबब या नोटिसीचे तारखेपासून ८ आठ दिवसांत चुकते रुपये एक हजार व जवारी आमचे घरीं आणून द्यावें न दिल्यास दिवाणी कोटांत दावा केला जाईल. कळावें, तारीख २३ माहे मार्च सन १९०३ इसवी०

सही

सयद हसनोद्दीन अज्ञान पालन करणार आई फातमाबी मर्दे सय्यद नुरोद्दीन काजी व ताजुन्निसा बेगम मर्दे सयद बाहुद्दीन काजी आकोट तर्फे मेहेताबला कुलमुखत्यार.